# मेहता मराठी ग्रंथजगत

फेब्रुवारी, २०१९
पृष्ठे १३२ किंमत : ₹ १५
वर्ष एकोणिसावे
अंक दुसरा




## आवर्जून वाचावे












'नागकेशर'चे प्रकाशन करताना (डावीकडून) मेहता पब्लिशिंग हाऊसचे सुनील मेहता, ज्येष्ठ लेखिका अश्विनी धोंगडे, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष मिलिंद जोशी, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष श्रीपाल सबनीस, लेखक विश्वास पाटील, सीओईपीचे संचालक डॉ. राजेंद्र हिरेमठ, चंद्रसेना पाटील, म.सा.प.च्या भोसरी शाखेचे अध्यक्ष मुरलीधर साठे. (सविस्तर वृत्त पान १२ वर)




पुणे मराठी ग्रंथालयातर्फे 'रेझोनान्स' या अजय पांडे लिखित आणि उज्ज्वला गोखले अनुवादित कादंबरीला उत्कृष्ट साहित्यकृती म्हणून गौरवण्यात आले. कै. श्री. मधुसूदन मुकुंद शारंगपाणी यांच्या स्मरणार्थ हा पुरस्कार देण्यात आला. प्रसिद्ध साहित्यिक राजेंद्र खेर यांच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारताना उज्ज्वला गोखले.

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ फेब्रुवारी २०१९ ◆ वर्ष एकोणिसावे ◆ अंक दुसरा

**संपादक :**
सुनील मेहता
**कार्यकारी संपादक :**
शंकर सारडा
**संपादन साहाय्य :**
अंजली पटवर्धन
**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.
**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस
**मांडणी-अक्षरजुळणी**
*मेहता पब्लिशिंग हाऊस*

**— *अनुक्रमणिका* —**


| | |
|---|---|
| संपादकीय | ४ |
| प्रकाशन वार्ता | १२ |
| दिनविशेष | १४ |
| **पुस्तक परिचय** | |
| नागकेशर | २२ |
| एकवचनी भाग-२ | ४० |
| फिफ्टी शेड्स ऑफ ग्रे | ५० |
| प्रतिरूप | ६४ |
| द डिफिकल्टी ऑफ बीइंग गुड | ७४ |
| अंतरिक्षाच्या अंतरंगात | ८४ |
| द फकीर | ९४ |
| इंदिरा | १०४ |
| **अभिप्राय** | |
| पॉलिटिक्स ऑफ द वूम्ब | १२२ |


संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर,
पुणे-४११ ०३० फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक सुनील अनिल मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून मेहता होम, १व२ मजला, १९४१, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - सुनील अनिल मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Sunil Anil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at Mehta Home, 1 & 2 Floor, 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030.
Editor – Sunil Anil Mehta.

# संपादकीय



## मराठीची श्रीमंती वाढवू या

ज्या मराठीला ज्ञानेश्वरांनी अमृतापेक्षाही गोड मानलं, त्या मराठीची अवस्था आज काय आहे, हा प्रश्न व्यापक आणि अस्वस्थ करणारा आहे. मराठीत अनेक पुस्तकांची निर्मिती होते आहे, ही एकच अंशतः आशादायक बाब आहे. मराठीचं अस्तित्व टिकविण्यासाठी, तिची शुद्धता अबाधित ठेवण्यासाठी, तिचं वैभव वाढविण्यासाठी ही एकच बाब पुरेशी नाही. वास्तविक, मराठीचं नुसतं अस्तित्व टिकविण्यासाठी आपल्याला धडपडावं लागतंय, ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे. नुसतं अस्तित्व असून चालत नाही, तर त्या अस्तित्वाला अर्थ असावा लागतो. सौंदर्य असावं लागतं. शुद्धता असावी लागते.

महानुभाव पंथाचं साहित्य, संतसाहित्य, पंडिती परंपरेतील साहित्य, शाहिरी परंपरेतील साहित्य आणि त्यानंतर निर्माण झालेलं अर्वाचीन साहित्य असा साहित्याचा आणि त्यावर झालेल्या समीक्षालेखनाचा महासागर आपल्यासमोर असताना त्यातील काही थेंबसुद्धा प्राशन करण्याची क्षमता किंवा आवड आपण आपल्या पाल्यांमध्ये निर्माण करत नाही, यासारखं दुसरं दुर्दैव नाही. भाषाशास्त्रासारखा विषय दुर्लक्षित केला जातो, ही आणखी एक दुर्दैवी बाब. इंग्रजी शाळांमध्ये मराठी ही भाषा सक्तीची करावी, महाविद्यालयीन (कनिष्ठ-वरिष्ठ) स्तरावर, कोणत्याही शाखेसाठी मराठी हा विषय सक्तीचा करावा, सरकारी कामकाज, बँकांमधील कामकाज मराठीत चालावं, इतके फुटकळ उपाय आम्ही केवळ तिचं अस्तित्व टिकविण्यासाठी  करणार आहोत का? तिच्या मूळच्या सौंदर्याला उठाव आणण्यासाठी आम्ही काय करणार आहोत, तिची

संपन्नता वाढवण्यासाठी आम्ही काय करणार आहोत, तिची शुद्धता टिकविण्यासाठी आम्ही काय करणार आहोत, तिच्या भाषिक अभ्यासाकडे लक्ष वेधण्यासाठी आम्ही काय करणार आहोत, याचा अतिशय योजनाबद्ध रीतीने विचार करण्याची गरज आहे.

भाषेचं सौंदर्य म्हणजे आशयाचं (भावनेचं) सौंदर्य, अर्थाचं सौंदर्य आणि अभिव्यक्तीचं सौंदर्य. हे सौंदर्य मनाला आल्हाद देतं; पण त्यासाठी आवश्यकता असते भावनाशीलतेची. तेवढी भावनाशीलता आता उरली आहे का आमच्यामध्ये? म्हणजे भाषेचं महत्त्व कमी झालं म्हणून भावनाशीलता कमी झाली, की भावनाशीलता कमी झाली म्हणून भाषेचं महत्त्व कमी झालं, हाही चिंतनाचा विषय ठरावा; पण भौतिक साधनांच्या रेलचेलीमुळे, त्या साधनांच्या मागे धावण्याच्या वृत्तीमुळे रोजच्या जीवनातील संवाद तर हरवलाच; पण विशेष प्रसंगी, जसं लग्न, बारसं, मुंज इ. प्रसंगीही संवादापेक्षा संपत्ती प्रदर्शनावर भर दिला जातो; मग भावनाशीलता कशी शिल्लक राहणार? आणि भाषेचं सौंदर्य कसं जाणवणार आम्हाला? उदाहरणार्थ शान्ता शेळके यांच्या ‘शब्दामागे उभा अर्थ’ या कवितेतील या ओळी :

शब्दामागे उभा अर्थ
अर्थामागे उभे मन
मनाच्याही पैलपार
*बोले कुणीसे गहन*

केवळ चार ओळींत ज्ञाताकडून अज्ञाताकडचा प्रवास लीलया घडवतात शान्ताबाई. हेच या ओळींचं अर्थसौंदर्य आणि आशयसौंदर्यही. आणि शब्दांची नेमकी योजना, हे अभिव्यक्तीसौंदर्य. हे जाणून घ्यायचं असेल तर मन तरल हवं आणि भौतिक सुखाच्या मागे धावणं कमी होईल तेव्हाच मन भावात्म होईल. मग या भावात्मतेतून अशीच सौंदर्यपूर्ण नवनिर्मिती होईल किंवा सौंदर्याचं विश्लेषण किंवा एक वाचक म्हणून मनात जागेल संपन्नतेची भावना, ही किमया आहे भाषेच्या सुंदरतेची.

भाषेची संपन्नता वाढवायची म्हणजे काय करायचं, तर तिच्यातील शब्दभांडाराचा शक्य तितका आणि सजग वापर करायचा. (जमलं तर नवीन शब्दांची भरही घालायची.) तिच्या संपन्नतेत नवीन साहित्यनिर्मितीनेही भर घालता येईल; पण ती भर केवळ संख्यात्मक नको, तर गुणात्मक हवी. आणि प्राचीन ते अर्वाचीन या प्रवासात मराठीची इतकी विविध रूपं अनुभवायला मिळतात. ती रूपं म्हणजे तिची संपन्नताच नाही का? तर तिची ही संपन्नता समीक्षा, संशोधनाद्वारा अधोरेखित करता येऊ शकते.

भाषेची शुद्धता हा तर फार महत्त्वाचा प्रश्न झाला आहे. लेखनातील शुद्धता आणि उच्चारातील शुद्धता, या दोन्ही बाबी महत्त्वाच्या आहेत. लेखनातील शुद्धतेबाबत काटेकोर राहण्याची जबाबदारी प्रकाशकांची, वर्तमानपत्रांची आहे, तर उच्चारातील शुद्धतेबाबत जागरूक राहण्याची जबाबदारी सगळ्या दृक्-श्राव्य आणि श्राव्य माध्यमांची आहे. लेखनातील आणि उच्चारातील, दोन्ही बाबतीतील शुद्धता जपण्याचं काम मराठीच्या शिक्षकांचं आणि प्राध्यापकांचं आहे.

साहित्यनिर्मिती हा भाषेच्या सर्जनाचा भाग असतो, तर भाषिक अभ्यास हा शास्त्राचा (Linguistic). भाषेच्या या शास्त्राकडे मात्र मराठी हा विषय स्पेशल म्हणून घेणारे विद्यार्थीही अपवादाने वळतात. कृ. पां. कुलकर्णी यांनी 'मराठी भाषा : उद्गम व विकास' हा ग्रंथ भाषाशास्त्राच्या संशोधनातून सिद्ध केला आहे. आजही भाषाशास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी तो मार्गदर्शक ठरतो. या ग्रंथाबरोबरच डॉ. लीला गोविलकर यांचा 'मराठीचे व्याकरण' हा ग्रंथ, राजशेखर हिरेमठ यांचं 'मराठी व्याकरण परिचय' हे पुस्तक, ही पुस्तकं प्रकाशित करून मराठीच्या भाषिक अभ्यासासाठीचे संदर्भ आम्ही अभ्यासकांसाठी उपलब्ध केले, याचं आम्हाला समाधान आहे. कृ. पां. कुलकर्णी, डॉ. कल्याण काळे आणि अन्य विद्वानांनी भाषाशस्त्राच्या क्षेत्रात जे काम करून ठेवलं आहे, त्याची दखल आता नव्यानं कुणी घेणार आहे की

नाही?

तर मराठीचं सौंदर्य, तिचं शास्त्र, तिची संपन्नता, तिची शुद्धता या चार बाबींकडे लक्ष पुरवायचं असेल तर अगदी शालेय स्तरावरील प्राथमिक विभागापासून ते विद्यापीठ पातळीपर्यंत प्रयत्न व्हायला हवेत. अर्थातच त्यासाठी गरज आहे चांगल्या शिक्षकांची. केवळ वेतन आयोगांकडे लक्ष न पुरवता, विद्यार्थ्यांमध्ये मराठीची गोडी निर्माण करणारे, मराठीवर प्रेम करणारे, अभ्यासू शिक्षक हवेत. विद्यापीठ पातळीवर मराठीची उपरोल्लेखित चार बाबींवरची अध्यासनं हवी आहेत आणि तिथेही संशोधनाचा दर्जा उत्तम रीतीनं सांभाळला तरच त्यातून चांगलं काही निष्पन्न होऊ शकेल. या चार बाबींमध्ये साहित्यशास्त्राचीही भर पडू शकते.

तेव्हा मराठीचं अभ्यास क्षेत्र  इतकं व्यापक, वैविध्यपूर्ण आहे; पण सागरात असूनही आम्ही कोरडे आहोत. आमच्या मातृभाषेत लिहिण्यात, बोलण्यात, व्यक्त होण्यात आम्हाला कमीपणा वाटतो. 'इंग्रजी माध्यमात शिकल्यामुळे मराठी लिहिता येत नाही' असं अभिमानानं सांगणारे मराठी लोक आहेत. भाषेशी संबंधित क्षेत्रांमध्ये काम करायला माणसं उत्सुक नसतात; कारण पैसाही जास्त मिळत नाही आणि सन्मान तर नाहीच नाही. त्यामुळे काहीच जमत नाही, अशा वर्गवारीतील माणसं या क्षेत्रात येतात आणि भाषेचा दर्जा सांभाळू शकत नाहीत. व्हॉटस् ॲप, फेसबुकसारखी साधनं तर मराठीचा अधिक्षेप करत आहेत की काय, असं वाटतं. भाषेला अभिजाततेचा दर्जा देण्यासाठीही ती किती जुनी आहे, हा निकष लावला जाणं कितपत योग्य आहे?

या पार्श्वभूमीवर वि. म. कुलकर्णींची एक कविता आठवली 'माझ्या मराठीची गोडी मला वाटते अवीट.' हीच भावना प्रत्येक मराठी माणसानं मनात रुजवली तर मराठीची श्रीमंती नक्कीच वाढेल, अशी आशा वाटते.



# विज्ञान नवलाई

## डॉ. बाळ फोंडके


**६ पुस्तकांच्या एकत्रित संचाची किंमत ₹ ३९०, पोस्टेज अतिरिक्त**

खालील ६ पुस्तकांचा एकत्र संच घेणे आवश्यक आहे.



















**६ विषयांचं वैविध्य असणारा आगळावेगळा संच!**

रॉकेट, यान यांचं अंतराळातलं भ्रमण होतं कसं? पृथ्वीच्या आतबाहेर नक्की काय आहे? जमीन, समुद्र, आकाश कुठपर्यंत पसरलं आहे? पशू-पक्षी आले कुठून? कसे? आणि जगतात कसे? प्राण्यांचं विश्व आपल्याला कधीतरी दिसेल का? सुरुवातीला आपण माणसं कुठून आलो? कसे होतो? त्यावेळी आपली भाषा, संस्कृती, रीतिरिवाज कसे होते? हो! हो! हो!

या सगळ्या प्रश्नांची उत्तरं आपल्याला मिळतील एकाच खजिन्यात!

# मेहता मराठी ग्रंथजगत

## नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.

**आमच्या छापील अंकाच्या त्रैवार्षिक आणि पंचवार्षिक वर्गणीत आम्ही १५ ऑगस्ट २०१८ पासून बदल केला आहे,**

**याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.**

आमच्या छापील अंकाच्या वर्गणीतील बदल खालीलप्रमाणे

त्रैवार्षिक वर्गणी ४५०रुपये
पंचवार्षिक वर्गणी ६००रुपये

डिजिटल अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ३००रुपये
पंचवार्षिक वर्गणी ४००रुपये

## वाचकांसाठी सुवर्णसंधी!

## WORDPOWER

Books | Toys | Stationery | Music | Movies | Games

### बेळगाव / कोल्हापूर

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक,
मूव्ही, गेम्स इत्यादी बरेच काही
आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे.
सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

**बेळगाव, कोल्हापूर येथील वर्डपॉवरचे पत्ते पुढीलप्रमाणे**

कामत टॉवर, पहिला मजला, आरपीडी कॉलेजसमोर,
टिळकवाडी, बेळगाव -५९०००६.
मोबाईल - ७८८८२७७१९०

स्टार बझार, जुना पुणे-बेंगलोर हायवे, कोल्हापूर – ४१६००१.
मोबाईल - ९५१८९१२२६९

**अधिक माहितीसाठी संपर्क**

**wordpowerbookshop@gmail.com**

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

**सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, यूपीएससी, एमपीएससी, सेट-नेट, इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर**

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ **(शनिवारी बंद)**
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१
Email : mehtabooksellers@gmail.com

amazon


GET IT ON Google Play

यांच्या संयुक्त विद्यमाने

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि अ‍ॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

**इथे मिळतील ई-बुक्स...**

**eBooks**



**www.amazon.in**

**play.google.com**

**Online पुस्तके खरेदी करा www.mehtapublishinghouse.com**

# प्रकाशन वार्ता

## सहकार क्षेत्रातील बारकावे टिपणारी कादंबरी ‘नागकेशर’ : उल्हासदादा पवार

### विश्वास पाटील लिखित ‘नागकेशर’ कादंबरीचे प्रकाशन

पुणे : सहकारी साखर कारखाने उदात्त हेतूने सुरू झाले. अनेकांनी या क्षेत्रात आदर्शवत काम केले; पण कालांतराने इतर क्षेत्रांप्रमाणे याही क्षेत्राला काही दुर्गुण चिकटले. या क्षेत्रातील बारकावे विश्वास पाटील यांच्या ‘नागकेशर’ कादंबरीतून स्पष्ट होत असल्याचे मत माजी आमदार उल्हासदादा पवार यांनी व्यक्त केले. विश्वास पाटील लिखित ‘नागकेशर’ कादंबरीच्या प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षपदावरून ते बोलत होते.

मेहता पब्लिशिंग हाऊस, महाराष्ट्र साहित्य परिषद, भोसरी आणि सीओईपी मराठी वादविवाद मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने सीओईपी महाविद्यालयात ‘नागकेशर’ कादंबरीचा प्रकाशनसोहळा नुकताच संपन्न झाला. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष श्रीपालसबनीस, ज्येष्ठ लेखिका अश्विनी धोंगडे, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष मिलिंद जोशी, लेखक विश्वास पाटील, प्रकाशक सुनील मेहता आदी मान्यवर या प्रसंगी उपस्थित होते.

यावेळी बोलताना श्रीपालसबनीस म्हणाले, ‘मराठी कादंबरी सत्य आणि असत्याच्या संघर्षात उभी राहिली आहे; पण विश्वास पाटीलयांच्या कादंबरीत कमी असत्य आणि अधिक सत्य आहे. प्रकृती आणि प्रवृत्ती यांचं सामर्थ्यवान चित्रण मांडताना ही कादंबरी नेकीचं प्राबल्य मांडते. हे मांडताना आलेलं कादंबरीतील मृत्यूसत्र अस्वस्थ करणारं आहे. कादंबरीतील असंख्य भिन्न व्यक्तिरेखा पाहिल्यावर ही कादंबरी साहित्यातील आधुनिक महाभारत असल्यासारखी वाटते. ही कादंबरी एक गद्य महाकाव्य आहे.’

अधिकारी म्हणून काम करताना आलेले विविध अनुभव आणि

व्यक्तिरूपं माझ्या लेखनातून प्रतिबिंबित होतात. स्त्री ही पृथ्वी आहे आणि पुरुष आभाळ आहे. या पृथ्वीचं रूप आणि छटा मांडण्याचा प्रयत्न 'नागकेशर' कादंबरीतून केला असल्याचे, लेखक विश्वास पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले.

अमर्याद महत्त्वाकांक्षा आणि सत्ताकांक्षा असल्यावर माणसाचं कसं अधःपतन होतं, याचं चित्रण 'नागकेशर' कादंबरीत येतं.

कुटुंबाच्या कलहाची ही कथा आहे. महिला आरक्षणाने स्त्रियांच्या हातात सत्ता आली असली तरी प्रत्यक्ष पुरुषच राजकारण चालवतात; पण 'नागकेशर' कादंबरीमध्ये स्त्रिया राजकारण करतात आणि त्यांच्यातही सर्व राजकीय गुण-दोष स्पष्ट दिसतात. त्यामुळे समाजाच्या सत्त्वशील जगण्याची इयत्ता जोवर वाढणार नाही तोवर राजकारणाचं शुद्धीकरण होणार नाही, याची अनुभूती 'नागकेशर' कादंबरीतून येत असल्याचे मत, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष मिलिंद जोशी यांनी व्यक्त केले.

कादंबरीचे चित्रमय रूप वाचकाच्या मनात उतरणे चांगल्या कादंबरीचे लक्षण आहे. विश्वास पाटील यांची 'नागकेशर' ही कादंबरी या कसोटीवर खरी उतरते. ती आयुष्यातील व्यामिश्रता समर्थपणे व्यक्त करते. बहुतांश कादंबऱ्यांमध्ये पुरुष नायक असतात; पण 'नागकेशर'मध्ये दोन प्रमुख स्त्री व्यक्तिरेखा आहेत, ज्या मानवी स्वभावाच्या दोन भिन्न छटा दाखवतात. या कादंबरीच्या अनुभवातून कादंबरीकार म्हणून विश्वास पाटील यांचा आलेख उंचावत असल्याचे ज्येष्ठ लेखिका अश्विनी धोंगडे यांनी सांगितले.

'नागकेशर' ही कादंबरी छापील पुस्तकाबरोबर ई बुक स्वरूपातही उपलब्ध करण्यात आली आहे. त्याबरोबरच विश्वास पाटील यांची तीन पुस्तके ॲमेझॉन मार्फत इंग्रजीतही प्रकाशित होत असल्याची माहिती यावेळी सुनील मेहता यांनी दिली.

महाराष्ट्र साहित्य परिषद भोसरी शाखेचे मुरलीधर साठे यांनी आभार मानले. तर दिगंबर ढोकले यांनी सूत्रसंचालन केले.

❖

## १६ फेब्रुवारी ते १५ मार्च २०१९
## दरम्यानचा दिनविशेष

**दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर ५० टक्क्यांपर्यंत सूट**

**१६ फेब्रुवारी - एकहार्ट टोले यांचा जन्मदिन**

'अवनी एक नवी' या मार्गदर्शनपर पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १५९/-**
१६ फेब्रुवारी ते १७ फेब्रुवारी

**१६ फेब्रुवारी - शीला कारखानीस यांचा जन्मदिन**

शीला कारखानीस अनुवादित चार पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ११५०/- । सवलत किंमत ७४९/-**
१७ फेब्रुवारी ते १८ फेब्रुवारी

**१७ फेब्रुवारी - अविनाश लोंढे यांचा जन्मदिन**

अविनाश लोंढे लिखित 'बेधुंद' पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १५९/-**
१७ फेब्रुवारी ते १८ फेब्रुवारी

**१८ फेब्रुवारी - अमृता दुर्वे यांचा जन्मदिन**

'द तालिबान क्रिकेट क्लब' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३२०/- । सवलत किंमत २०९/-**
१८ फेब्रुवारी ते १९ फेब्रुवारी

**१८ फेब्रुवारी - तेहमिना दुर्रानी यांचा जन्मदिन**

'ब्लास्फेमी' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २६०/- । सवलत किंमत १६९/-**
१८ फेब्रुवारी ते १९ फेब्रुवारी

**१९ फेब्रुवारी - छत्रपती शिवाजी महाराज जयंती**

'जाणता राजा शिवछत्रपती', 'श्रीमानयोगी', 'लक्ष्यवेध', 'शिवचरित्रापासून आम्ही काय शिकावे', 'शिवछत्रपती : एक मागोवा' या पुस्तकांवर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ११२०/- । सवलत किंमत ७९९/-**
१९ फेब्रुवारी ते २१ फेब्रुवारी

**१९ फेब्रुवारी - श्यामल कुलकर्णी यांचााान्मदिन**

श्यामल कुलकर्णी अनुवादित चार पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १२५०/- । सवलत किंमत ७४९/-**
१९ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी

**२० फेब्रुवारी - टोनी विल्सन यांचा जन्मदिन**

'शॅपेल' या अनुवादित सत्यकथेवर विशेष सवलत
**मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १३९/-**
२० फेब्रुवारी ते २१ फेब्रुवारी

**२१फेब्रुवारी - प्रा. डॉ. कैलास सार्वेकर यांचा जन्मदिन**

'मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास' या संदर्भ ग्रंथावर विशेष सवलत
**मूळ किंमत २९५/- । सवलत किंमत १७९/-**
२१ फेब्रुवारी ते २२ फेब्रुवारी

**२२ फेब्रुवारी - जागतिक वैचारिक दिन**

'द मॅजिक ऑफ थिंकींग बिग','द माइंड जिम','यशप्राप्तीचा जाहीरनामा!', 'शांततेनं काम करा!', 'प्रिझनर्स ऑफ अवर थॉट्स ', 'द माइंडजिम 'रिलेशनशिप्स', 'साधने', 'वर्क लेस, डू मोअर', 'फिश!', 'फिश! फॉर लाइफ', 'फिश! स्टीक्स', 'फिश! टेल्स' या पुस्तकसंचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २५३५/- । सवलत किंमत १७०९/-**
२२ फेब्रुवारी ते २४ फेब्रुवारी

**२२ फेब्रुवारी - सुनीति काणे यांचा जन्मदिन**

**संच १ :** 'सुडौल राहा', 'स्वप्न व्यवस्थापकाचे', 'स्वप्नांचे इंद्रधनू...', 'टेक मी होम', 'द डान्स ऑफ डिसेप्शन', 'द फकीर,' 'वुइ आर पुअर बट सो मेनी', 'यशप्राप्तीचा जाहीरनामा!', 'सेक्रेड हार्ट्स', 'शॅपेल '(मराठी), 'एनस्लेव्ह्ड' या पुस्तक संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २८८०/- । सवलत किंमत १७२९/-**
**संच २** : 'रिटर्न ऑफ अ किंग', 'चिकन सूप फॉर द सोल डेली इन्स्पिरेशन्स फॉर विमेन', 'चिकन सूप फॉर द सिस्टर्स सोल', 'अराइज, अवेक', 'इनसाइड द गॅस चेंबर्स', 'गो किस द वर्ल्ड', 'जिच्या हाती पाळण्याची दोरी...', 'स्टोन्स इन्टू स्कूल्स', 'वन फुट रॉंग', 'साद उत्तुंगाची' या पुस्तक संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २७७५/- । सवलत किंमत १६७९/-**
२२ फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारी

**२३ फेब्रुवारी - ज्योत्स्ना लेले यांचा जन्मदिन**

ज्योत्स्ना लेले अनुवादित चार पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १०१५/- । सवलत किंमत ५९९/-**
२३ फेब्रुवारी ते २४ फेब्रुवारी

**२४ फेब्रुवारी - सुचित तांबोळी यांचा जन्मदिन**

'मुलांच्या समृद्ध जीवनासाठी' पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १२९/-**
२४ फेब्रुवारी ते २५ फेब्रुवारी

**२४ फेब्रुवारी - आ. बा. पाटील यांचा जन्मदिन**

'बोन्साय', 'घरातील बाग', 'शेती करू फायद्याची', 'सुंदर आपली फळबाग', 'सुंदर आपली फुलबाग' पुस्तकसंचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ८२०/- । सवलत किंमत ४९९/-**
२५ फेब्रुवारी ते २६ फेब्रुवारी

**२५ फेब्रुवारी - डॉ. आशिष बोरकर यांचा जन्मदिन**

'स्थूलतेला करा टाटा' पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ८९/-**
२५ फेब्रुवारी ते २६ फेब्रुवारी

**२७ फेब्रुवारी - मराठी भाषा गौरवदिन**

कमीत कमी १८००/- रुपयांच्या खरेदीवर ४०टक्के विशेष सवलत (या सवलतीत 'स्वामी', 'श्रीमानयोगी', 'संभाजी' ही पुस्तके समाविष्ट नाहीत तसेच एका पुस्तकाची एकच प्रत खरेदी करता येईल)
२७ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी

**२७ फेब्रुवारी - अशोक पाथरकर यांचा जन्मदिन**

अशोक पाथरकर अनुवादित आठ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २७६०/- । सवलत किंमत १६६९/-**
२७ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी

**२८ फेब्रुवारी - राष्ट्रीय विज्ञान दिन**

**संच १ :** 'वैज्ञानिक खेळणी', 'छंदातून विज्ञान', 'वाचनातून विज्ञान', 'खेळणी विज्ञानाची', 'साधी यंत्रे', 'विज्ञानातील रंजकता', 'विज्ञानातील गमती जमती', 'अंतरिक्षाच्या अंतरंगात', 'प्रेमाचा रेणू', 'अंतराळातील मृत्यू',

‘अश्मजीव’, ‘संकरित’, ‘देव? छे! परग्रहावरील अंतराळवीर!’, ‘पृथ्वीवर माणूस उपराच!’, ‘अज्ञाताचे विज्ञान’ या पुस्तक संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २१५०/- । सवलत किंमत १३४९/-**

**संच २ :** तंत्रज्ञानाची मुळाक्षरे भाग-१, तंत्रज्ञानाची मुळाक्षरे भाग-२, असे घडले सहस्रक, प्रयोग वनस्पती विज्ञानाचे, अंतरिक्षाचा वेध, ए टू झेड विज्ञान, विज्ञानातील सरस आणि सुरस, नॉस्त्रादेमसची भविष्यवाणी, फक्त खेळण्यांसाठी, खेळणीच खेळणी, खेळणी विज्ञानाची, विज्ञान गमती, विज्ञान जमती, चला प्रयोग करू या! (तीन पुस्तकांचा एकत्र संच) या पुस्तक संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २१७०/- । सवलत किंमत १३५९/-**

**संच ३ :** ‘गार्डिअन’, ‘जॉर्ज अॅन्ड द बिग बँग’, ‘जॉर्जेस कॉस्मिक ट्रेझर हंट’, ‘जॉर्जेस सिक्रेट की टू द युनिव्हर्स’, ‘रोबॉट फिक्सिंग’, ‘स्वप्नचौर्य’, ‘असे शास्त्रज्ञ, असे संशोधन’, ‘आपल्या पूर्वजांचे विज्ञान’, ‘आपल्या पूर्वजांचे तंत्रज्ञान’, ‘शास्त्रज्ञांचे जग’ या पुस्तक संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २७०५/- । सवलत किंमत १६९९/-**

२८ फेब्रुवारी ते १ मार्च

## २८ फेब्रुवारी - स्टीव्ह मार्टिनी यांचा जन्मदिन

स्टीव्ह मार्टिनी यांच्या तीन पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०८०/- । सवलत किंमत ६४९/-**

२८ फेब्रुवारी

## १ मार्च - पांडुरंग कुंभार यांचा जन्मदिन

‘उधाण’ या कथासंग्रहावर विशेष सवलत

**मूळ किंमत १३०/- । सवलत किंमत ७९/-**

१ मार्च ते २ मार्च

## ३ मार्च - जागतिक वन्यजीवन दिन

‘निर्व्याज प्रेम’,‘एका प्राणिसंग्रहालयाची गोष्ट’, ‘सफारी आफ्रिकेतील’, `EAT SPRAY LOVE', ‘मी एरिक’, ‘बोनोबो : एक शांतिदूत!’, ‘आपली सृष्टी’ (१० पुस्तकांचा सेट) या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २५३०/- । सवलत किंमत १६१९/-**

३ मार्च ते ५ मार्च

**३ मार्च - मेधा मराठे यांचा जन्मदिन**

'मातीचे मम अवघे जीवन' पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १८९/-**
३ मार्च ते ४ मार्च

**४ मार्च - लैंगिक शोषण विरोधी दिन**

'द रोड ऑफ लॉस्ट इनोसन्स', 'हरवलेले बालपण', 'द काइट रनर', 'ॲन आय फॉर ॲन आय', 'डिनायल : अ मेमॉइर ऑफ टेरर', ''मी अनीता राकेश सांगतेय...'', 'इन द नेम ऑफ ऑनर', 'सर्कल ऑफ लाइट', 'मिराज', 'फिफ्टी इयर्स ऑफ सायलेन्स'(मराठी), 'माझी ललाटरेषा', 'आलो अंधारी', 'आमेन', 'द प्राइस ऑफ लव्ह', 'शेम', 'सेक्स वर्कर' या पुस्तक संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३४७०/- । सवलत किंमत २०९९/-**
४ मार्च ते ५ मार्च

**४ मार्च - प्रिया कुमार यांचा जन्मदिन**

'परवाना जगण्याचा', 'प्रतिरूप' या पुस्तकसंचावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४४५/- । सवलत किंमत २९९/-**
४ मार्च ते ५ मार्च

**४ मार्च - खालिद हुसैनी यांचा जन्मदिन**

खालिद हुसैनी लिखित तीन पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**मूळ किंमत १०८०/- । सवलत किंमत ६९९/-**
४ मार्च ते ५ मार्च

**४ मार्च - दिप्ती जोशी यांचा जन्मदिन**

'नि:शब्दाचे मौन' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १४०/- । सवलत किंमत ८९/-**
४ मार्च ते ५ मार्च

**५ मार्च - नीलिमा भावे यांचा जन्मदिन**

'नष्टनीड' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १४०/- । सवलत किंमत ८९/-**
५ मार्च ते ६ मार्च

**७ मार्च - पिअर्स पॉल रीड यांचा जन्मदिन**

'अलाइव्ह' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १७०/- । सवलत किंमत १०९/-**

७ मार्च ते ८ मार्च

**७ मार्च - ई. एल. जेम्स यांचा जन्मदिन**

'फिफ्टी शेड्स डार्कर', 'फिफ्टी शेड्स फ्रीड', 'फिफ्टी शेड्स ऑफ ग्रे' या पुस्तक संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २१००/- । सवलत किंमत १३५९/-**

७ मार्च ते ८ मार्च

**८ मार्च - रश्मी बन्सल यांचा जन्मदिन**

रश्मी बन्सल लिखित तीन पुस्तकांवर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८२०/- । सवलत किंमत ५४९/-**

८ मार्च ते ९ मार्च

**८ मार्च - जागतिक महिला दिन**

'रुपेरी सिंधू', 'क्रांतियोगिनी भगिनी निवेदिता', 'कर्मयोगिनी', 'चिकन सूप फॉर द वूमन सोल'-भाग २ आणि भाग ३, 'नोबेल ललना' भाग-१ आणि भाग-२, 'स्वप्नाकडून सत्याकडे', 'अंतराळवीर सुनिता विल्यम्स', 'अ‍ॅज आय सी... : भारतीय पोलीस सेवा...', 'अ‍ॅज आय सी... नेतृत्व आणि प्रशासन...', *'अ‍ॅज आय सी...* स्त्रियांचे सक्षमीकरण...', 'बी द चेंज... भ्रष्टाचाराशी लढा', 'आय डेअर', 'इट्स ऑलवेज पॉसिबल', 'मजल दरमजल', 'व्हॉट वेंट रॉंग अँड व्हाय', 'दयादीपिका फ्लॉरेन्स नाइटिंगेल', 'जाणती राणी महाराणी ताराबाई', 'कृष्णसखी राजराणी मीराबाई','ममतेची 'मूर्ती मदर तेरेसा', 'रणरागिणी दुर्गाराणी', 'सती साध्वी देवी अहिल्या', 'बंधमुक्त होताना...', 'ब्रह्मकन्या', 'माय डॉटर माय मदर',

**संचाची मूळ किंमत ५१८०/- । सवलत किंमत ३१०९/-**

८ मार्च ते १० मार्च

**११ मार्च - अर्ल स्टॅन्ले गार्डनर यांची ५०वी पुण्यतिथी**

अर्ल स्टॅन्ले गार्डनर लिखित १० पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २०९०/- । सवलत किंमत १०९९/-**

११ मार्च ते १३ मार्च

**१२ मार्च - यशवंतराव चव्हाण यांचा जन्मदिन**

'वादळमाथा ते १९६५ भारत-पाक युद्ध', 'पहिली फेरी' या पुस्तकसंचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५४५/- । सवलत किंमत २७९/-**

१२ मार्च ते १३ मार्च

**१४ मार्च - रा. वा. शेवडे गुरुजी यांचा जन्मदिन**

रा. वा. शेवडे गुरुजी लिखित २१ चरित्र मालिका संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २०८०/- । सवलत किंमत १३९९/-**

१४ मार्च ते १६ मार्च

**१५ मार्च - संजीवनी मुळे यांचा जन्मदिन**

'अनोळखी स्वर्गमंदिरात' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३००/- । सवलत किंमत १७९/-**

१५ मार्च ते १६ मार्च

**१५ मार्च - जागतिक विकलांग दिन**

'लाइफ विदाउट लिमिट्स', 'चाकाची खुर्ची', 'आंधळी', 'आंधळ्याचे डोळे', 'क्षितिजापार' या पुस्तकसंचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०७०/- । सवलत किंमत ६९९/-**


१५ मार्च ते १६ मार्च

आमचे लेखक-अनुवादक यांच्या जन्मदिनानिमित्त तसेच दिनविशेषावर आधारित विषयावरील पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖**
**अधिक माहितीसाठी संपर्क**
फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२
Whats App No. : ९४२०५९४६६५
website : www.mehtapublishinghouse.com

५वी आवृत्ती

# मंद्र




**डॉ. एस्. एल्. भैरप्पा**

अनुवाद

**उमा वि. कुलकर्णी**

**किंमत : ४७०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

किती तरी वेळानंतर भोसलेचा आवाज ऐकू आला,

‘कलेच्या क्षेत्रात यानं आपल्याला स्वर्ग भेटवला! पण कलाकाराच्या अंतरंगात डोकावलं तर तिथं वेगळंच असतं. का हा विरोधाभास?’

‘मलाही हाच प्रश्न अनेकदा छळत असतो!’ कुलकर्णी म्हणाले.

कला आणि कलाकार यामधील अनाकलनीय नात्याचा परखड शोध...

डॉ. एस्. एल्. भैरप्पा यांच्या प्रतिभासंपन्न नजरेतून!

## पुस्तक परिचय



# नागकेशर




श्री. विश्वास पाटील यांच्या सामाजिक आणि ऐतिहासिक कादंबऱ्या मराठीबरोबरच राष्ट्रभाषा हिंदी तसेच कन्नड, गुजराती आदी भाषांमध्ये लोकप्रिय ठरल्या आहेत.

त्यांच्या 'झाडाझडती' या कादंबरीस १९९२चा साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला. तसेच या कादंबरीच्या वाङ्मयीन वैभवाबद्दल ज्येष्ठ लेखिका इंदिरा गोस्वामी यांनी गौरवोद्गार काढले आहेत; तर श्रेष्ठ बंगाली साहित्यिक श्री. सुनील गंगोपाध्याय यांनी 'देश' या पाक्षिकामध्ये 'महानायक' कादंबरीवर स्वतंत्र लेख लिहून तिच्या संशोधनाची तसेच गांधी, नेहरू, सुभाष या उत्तम व्यक्तिरेखांबद्दल प्रशंसा केली आहे. त्यांच्या 'पानिपत' कादंबरीस 'प्रियदर्शनी' पुरस्कार आणि कलकत्त्याच्या भाषा परिषदेचा वाङ्मय पुरस्कार मिळाला आहे.

श्री. पाटील यांना त्यांच्या विविध वाङ्मयीन कृतींसाठी आजवर एकूण सत्तर पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. अलीकडेच प्रकाशित झालेल्या त्यांच्या 'लस्ट फॉर लालबाग' या मुंबईतील गिरणी कामगार लढ्याच्या धगधगत्या पार्श्वभूमीवरील कादंबरीने त्यांच्याकडे वाचकांचे लक्ष वेधले आहे. त्यांच्या चोखंदळ साहित्यिक अभिरुचीची साक्ष म्हणजे मेहता प्रकाशनाने प्रसिद्ध केलेला 'बंदा रुपाया' हा ग्रंथ होय.

श्री. पाटील यांनी भारतीय प्रशासकीय सेवेत असताना महाराष्ट्र विमानतळ प्राधिकरणाचे उपाध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी या नात्याने धडाडीची कामगिरी केली. अनेक वर्षे प्रलंबित असलेल्या शिर्डी आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम अवघ्या १४ महिन्यांच्या अल्पावधीत पूर्ण केले. पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या जागेचा प्रलंबित प्रश्न मार्गी लावून पुरंदर येथे नव्या विमानतळासाठी जागा निश्चित केली. तसेच मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विनंती करून तेथील विमानतळास संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळ असे नाव द्यायचे निश्चित केले.




**विश्वास पाटील**

*ज्यांची घराणी राजकारणात आहेत आणि ज्यांच्या घरात राजकारण आहे, अशा मुरब्बी नेत्यांनी, त्यांच्या निष्ठावंत, भाबड्या कार्यकर्त्यांनी, बेरकी नातेवाइकांनी आणि वेशीत घोडं अडवणाऱ्या विरोधकांनी दिलखुलास आस्वाद घ्यावी अशी...*

*सहकारमहर्षी डोंगरे-देशमुख यांच्या शलाका आणि नेत्रादेवी या दोन सुनांमधील सत्तासंघर्षाची, वादळी कुटुंबघेणी कर्मकहाणी*

***नागकेशर !***

*नागकेशराचा वेल हुमनी किड्यापेक्षा जालीम! रानात उगवला तर बोल-बोल म्हणता अख्खा फड खाऊन फस्त करतो.*

*‘पोट’ आणि ‘पोटचं’ या दोनच बिंदूभोवती गरगरा फिरणारा पुरोगामी महाराष्ट्र ! गल्लीपासून दिल्लीपर्यंत पेटत जाणाऱ्या डावपेचांची आणि निवडणुकांच्या हैदोसाची सुरंगी वात*

***नागकेशर!***

('नागकेशर' पुस्तकातून...)

एकदा आपल्या कार्यालयातून बाहेर पडले की, प्रिन्सना घरी पोहोचायला पाच-सात मिनिटे लागायची. ते आपल्या 'रिव्हर फ्रंट' नावाच्या वडिलोपार्जित बंगल्यात राहत. बापूनगर म्हणजे पूर्वीचे सोंगाचे पारगाव. गाव ओलांडले की, शिवाराच्या पलीकडे लांबून गजरा नदी एक छानसा अर्धवर्तुळाकार वळसा घेते. तिथेच नदीच्या पल्याड एक छोटीशी टेकडी. तिच्याच पायथ्याशी नदीच्या पात्रात पाय सोडून बसलेल्या साधूसारखा तो राजेशाही बंगला. बंगल्याच्या डाव्या अंगावर अर्ध्या एकरामध्ये एक प्रचंड वटवृक्ष पसरलेला. खूप जुनापुराणा. मुळ्यांत मुळ्या आणि पारंब्यांना मांडवासारख्याच फुटत गेलेल्या पारंब्या. त्या तर झिम्म्याच्या खेळासाठी हातांत हात गुंफून उभ्या राहिलेल्या मुलींसारख्या दिसायच्या. वडाच्या त्या प्रचंड पसाऱ्यामध्ये दोन मोठे वाढलेले पिंपळवृक्षसुद्धा होते.

एकदा 'रिव्हर फ्रंट'मध्ये प्रिन्स साहेब पोहोचले की, सारे काही निवान्त असायचे. कारण तिथे बापूराव डोंगरे-देशमुख कधीच मुक्कामी राहत नसत. मात्र, या वास्तुबद्दल त्यांच्या मनामध्ये कमालीची आत्मीयता आणि आकर्षण होते. त्यांच्या पत्नी 'बड्या मां' तथा सुजातादेवींनी तिथल्या प्रत्येक पाषाणाकडे आणि विटेच्या तुकड्याकडेही लक्ष देऊन स्वतःच्या देखरेखीखाली तो बंगला बांधून पूर्ण केला होता. याच बंगल्यात राहायला आल्यावर बापूरावांच्या प्रगतीचे अश्व चारही दिशांनी उधळले. पत्नी सुजाता आणि लाडकी लेक संध्या यांच्या सहवासात जीवनातले अत्यंत सौख्याचे दिवस त्यांनी इथेच पाहिले होते. अजून या वास्तूवर 'बड्या मां'ची गडद छाया आहे, असे पारगावचे लोक बोलत. मात्र, त्यांच्यानंतर रात्री इकडे फिरकण्याचे बापूरावांनी कटाक्षाने टाळले होते. अनेकदा ते सकाळी गडबडीने इथेच नाश्त्यासाठी पोहोचत. नेहमीसारखा त्यांच्यासोबत वीस-पंचवीस लोकांचा थवा असे. अनेक लोक भेटीगाठीसाठी आणि चिठ्ठीचपाटीसाठी त्यांना येऊन भेटत. ते जेव्हा इकडे निघत, त्यांच्या आधीच कारखान्याच्या व्हीआयपी गेस्ट हाउसवरच्या साऱ्या बावर्चींना ती बातमी कळलेली असे; त्यामुळेच 'रिव्हर फ्रंट'मधील नाश्त्याला कुठल्याच गोष्टीची ददात राहत नसे.

रात्रीच्या वेळी मात्र तो बंगला गूढपुराणपुरुषासारखा खूपच गंभीर दिसायचा. तिथे वास्तव्यास असणारे प्रिन्स, त्यांची गिटार, तो गूढबंगला आणि

दारात कधी खळखळ तर कधी संथ वाहणारे गजरामाईचे पात्र या चारच गोष्टी एकमेकींची काळजी वाहायच्या.

मर्सिडीजच्या हेडलाइटचा झोत आजूबाजूच्या हिरव्या पिकांवर पडत होता. त्या प्रखर दुधारी प्रकाशात उसाची ओली पाने चमकून उठायची. गजरेकाठची गाळ माती खूप उपजाऊ; त्यामुळेच की काय उसाचे पीक तरारून उठायचे आणि अगदी कानाच्या पाळीपर्यंत उंच वाढायचे. आता ऊसमळ्यातील पाने रातवाऱ्याने हेलकावत होती. हिरव्या पानांच्या डोक्यावरचे पांढरे तुरे जागीच नाचत होते. हलका वारा. त्यात काळोख मिट्ट होता. तांबूस ऱ्याड मातीने भरलेली एक पाणंद डाव्या बाजूने सरकून मागे गेली. रस्त्याच्या शेजारी उभ्या असलेल्या कोणा गूढव्यक्तीचा प्रिन्स साहेबांना भास झाला. तसा त्यांनी अर्जंट ब्रेक लावून मर्सिडीज मध्येच रोखली. हळूहळू ती रिव्हर्सने पाठीमागे येऊ लागली, तेव्हा त्या अंधाराच्या कोपऱ्यावर थंडीत कुडकुडत उभी असणारी एक व्यक्ती त्यांना दिसली. ती कोणी शेलाट्या बांध्याची तरुण स्त्री होती.

जीपांमध्ये बसलेल्या मंडळींनी धडाधड खाली उड्या ठोकल्या. प्रिन्स साहेबांची नेमकी अडचण काय, हे त्यांना कळेना. एकतर त्यांनी लग्न होईपर्यंत घर सोडू नये, कार्यालयातही जाऊ नये; असे बापूरावांनी बजावून सांगितले होते. कामातून सुट्टी घ्या, असे राघव शास्त्रींनीसुद्धा बजावून सांगितले होते. त्यातच त्यांचे हे असे आडवळणी रस्त्यात अचानक थांबणे. काय घडले म्हणून बाउन्सर मंडळींनी सभोवती गराडा घातला होता.

प्रिन्सने अंधारात मोबाइलचा टॉर्च मारला. तो जागीच हादरला. ती शलाकाच होती. तिच्या अंगावरची साडी कमालीची चुरगळलेली. वाऱ्याने केस विस्कटलेले. अंधारातल्या एखाद्या वडपिंपळाच्या झाडावर अचानक हडळ प्रकट व्हावी, तसे तिचे रूप. तिच्याशेजारी तिची बंद पडलेली स्कूटर. ती स्कूटरही जागोजागी अशी चेपून गेली होती की, तिच्यावर एखाद्या मोठ्या रानजनावराने हल्ला चढवावा.

''ओह! शलाका? अरे, अशा बुडूक अंधारात चाललात कुठे? काय प्रकार काय?''

''साहेब, असे मध्येच नका थांबू. अलीकडे उसात रानडुकरांचा एक कळप घुसलाय. परवा तर एका गाडीच्या चाकातच–''

प्रिन्सने चुरचुऱ्या जिभेच्या बाबू ड्रायव्हरकडे एक जळजळीत कटाक्ष

टाकला. ''धिस इज नन् ऑफ युअर बिझनेस.'' अशा धारदार नजरेने त्याच्याकडे बघितले. पुन्हा शलाकाला विचारले, ''अरे, इकडे काय करता आहात तुम्ही?''

तिच्या ओठातून एक नाही की दोन नाही. चेहरा तणावाच्या तडाख्याने जणू चेपून गेलेला. शेजारी पडलेल्या स्कूटरसारखा. काही वेळापूर्वी ती खूप रडली असावी. मी आता तरी काय बोलू, असा भाव तिच्या चेहऱ्यावर होता. आपली सिक्युरिटीची फौज, पीए, ड्रायव्हर यांच्यासमोर विषय अधिक छेडण्यात अर्थ नव्हता. प्रिन्स बोलले, ''कम. डोन्ट वेस्ट टाइम. या, आत या. बाबू, मॅडमना घे बरं आत.''

आज्ञाधारक बाबू पटकन खाली उतरला. त्याने झटकन पुढचे दार उघडले. शलाकाला प्रिन्सबाबूंच्या शेजारी फ्रंटसीटवरच बसायचा इशारा केला. प्रिन्सने करारी सुरामध्ये बाउन्सर्सना सुनावले, ''यूवऽऽ जस्ट फॉलो मी.''

दोन्ही जीपमधली मंडळी आणि विशेषतः बाउन्सर्स बेचैन झालेले. त्यांची अंगे घामेजली. लग्नाच्या तोंडावर प्रिन्सना सांभाळायच्या बापूरावांच्या सक्त सूचना त्यांना आठवल्या. लग्नाच्या मागचे-पुढचे दिवस खूपच नाजूक आणि बाधिकारी असतात, याची त्यांना भीती होती.

त्या छोटेखानी पुलावरून मर्सिडीज पुढे चाललेली. खालून काळ्याशार पाण्याला संथ हेलकावे देत गजरामाई वाहत होती. मध्येच मासे डोके वर काढत जलपृष्ठावर येत होते. पुन्हा झटकन डुबकी घेत, बुडबुडे निर्माण करत होते. नदीतटाच्या दोन्ही बाजूंची ती किंजळ, उंबर वृक्षांची दाट झाडी अंगावर काळी पांघरुणे घेऊन मारहाणीसाठी दबा धरून बसलेल्या मारेकऱ्यांसारखी दिसत होती. पल्याडचा नदी तीरावरचा 'रिव्हर फ्रंट' बंगला रोषणाईने इतका चमकत होता की, त्याची उजळून गेलेली प्रतिमा समोरच्या नदीपात्रात लख्ख उठून दिसत होती. आपल्या भल्यामोठ्या पोर्चमध्ये प्रिन्सने मोटार थांबवली. तसे बंगल्यावरचे सिक्युरिटी गार्ड्स आणि आतल्या नोकरांचा थवा झटकन बाहेर आला. त्यात लग्नकार्यासाठी राबणारे कार्यकर्तेही होते.

प्रिन्सने शलाकाला खाली उतरायचा इशारा केला; परंतु समोरची ती भव्य आणि अंगावर येणारी वास्तू, ते अवाढव्य पोर्च आणि हत्तीच्या पायासारखे खांब. तो सत्तेचा आणि रुबाबाचा नजारा पाहताना शलाकाच्या दोन्ही पायांतून भीतीचे गोळे उमटून गेले. समोरच्या गर्दीत पीए परीटचा चेहरा तिच्या

ओळखीचा होता. बाकी सारे गोंधळून तिच्या तोंडाकडे टकमक बघत होते. तिच्या अंगावरची चुरगळलेली साडी आणि तिचा तो कमालीचा संभ्रमित चेहरा. तिच्यासोबत धावणारे हरणीसारखे तिचे ते चपळ, रसरसते तारुण्य मात्र लपत नव्हते. तिच्या आकर्षक कमनीय बांध्याने तिच्या अंगावरच्या वस्त्रांचे ते चुरगळलेपण केव्हाच बाजूला फेकून दिले होते. प्रिन्सने ''चला, आता निघा सारे. खूप वेळ झालाय. उद्या सकाळी भेटूच.'' असे म्हणत सर्वांना कटवले. पीएकडे रोखून पाहत सूचना केली, ''मी बोलावल्याशिवाय माझ्या हॉलकडे कोणालाही पाठवायचे नाही.''

प्रिन्सची अभ्यासिका कम खोलीसुद्धा बरीच ऐसपैस होती. मध्ये रुंद शिसवी टेबल. समोरच्या खुर्चीवर जास्तीतजास्त अंग आकसून बसायचा प्रयत्न करणारी शलाका. आतापर्यंत आवतीभोवती ड्रायव्हर आणि बाउन्सर मंडळींचा मेळा होता; त्यामुळेच प्रिन्सचा आवाज दबलेला. मात्र, आता मोकळीक मिळताच तो खोल काळजीभऱ्या आवाजात बोलला, ''इफ यू डोंट माइंड– जरा इकडे या कशा. थोडा खांद्यावरचा पदर करता बाजूला?''

हा एवढा मोठा बंगला, ही अशी अवेळ आणि तिथे एवढ्या मोठ्या कर्तृत्ववान तरुण पुरुषासमोर एकट्याने बसणे. त्या साऱ्या दबावाने शलाका पहिलीच आतून थरथरत होती. तिने अधिक विचार न करता आपल्या खांद्यावरचा पदर बाजूला टाकला. तिच्या अंगात स्लीवलेस झंपर होते; त्यामुळेच काही वेळापूर्वी तिच्या गोऱ्या खांद्यावरून मागच्या पाठीवर नागिणीसारखा उतरलेला तो काळानिळा वळ त्याला स्पष्ट दिसला. कसल्याशा प्रहाराने झणाणून उठलेली ती सुजलेली रेष तशी ताजीतवानीच होती.

''अच्छा! म्हणजे पुन्हा मारझोड? कोण नवरा आहे की राक्षस?'' प्रिन्स वैतागला. त्याने आपल्या खुर्चीच्या गबदुल्या हातोप्यावरची अटॅच केलेली बेल दाबली. पटकन नोकराला बोलावून घेतले. मलम मागवले. त्याने ते स्वतःच तिच्या दंडाला लावण्याचा प्रयत्न केला. अगदी निर्व्याजपणे; पण ती संकोचली. थोडीशी फटकून बाजूला उभे राहत स्वतः मलम लावू लागली.

''कशानं मारलं हो त्यानं?''

''हंटरनं.''

''हंटरऽ,'' प्रिन्स हसत विचारू लागला, ''काय तुमच्या घरी घोड्यांचा तबेलाबिबेला आहे काय?''

''घोडी नाहीत; पण मी आहे की, रोज उपलब्ध– जनावराचा मार खायला. बदडून निघायला.''

क्षणभर आपले डोळे मिटत आणि खोल श्‍वास घेत समाधानी सुरात प्रिन्स बोलला, ''थँक गॉड, डोक्यात अन्य कोणता विचार येऊ न देता तुम्ही तडक माझ्याकडे यायलाच निघालात ते. नाहीतर अशा वेळी मनुष्याच्या मनामध्ये कसले कसले विचार येतात.''

''सॉरी, डोकं बधिर झालंय. नेमकं आठवत नाही,'' शलाका.

''कशाबद्दल?''

''मी नेमकी चालली होती कुठे? तुमची मदत मागायला की बाजूच्या नदीत जीव द्यायला?''

तिच्या त्या कारुण्याने भरलेल्या स्वराने प्रिन्सच्या काळजात कालवाकालव झाली, ''अशी जीव देण्याची भाषा काय करता? तुम्ही तर जीवाला जीव देणारे लोक?''

''समजले नाही?'' शलाका.

''कसं कोण विसरणार तो पंधरा दिवसांपूर्वीचा स्कूलच्या ट्रिपला झालेला अपघात? त्या चिल्या-पिल्यांच्या बचावासाठी तुम्ही सरकारी दवाखान्यात जाळलेली ती अखंड रात्र! आय ॲम प्राउड ऑफ यू शलाका.''

भिजल्या पाणजांभळीच्या झाडाखाली उभी असल्यासारखी शलाका एकीकडे गारठून गेली होता अन् डोळ्यांतून झिरपणारे पाणी रूमालाच्या टोकाने टिपतही होती. ती रडवेल्या, घोगऱ्या आवाजात बोलली, ''खरंच, काळीज फाटून गेलंय हो माझं– माझ्या तीन वर्षांच्या गोळ्यासाठी. कसा असेल तो?''

''का बरं?''

''आज तर त्यानं त्या चिमुकल्याला रागानं वर उचलून खाली आपटलं. तिथे तांदळाचं पोतं पडलं होतं, म्हणून तो वाचला. नाहीतर उघड्या फरशीवर कपाळमोक्षच झाला असता हो माझ्या चिमुकल्याचा.''

''कोणी जवळ नसतं का त्याच्या?''


''आहेत शेजारच्या बनसोडे काकू. त्याच अलीकडे माझ्यापेक्षा त्याची काळजी अधिक घेतात.''

''तुम्हाला जायचं आहे का माघारी घरी? करू तशी व्यवस्था? पाठवू

# फ्रीडम अॅट मिडनाइट

**डॉमिनिक लॅपिए**
**लॅरी कॉलिन्स**

अनुवाद
**माधव मोर्डेकर**




**किंमत : ३९५/-रु । पोस्टेज : ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

‘भारतावर राज्य करण्याची जबाबदारी ब्रिटिश वंशावर नियतीने कशी काय सोपवली हे एक अतर्क्य, अगम्य असे गूढच आहे.’

— रुड्यार्ड किपलिंग

‘भारतातील ब्रिटिश सत्तेवर आपण आपल्याच हाताने उदक सोडत आहोत. आपण आपल्याच हाताने हा धोंडा पायावर पाडून घेत आहोत. त्यातून होणारी हानी आपल्या दृष्टीने अंतिम व आपल्या एकूण अस्तित्वाला धोक्यात आणणारीच ठरेल. यथावकाश, आपल्याला जगातील एक किरकोळ प्रतीची सत्ता बनवणाऱ्या एका प्रक्रियेची ती सुरुवातच ठरणार यात मला तर शंका वाटत नाही.’

— विन्स्टन चर्चिल
हाऊस ऑफ कॉमन्स मधील एका भाषणात फेब्रुवारी १९३१

‘नियतीशी आपण अनेक वर्षांपूर्वी एक करार केलेला होता. आज तो क्षण आला - आपल्या वचनबद्धतापूर्तीचा. त्या वेळी केलेली आपली ती प्रतिज्ञा आज पूर्ण होत आहे... आजच्या या दिवशी, जेव्हा घड्याळात मध्यरात्रीचा टोला पडेल, त्या वेळी जग झोपेत असेल एकीकडे पण आपल्या भारतात मात्र प्रत्येक जण एका नव्या जीवनाचा व स्वातंत्र्याचा अनुभव घेण्यासाठी जागा असेल. इतिहासात असा एखादा क्षण येतो, पण तोही क्वचितच! त्या क्षणी आपण ‘जुने जाऊ द्या मरणालागुनि’ म्हणत एका नव्या वळणावर पदार्पण करतो. तो क्षण असतो एका युगान्ताचा, राष्ट्रात्म्याच्या जागृतीचा - ज्याचा आवाज सतत दाबून धरण्यात आलेला होता - हुंकार कानी पडण्याचा हा एक अलौकिक क्षण आहे.’

— जवाहरलाल नेहरू
१४ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्री भारताच्या
घटना समितीसमोर भाषण करताना

गाडी?''

''जाईन हो मी; पण...?'' ती अडखळली. ''मला बघून पुन्हा तो सैतान रमेश माझ्या अभिषेकचा राग राग करेल. फटके मारून जीव घेईल त्याचा.''

आता खरा मुद्दा प्रिन्सच्या ध्यानात आला. त्याने तत्काळ आपल्या पीएला– परीटला बोलावले. त्याची ओळख करून देत तो शलाकाला बोलला,

''हा माझा इथला सर्वांत कॉन्फिडेन्शिअल माणूस. आत्ताच जाईल तो तुमच्या मुलाकडे. भेटेल तुमच्या शेजारच्या काकूंना. दवाखाना, मध्येच कडमडला तर तुमचा नवरा– साऱ्या गोष्टींची हा काळजी घेईल.'' शलाकाने परीटला बाजूला घेतले. जागरूकपणे त्याला सर्व सूचना दिल्या. एक जीप घेऊन परीट लागलीच कामगिरीवर निघून गेला.

''किती वाजले हो?'' शलाका.

''रात्रीचे साडेदहा-अकरा झाले असतील.''

''तुमची कामं खोळंबली असतील हो– बसते पलीकडे. नाहीतर मी असं करते इथून निघतेच– जाऊ द्या मला.''

''कुठे जाणार तुम्ही अशा अपरात्री?''

''पाहीन, बसेन कुठंतरी. वाटेत गावचं एसटी स्टँड आहे ना! तिथं या वेळीही खोळंबलेल्या प्रवाशांची गर्दी असते. काढीन रात्र तिथे उजाडेपर्यंत.''

''वा! असं कुठं झालंय? यू आर डिअरेस्ट फ्रेंड ऑफ माय कझीन देवी. ती काय म्हणेल?'' प्रिन्सला एकदम बोलता बोलता आठवण झाली. तो हरखून किंचाळला, ''अरे हो, आपण देवीशी बोलू या का?''

प्रिन्सने लगेचच देवीला फोनवर घेतले, ''डिअर, झोपलीस की काय तू? पुण्यापर्यंत पोहोचली आहेस ना? बरं, इथं तुझी जीवश्च कंठश्च मैत्रीण आलीय. बोलणार तिच्याशी?''

''या वेळी? कोण रे?''

''शलाका... द ग्रेट!''

''ती काय करतेय मेली तिथं?''

''ती माझी गेस्ट आहे– व्हीआयपी गेस्ट. लग्नासाठी आलीय इथं. इथंच राहणार आहे ती.''

''बेवकूफ आहेस काय? अशा जवान, उफाड्याच्या स्त्रीला राहायची सक्ती करतोस? यू नॉटी.''

पलीकडून देवी खिल्ली उडवू लागली.

''मी काय करणार गं तुझ्या मैत्रिणीला,'' शलाकाकडे नटखट नजर फेकत प्रिन्स देवीला म्हणाला, ''पण ए, देवी. एक गंमत ऐक ना, खरं तर मला वाटतं, तुझ्या या मैत्रिणीशीच लग्न करावं आणि सुखी व्हावं.''

''थुत् जा जा. एखादी जीप पाठव तिला सोडायला. मलाही झोप आलीय. तुझ्या लग्नासाठी उद्या यायचं आहे ना राबायला? चलऽ बाय!''

प्रिन्सने हसत हसत फोन बाजूला ठेवला; तर समोर अपराधी आणि घाबरेघुबरे तोंड करून हात जोडत शलाका उभी होती. ती मोठ्याने बोलली, ''सॉरी सर, मी अगदी मॅड आहे. केव्हापासून मी माझ्या फाटक्या जिंदगीचं गाठोडं खोलून तुमच्या पुढे बसली आहे आणि इकडे माझ्यासारख्या मूर्ख स्त्रीला किमान जाणीव नसावी की, तुम्ही लग्नाच्या गडबडीत आहात. परवाच आहे ना लग्न? सॉरी, मी निघतेच आता.''

खोलीतून बाहेर निघत असलेल्या शलाकाला रोखत प्रिन्स बोलला, ''फोनवर ऐकलंत ना तुम्ही? यू आर रिअली माय डिअरेस्ट गेस्ट. मी तुम्हाला जाऊ देणार नाही.''

''कशी थांबू मी लग्नघरात? आधी कळवायचं होतंत; एखादी बरी साडी तरी आणली असती बरोबर.''

प्रिन्स छानसा हसला. त्याने लंबी बेल वाजवली. तसा सावंत पीए धावत पुढे आला. झुकून उभा राहिला. प्रिन्सने विचारले, ''काय रे सावतंऽ? आपल्या बापूनगरच्या मार्केटमधलं ते साड्यांचं सर्वांत मोठं स्टोअर कोणाच्या मालकीचं?''

''चंदू मारवाड्याचं.''

''लागलीच फोन करा. नो रिप्लाय आला, तर माणसं पाठवा त्याच्या घरी. एका तासाच्या आत त्याला माझ्यासमोर हजर करा. या मॅडमसाठी लग्नाच्या अव्हेलेबल असतील त्या उत्तमातल्या उत्तम साड्या– त्या चाहतील तेवढ्या लगेच, खरेदी करायचा बंदोबस्त करा. बी क्वीक, फास्ट, टाइम इज रनिंग आउट.''

प्रिन्सला भूक लागली होती. शलाकाचे तर जेवणावरचे मनच उडालेले. ती नको नको म्हणत असताना त्याने तिला डायनिंग टेबलकडे नेले. दोघांनीही हलके जेवण घेतले. तोवर 'राजवाड्यावरचा बुलावा' म्हणून चंदू मारवाडी

अर्धवट झोपेतून उठून तसाच तेथे निघून आला. त्याच्यासोबत त्याच्या स्टाफचे काही लोक आणि उंची साड्यांचे पोर्टफोलिओ होते. त्या चंदेरी साड्या, रेशमी पैठणी, ती वस्त्रे पाहताना शलाकाची घाबरगुंडी उडाली होती. तिने, 'हिचा दर काय, तिचा दर किती?' अशी विचारणा सुरू केली, तेव्हा प्रिन्स आणि चंदूनेही तिला झापले, ''तुम्ही रेटची चौकशी करू नका; फक्त साड्या पसंत करा.'' रग्गड खरेदी झाली. फॉल लावूनही साड्या सकाळी दहा वाजेपर्यंत पोहोचतील, असा भरवसा देऊन आपला लेहंगा लबकछबक करून वाजवत गरगरीत देहाचा चंदू मारवाडी निघून गेला.

घड्याळाचा काटा रात्रीच्या बाराकडे सरकत होता. शेजारी आत्तेबहीण देवी हिच्यासाठीच राखून ठेवलेली खोली होती. तिच्यामध्ये विश्रांती घ्यावी, असे प्रिन्सने शलाकाला सुचविले, तेव्हा शलाका बोलली, ''प्रिन्स, खूप केलंत हो तुम्ही माझ्यासाठी. आता सोडा मला, जाऊ द्या.''

''अहो पण– ?''

''नको. लेट मी गो.''

''हे पाहा, तुम्हाला इथं राहावंच लागेल. माझ्या स्टेट गेस्ट म्हणून!'' प्रिन्सचा आवाज वाढला.

''कसं शक्य आहे ते? एकतर एवढ्या मोठ्या बंगल्यामध्ये कोणीही बाई माणूस राहताना दिसत नाही. शिवाय तुमचं परवा लग्न आहे. काय म्हणेल ती तुमची होणारी बायको?''

प्रिन्स आपला हट्ट सोडायला तयार नव्हता; तर त्याच्यासारख्या सज्जन, परोपकारी तरुणाला उगाच अडचणीत आणणे शलाकाच्या मनाला पटत नव्हते. मात्र, जसजशी रात्र वाढत होती, तसतशी शलाका बेचैन बनत होती. तिला ती मघाची घाईची खरेदी. त्या खरेदीचा दीड लाखांचा भरगच्च आकडा आठवला. अन् तिच्या काळजात धस्स झाले. का आणि कशासाठी कोणी एखाद्यावर करावा इतका खर्च? अलीकडे तिने अनुभवलेले नवऱ्याचे ते अविश्वसनीय, बेंगरूळ रूप. प्रिन्स म्हणजे त्याची थोडीशी वेगळी प्रतिकृती तर नसावी? या टोचणाऱ्या शंकेने ती अधिकच गुदमरून गेली. एकूण प्रकरण भलतीकडेच झुकत असल्याचा करपट वास तिच्या नाकाला लागला.

शलाकाने आपली पर्स पटकन पोटाशी पकडली अन् ती लागलीच बाहेर जायला निघाली. पुन्हा तिची वाट अडवत प्रिन्स अजीजीने बोलला, ''प्लीज

वेट, शलाका. थांबलात तर खूप बरं वाटेल मला. मला– मला काहीतरी वेगळं बोलायचं होतं,'' तो बोलता बोलता थबकला. वरमला. शरमला. मनामध्ये गोड गोंधळ उडाल्याने त्याला काय बोलायचे नेमके सुचेना.

त्याच्या लाजलेल्या चेहऱ्यातसुद्धा एक मिठास भाव होता. प्रिन्सचा आवाज घोगरा बनला. जन्मभर तहानलेल्या मनुष्याने एखाद्या पाण्याच्या भरल्या रांजणाकडे मोठ्या आशेने बघावे, तसे आपले डोळे शलाकाच्या चेहऱ्याकडे लावत तो बोलला, ''मला मनापासून अगदी माझ्या हृदयापासून वाटतं की, माझं लग्न झालं तर ते फक्त तुमच्याशीच व्हावं.''

शलाका अचानक तुटलेल्या स्प्रिंगसारखी मोठ्याने हसू लागली. तिचे ते नाठाळ हास्य लवकर थांबेना. ती आपले हसू कसेबसे दाबत बोलली, ''प्रिन्स! एवढी जहरी टिंगल उडवायला या गरिबाशिवाय दुसरं कोणी भेटलंच नाही का तुम्हाला?''

प्रिन्स वाट सोडत नाही. बाहेर जाऊ देत नाही, हे शलाकाच्या लक्षात आले. मांजर जसे उंदरांना खेळवते, तशी गरिबांची गंमत उडवायचा श्रीमंतांना छंदच असतो म्हणायचा. ती पुरती भानावर आली. आता अगदी स्पष्ट, बेधडक आणि थोडे कडक बोलणे आवश्यक आहे. नाहीतर न परवडणारा हा गुंता असाच वाढत जायचा. आता तिचा सूर उजाड, अगदी रखरखीत झाला, ''हे पाहा, मी अगदी डे वनपासून चांगली मायन्यूटली पाहते तुमच्याकडं. का कोणास ठाऊक, माझ्याबद्दल तुम्हाला एक स्ट्राँग ऑबसेशन– एक अनामिक, जबरदस्त ओढआहे. तसं असूही शकतं– मी दिसायला वाईट नाही; एखाद्या पुरुषानं सहज नादी लागावं, इतका चार्म मात्र जरूर आहे माझ्याजवळ– हे सारं कळतं हो मला; पण शेवटी काय तुमच्या पुरुषी भावनेचा– सर्वांचा शेवट एकूण एकच असतो.''

''काय एकच असतो?''

''प्रिन्स काय, देवदूत काय किंवा एखादा राक्षस काय. शेवटी सारे पुरुष मेले एकाच बिंदूकडे सरकतात. सॉरी फॉर माय हार्श वर्ड्स. बट रोज नव्या नव्या बायांचा भोग हाच तुम्हा सर्वांचा आवडता रोग बनून जातो.''

''इनफ, प्लीज इनफ! खूपच वाईट बोलताहात तुम्ही शलाका मॅडम,'' प्रिन्सला आपल्या दुःखी शब्दांना आवर घालणे कठीण झाले.

''सर, मला बापडीला इतकंच वाटतं. उद्या भलतेसलते गुंते वाढवून माझा

जीव जाण्यापूर्वी आत्ताच एखाद्यावर जीव न लावलेलं बरं!''

अशा कठोर शब्दांची प्रिन्सला शलाकाकडून अपेक्षा नसावी. तो कमालीचा दुखावला. हिरमुसला होऊन बाजूच्या कोचावर बसला. आता शलाकासाठी बाहेर पडण्याचा रस्ता मोकळा होता; परंतु आता तिच्याच जडावल्या पायांनी तिला तिथेच रोखून धरले. उगाच आपणाकडून मर्यादाभंग झाल्याची तिला जाणीव झाली; पण जीवनातील आजवरच्या अनुभवांवरून पुरुषजातीबद्दलची तिची अनुमाने मात्र ठाम होती. ती प्रिन्सला बोलली, ''सर, वाईट शब्दांबद्दल मला माफ करा. खूप चांगले आहात हो तुम्ही. यू आर सिम्पली ग्रेट! पण मी काय करू? शेवटी तुम्हीही एक पुरुषच! चलाऽ मी तयार आहे.''

प्रिन्सने घरट्यातल्या पाखराने बाहेर नजर टाकावी, तसे शलाकाकडे पाहिले. तशी ती दिलखुलास हसत बोलली, ''येस, आय ॲम रेडी! तुम्हाला माझ्याकडून जे हवं असेल, ते उरकून घ्या! पण लग्नाबिग्नाची खोटी भाषा बोलून प्लीज पुन्हा माझी गंमत उडवू नका.''

प्रिन्स हळुवारपणे उठला. थंडीवाऱ्यात सापडलेल्या एखाद्या अजान मृगासारखा शलाकाकडे सरकला. तिच्या हातांची लांबसडक बोटे पकडत बोलला, ''तुमचे माझ्याबद्दलचे निष्कर्ष शंभर टक्के चुकीचे आहेत. मी तुमच्या या मुग्ध व्यक्तिमत्त्वामध्ये फक्त कोणा एका बाईला बघत नाही. मी तुमच्यात माझ्या हरवलेल्या आईला शोधतो आहे!''

❖

**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**


**आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी**

**सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती**

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाईल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स अप नंबरवर कळवावी.

**९४२०५९४६६५**

# ट्रॅव्हलिंग टू इन्फिनिटी

## माय लाइफ विथ स्टीफन

**जेन हॉकिंग**

अनुवाद

**सुदर्शन आठवले**




**किंमत : ५९५/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.**

'ब्रीफ हिस्ट्री ऑफ टाइम' या अडीच कोटी प्रतींच्या विक्रीचा विक्रम केलेल्या शास्त्रीय पुस्तकाचे लेखक प्रोफेसर स्टीफन हॉकिंग.

त्यांची पहिली पत्नी जेन हिने या पुस्तकात त्यांच्या असाधारण वैवाहिक जीवनाचे अंतरंग उलगडून दाखवले आहे. स्टीफन आपल्या बुद्धिबळावर गगनाला गवसणी घालत असताना 'मोटर-न्युरॉन' या मज्जासंस्थांच्या महाभयंकर रोगाचे प्राणघातक हल्ले, मात्र त्याच्या शरीराला जखडून ठेवत होते. आपल्या विकलांग पतीची दिवस-रात्र, अष्टौप्रहर सेवा करणे आणि त्याच वेळी आपल्या वाढत्या कुटुंबाची काळजी वाहणे या दोन्ही कर्तव्यांचा समतोल राखण्यासाठी जेनने केलेले अथक परिश्रम, सोसलेले आघात यांचे तिने अतिशय प्रामाणिकपणे केलेले वर्णन; जे कुटुंब अशा प्रकारच्या रोगाशी सामना करीत असेल त्यांच्यासाठी अतिशय उपयोगी आणि त्यांचे मनोबल वाढविणारे, त्यांना स्फूर्ती देणारे ठरेल. पतीची असाधारण प्रज्ञा, प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत त्याने पादाक्रांत केलेली यशशिखरे आणि त्यासाठी त्याला जेनने स्वत:च्या आंतरिक शक्तीचा दिलेला बळकट आधार यांची ही कहाणी खरोखरच अविश्वसनीय वाटावी अशीच आहे. त्यातून ती अत्यंत निडर अशा प्रामाणिकपणे सांगितलेली आहे. त्यांच्या पंचवीस वर्षांच्या वैवाहिक जीवनाची क्लेशकारक अशा घटस्फोटात झालेली परिणती, त्याच्या सेवेतील एका नर्ससाठी स्टीफनने जेनला दिलेली सोडचिठ्ठी आणि जेनने एका जुन्या मित्राशी केलेला विवाह – या साऱ्याच प्रसंगातून लेखिकेच्या स्पष्टवक्तेपणाचा प्रत्यय येतो.

# अभिप्राय



## सहकार क्षेत्रातील राजकारणाचे अस्सल चित्रण

मराठी भाषेत आजवर जे साहित्य निर्माण झाले आहे, त्यात असंख्य विषय हाताळले गेले आहेत; मात्र अस्सल राजकीय लिखाण अभावानेच झाले आहे. सिनेमा, नाटकाच्या बाबतीतही असेच झाले आहे. मराठी सिनेमात ग्रामीण महाराष्ट्र दाखवला गेला आहे; मात्र एखाद दुसरा अपवाद वगळता त्यात रंगेल पाटील, संगीतबारीतील लावणी आणि यातून निर्माण झालेल्या भानगडी दाखवल्या आहेत; पण हे सारे काहीसे उथळपणे. कोणतीही कलाकृती निर्माण होते ती संबंधितांच्या अनुभवविश्वातून. अनुभवांचे हे भावविश्व जितके समृद्ध तितकी ती कलाकृती अस्सल वठते. महाराष्ट्राचे राजकारण आणि सहकार म्हणजे एकाच नाण्याच्या दोन बाजू. सहकारातल्या पहिल्या आणि दुसऱ्या पिढीतल्या अनेक धुरिणांनी आपली चरित्रे लिहून घेतली, तर अनेकांनी आत्मचरित्रे लिहिली (खरे तर लिहून घेतली); पण काही मोजके सन्माननीय अपवाद वगळले तर बहुतांश नेत्यांनी किंवा त्यांच्या वारसदारांनी प्रतिमानिर्मिती आणि स्वकर्तृत्वाचे ढोल वाजविण्यासाठीच सत्याचा विपर्यास करीत या साहित्याची निर्मिती केली आहे. काही प्रकाशक अशा गुणगौरवपर पुस्तकांच्या प्रकाशनासाठी प्रसिद्ध आहेत.

महाराष्ट्रात सहकार क्षेत्रातले राजकारण कसे चालते याचे अस्सल चित्रण मराठी साहित्यात फारसे आलेले नाही; मात्र माझे मित्र ज्येष्ठ साहित्यिक 'पानिपत'कार विश्वास पाटील यांची 'नागकेशर' ही कादंबरी नुकतीच प्रकाशित झाली. मेहता पब्लिशिंग हाऊस सारख्या प्रथितयश प्रकाशनाने त्यांच्या लौकिकानुसार अतिशय उत्तमरीत्या कादंबरी सादर केली आहे. दोन रात्रीच्या बैठकीत कादंबरी अधाशासारखी वाचून काढली आणि एका अनामिक तृप्तीचा अनुभव घेतला. ही तृप्ती काही नवे वाचल्याची तर होतीच; पण या कादंबरीतील अनेक पात्रे, त्यातील प्रसंग वगळता केवळ त्यांच्या स्वभावाचा, वागण्या-बोलण्याच्या शैलीचा विचार करता माझ्या आसपास वावरत असल्याचा भास पदोपदी होत होता. नागकेशर हे खरे तर एका वेलीचे नाव.

उसाच्या शेतात जर ही वेल फोफावली तर बघता बघता संपूर्ण फड फस्त करते. नागकेशर हेच प्रतीक घेऊन पाटील यांनी सहकारातल्या अपप्रवृत्ती अतिशय समर्थपणे या कादंबरीत रेखाटल्या आहेत. ज्यांनी महाराष्ट्रातल्या सहकाराच्या पट्ट्यातील गावांत काही वर्षे संवेदना जाग्या ठेवून वास्तव्य केले आहे, अशा माझ्यासारख्या अनेकांना कादंबरीतील पात्रे कधीतरी बघितल्याचे जाणवते. हे कादंबरीचे खरे यश आहे. कधीकाळी प्राथमिक शिक्षक म्हणून नोकरी करणारे बापूराव डोंगरे-देशमुख बघता बघता शुगरकिंग बनले. त्यांचे बेरकी बंधू बबननाना या वाटचालीतील साम, दाम, दंड, भेद अशी वाऱ्याची दिशा बघून सोयीस्कर भूमिका घेत त्यांना कशी साथ देतात, याचे उत्तम चित्रण कादंबरीत उमटले आहे. बापूराव डोंगरे-देशमुखांचा मुलगा प्रिन्स याच्या लग्नाच्या प्रसंगापासून कादंबरी सुरू होते. लग्नाच्या दोन दिवस अगोदर एक घटना घडते आणि प्रिन्स त्याच्या नियोजित वधूशी होणाऱ्या लग्नाला नकार देऊन एका विवाहित स्त्रीशी लग्न करणार असल्याचे जाहीर करतो. इथूनच कादंबरी वाचकांची पकड घेते.

मोठ्या राजकीय घराण्यातील एकेका व्यक्तीच्या स्वभावाचे पैलू, खोडी, सत्ताकांक्षा उलगडत असताना पाटील यांनी जुन्या म्हणी, प्रतिके यांचा इतका बेमालूम वापर केला आहे, की आपणही नकळत या कथानकाचा एक भाग होऊन जातो. सहकाराने महाराष्ट्राला काय दिले याचे उत्तर नक्कीच समृद्धी, संपन्नता असे येईल; पण याची एक काळी बाजूही आहे. कधी काळी एकोप्याने नांदणाऱ्या छोट्या छोट्या गावांत सोसायट्या, दूध संघ, पतसंस्था स्थापन झाल्या. या संस्थांच्या निवडणुका सुरू झाल्या आणि गावागावांत दोन गट पडले, घराघरांत गट पडले. एकाच राजकीय घराण्यात सत्ता आणि संपत्तीच्या कारणाने वाद सुरू झाले. या वादाची झळ केवळ त्या कुटुंबालाच नव्हे, तर त्या परिसराला लागायला लागली. सत्तेच्या माध्यमातून संपत्ती निर्माण करायची आणि याच संपत्तीचा वापर करून पुन्हा सत्ता हस्तगत करायची, या दुष्टचक्रात सध्याचे राजकारण फिरते आहे. या व अशा असंख्य घटनांनी ठासून भरलेली ही कादंबरी वाचताना लेखक विश्वास पाटील हे आपले बोट धरून आपल्याला महाराष्ट्राच्या इरसाल राजकारणाची सफर घडवून आणतात.

खरे तर दोन सख्ख्या भावांचा राजकारणातील छुपा संघर्ष त्यांच्या पुढच्या पिढीत उघड संघर्षाचे रूप घेतो. या संघर्षात साखर कारखान्याची निवडणूक येते. निवडणुकीतील दारू आणि पैशाचे वाटप येते, हाणामाऱ्या येतात.

ऐंशीच्या दशकात महाराष्ट्रात खासगी अभियांत्रिकी आणि वैद्यकीय महाविद्यालयांचे पेव फुटले. साखर कारखानदारांनी कारखान्याच्या जमिनीवर सभासदांच्या पैशावर कॉलेजच्या इमारती उभ्या केल्या. शेतकऱ्यांची मुले शिकली पाहिजेत, असे म्हणत विविध राज्यांतल्या गर्भश्रीमंतांच्या मुलांना गडगंज डोनेशन घेऊन प्रवेश दिले गेले. पुढे या शैक्षणिक संस्थांचे खासगी ट्रस्ट तयार झाले. या स्थित्यंतराचे वर्णन खरोखर दाद द्यावे असेच आहे. पूर्वीची छोटी खेडी सुबत्ता आल्यावर कशी बदलली, साखर कारखान्याचे संचालक, त्यांच्या बैठका, कारखान्याच्या गेस्ट हाउसचे वातावरण, या सगळ्याबरोबर बड्यांच्या नाजूक भानगडी, सत्तापालट झाल्यावर कुंपणावरच्या कार्यकर्त्यांच्या निष्ठा कशा बदलतात, अशा असंख्य घटना, घडामोडींचे अचूक चित्रण खिळवून ठेवते.

विश्वास पाटील यांची कादंबरी म्हटली की धक्कातंत्र आलेच. त्यांच्या यापूर्वीच्या 'लस्ट फॉर लालबाग' या कादंबरीच्या उत्तरार्धात इतक्या वेगवान घटना घडतात, की शेवटची वीस-पंचवीस पाने वाचण्यापूर्वी पुढे काय, असे म्हणत वाचक अस्वस्थ होतो. शेवटच्या आठ-दहा पानांत जेव्हा ही कोंडी फुटते तेव्हाच वाचक सुटकेचा नि:श्वास टाकतो. या कादंबरीतही असेच घडते. कादंबरीचा शेवट काय असणार, याचे मनाशी आडाखे बांधत असताना पाटील पुन्हा एकदा धक्कातंत्राचा उपयोग करतात. कुणीच कल्पना केलेली नसते अशा रीतीने या कथानकाचा शेवट करतात. हा शेवट काय आहे हे कादंबरी वाचूनच अनुभवले पाहिजे.

वाईटावर चांगल्याचा विजय हा भारतीय जनमानसात रुजलेला लोकप्रिय फॉर्म्युला; पण हे करताना कथानकावर यापूर्वी येऊन गेलेल्या कलाकृतीचा प्रभाव पडण्याची दाट शक्यता असते; मात्र विश्वास पाटील यांनी ही कादंबरी लिहिताना पूर्वसुरींच्या कोणत्याही प्रभावापासून दूर राहून आपल्या अनुभवविश्वाच्या आधारे कथानकात रंग भरले आहेत. प्रशासकीय अधिकारी म्हणून महाराष्ट्राचे राजकारण जवळून बघणाऱ्या आणि अनुभवणाऱ्या विश्वास पाटील यांच्या अचूक निरीक्षणाला मनापासून दाद ... खूप दिवसांनी मराठीत अस्सल राजकीय कादंबरी आली आहे. काहीतरी वेगळे वाचू इच्छिणाऱ्या रसिक वाचकांना 'नागकेशर' म्हणजे मेजवानीच ठरणार, हे नक्की.

**- संतोष खेडलेकर**


५वी आवृत्ती

# पर्याय शब्दकोश

शब्द, वाक्प्रचार आणि म्हणी यांचे
अर्थानुसार संकलन

## वि. शं. ठकार

**किंमत : ६३०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**




कुणाची भरभराट चालू असते, कुणाची घोडदौड चालू असते, तर कुणाची वाटचाल. कुणी मुसंडी मारतो, तर कुणी मागे वळून पाहत नाही. कुठे progress, कुठे advancement, तर कुठे march. प्रगतीचे विविध आविष्कार व्यक्त करणारे असे मराठी आणि इंग्रजी समर्पक शब्द, वाक्प्रचार आणि म्हणी एकत्रितपणे समोर आले, म्हणजे त्यातून आपल्याला मनातल्या अर्थानुरूप नेमका पर्याय निवडता येतो. कित्येकदा विरुद्धार्थी पर्यायांची गरज भासते. आजच्या मराठीतल्या बहुसंख्य शब्दांसाठी असे विपुल समानार्थी आणि विरुद्धार्थी पर्याय या कोशात मिळतील.

# पुस्तक परिचय



# एकवचनी

## भाग १ आणि भाग २



पत्रकारिता व संजय राऊत या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. शिवसेना नेते व संसद सदस्य म्हणून ते राष्ट्रीय स्तरावर तळपत असले तरी त्यांची खरी ओळख आहे 'सामना'चे कार्यकारी संपादक हीच!


शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा प्रदीर्घ सहवास त्यांना लाभला. संपादक म्हणून त्यांच्या वागण्या-बोलण्यातला, लिखाणातला रोखठोक बाणा ही बाळासाहेबांचीच देणगी.

३५ वर्षे इतका प्रदीर्घ काळ त्यांनी पत्रकारितेत काढला. त्यांतील तब्बल २५ वर्षे ते 'सामना'ची धुरा वाहत आहेत.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे परखड व ज्वलंत विचार वाचकांपर्यंत पोहोचवण्याचे काम राऊत यांनी केले. संजय राऊत यांनीच शिवसेनाप्रमुखांच्या वादळ निर्माण करणाऱ्या प्रदीर्घ मुलाखती घेतल्या होत्या.

मराठी पत्रकारितेवर प्रभाव टाकणारे व्यक्तिमत्त्व म्हणून महाराष्ट्र व देश त्यांना ओळखतो.

आजही त्यांचे लिखाण त्याच गतीने सुरू आहे.




## संजय राऊत

*"शिवसेनाप्रमुख काय बोलतात? काय लिहितात?*

*याकडे महाराष्ट्रच नाही तर संपूर्ण देश लक्ष ठेवून असे. 'सामना'मधील शिवसेनाप्रमुखांच्या 'मुलाखती' हे संपूर्ण देशासाठी जसे 'राजकीय मार्गदर्शन होते तसे ते राजकीय खाद्यही ठरत असे.' 'Food For thoughts' म्हणजे काय? ते शिवसेनाप्रमुखांच्या मुलाखतींतून देशाला सदैव मिळत राहिले. शिवसेनाप्रमुखांचे निकटचे सहकारी व 'सामना'चे कार्यकारी संपादक संजय राऊत यांनी शिवसेनाप्रमुखांच्या प्रदीर्घ मुलाखती घेतल्या. या मुलाखती खऱ्या अर्थाने बेधडक होत्या. प्रत्येक मुलाखतीने वादळ निर्माण केले. बातम्यांचा खुराक दिला. राजकारणाला धक्के दिले.*

*त्यातून शिवसेनाप्रमुखांचे प्रखर नेतृत्व आणि तितकेच मऊ मुलायम व्यक्तिमत्त्व समोर आले. शिवतीर्थावरील विराट सभांमध्ये आतषबाजी व्हावी तशाच या 'मुलाखती' ठरल्या. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या बेधडक मुलाखती घ्याव्या त्या संजय राऊत यांनीच! असा तो काळ होता. मुलाखतींचा पहिला खंड शिवसेनाप्रमुखांच्या उपस्थितीत प्रकाशित झाला. तितकाच जोरदार दुसरा खंड आता प्रसिद्ध होत आहे. या मुलाखतींतील ज्वलंत विचारांच्या रूपाने शिवसेनाप्रमुख सदैव आपल्यात राहतील. संजय राऊत यांचे हे कार्य लाख मोलाचेच आहे."*

('एकवचनी-भाग २' पुस्तकातून...)

# भाजपशी नाते उत्तम!



*सकाळी झोडपायचे; संध्याकाळी भेळपुरी खायला न्यायचे!*

*दि. २३ जानेवारी हा शिवसेनेचा वाढदिवस. मुंबईवरील हल्ल्यांमुळे व्यथित झालेल्या शिवसेनाप्रमुखांनी जाहीर केले, ''मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यात अतिरेक्यांशी मुकाबला करताना इतके लोक शहीद झाले; आता वाढदिवस कसले साजरे करू?'' शिवसेनाप्रमुखांच्या बाबतीत सांगायचे, तर त्यांचा संघर्षाचा काळ कधीच संपला नाही. सतत संघर्ष झाला तरी त्यांच्याकडचा दारूगोळा कधीच संपला नाही. ''मी प्रथम मराठी, मग देशहितासाठी हिंदुत्व!'' हा त्यांचा नारा याचीच साक्ष देतो! भारतीय जनता पक्षाशी नक्की नाते काय, याचे मार्मिक विश्लेषण केले, तो हा काळ.*

**◗ शिवसेनेत तुम्ही वाढवलेल्या, मोठ्या झालेल्या अनेक व्यक्ती सोडून जातात; तेव्हा तुम्ही निराश होता का?**

नाही, अजिबात नाही. ते व्यक्तींवरती अवलंबून आहे. चांगल्या व्यक्तींनी स्वत:चा घात करून घेतला, एवढ्यापुरतंच ते वाईट असतं. बाकी काही नाही. आता बाकी कोण आहे? भुजबळ असायला पाहिजे होता. पण त्याला ती हाव सुटली आणि आता त्याचं ते जातीय तत्त्वावर चाललंय. नाऱ्याचं मी तुम्हाला आताच सांगितलं. त्याला काढला मी. हकालपट्टी केली.

**◗ राज ठाकरेही शिवसेना सोडून गेले...**

राजचंसुद्धा काय? त्याच्या मागे जी काही उडाणटप्पू लोकं आहेत, त्यांनी राजच्या कानात ती हवा भरली. राज हा एखाद्या वासराप्रमाणे कानात हवा भरल्यानंतर वाकड्या-तिकड्या उड्या मारू लागला. पण त्याच्या त्या 'मनसे' या विषयावर मला बोलायचंच नाही. मुळीच नाही. त्याचं ते त्याच्यापाशी. राजला मी राजकीय दृष्टिकोनातून पाहतच नाही. बालपणापासून माझ्या आणि माँच्या अंगा-खांद्यांवर खेळलेला पोर. माँने तर त्याला जेवू-खाऊ घातलंय. या 'मातोश्री'वरच तो मोठा झाला. हा असा अवलक्षणी का झाला, त्याचा विचार मी करतो.

त्याने माझ्यावर जे चरित्र लिहिलंय– फोटोबायोग्राफी. ते अप्रतिम असं पुस्तक काढलंय त्यानं. बस, बाकी काही नाही.

**◗ तुम्ही 'मनसे'कडे राजकीय दृष्ट्या पाहत नाही...**

अजिबात नाही. शिवसेना ही शिवसेना! अभेद्य, कडवट, मजबूत– निष्ठावंतांची शिवसेना आहे ही. त्याला हे असले तडे वगैरे जात नाहीत. शिवसैनिक पर्वा करीत नाही.

**◗ मराठीच्या मुद्द्यावर ते बोंब मारीत आहेत....**

तेच सांगितलं नं. माझा जो काही पूर्वीच्या विचारांचा अजेंडा होता, तोच आता तो वापरतोय. आता कृपा करून मला 'मनसे'बद्दल प्रश्न विचारू नका.

**◗ तरीही एक प्रश्न विचारतो. काँग्रेस व राष्ट्रवादी वेगळे झाले; पुन्हा एकत्र आले...**

ती त्यांची गरज. गरजवंतांना अक्कल नसते. तेवढ्यापुरतीच ती मर्यादित आहे. बाकी प्रसंगानुसार ते दूरही जातात आणि जवळही येतात. ते

आहे ना रांगणेकरांचं गाणं.... 'तुझं माझं जमेना, तुझ्यावाचून करमेना'– तसं आहे ते. तो त्यांचा प्रश्न आहे.

**◗ मराठी माणूस आपल्यापासून तुटतोय का?**

मग माझ्या बरोबर आहेत, ते कोण आहेत...?

**◗ 'मीडिया' तशी हवा करतेय...**

'मीडिया' तशी हवा करतेय, म्हणूनच मी मीडियाला हल्ली भेटत नाही; मुलाखत देत नाही. त्याची कारणं ही आहेत. हवा केली, हवा केली. त्यांच्या त्या हवेवरती मी जगत नाही. माझा श्वास माझ्यापाशी.

**◗ आजही तुमचं पहिलं प्रेम 'मराठी' आहे काय?**

अर्थात! मराठीला मी कधीच विसरू शकणार नाही. शक्यच नाही. प्रथम मराठीच! हिंदूंची, हिंदुत्वाची गरज का भासली– याची कारणंही महत्त्वाची आहेत. देशहिताची आहेत. समजा– काही उद्या हिंदुस्थानात गडबड झाली, महाराष्ट्रात झाली– असं समजू; तर एकाकी महाराष्ट्र लढू शकणार नाही. इस्लामच्या विरोधात एकाकी लढू शकणार नाही महाराष्ट्र! गुजरातचा तर प्रश्नच नाही. तिकडे मोदी चांगली बाजू लढवताहेत. पंजाब, बंगाल कोणाचा आम्हाला उपयोग? जो-तो आपल्यापुरतंच बघतो. हिंदू माणूस आपण एकवटू शकतो. आमच्या हिंदुस्थानात आणि हिंदू म्हणून एकवटण्याची आता नितांत गरज आहे, कारण इस्लामचा धोका मोठा होत चाललेला आहे. आणि म्हणूनच मी जरा हिंदुत्वावर जोर मारला. याचा अर्थ असा नाही की, मी मराठीला साफ विसरलो! विसरूच शकत नाही. स्वत:च्या आईला कोण विसरणार?

**◗ 'मराठी'चा वाद चाललाय सध्या...**

त्यामुळे संपूर्ण देशात महाराष्ट्राविरुद्ध वातावरण निर्माण झालंय. तिकडे लालू जे काही करतोय, त्यामुळे बिहाऱ्यांच्या विरुद्ध वातावरण निर्माण होत नाही, असं तुम्हाला वाटतं काय? ही जी त्यांची प्रांतीय भावना आहे, तीही अजून महाराष्ट्रात निर्माण होत नाही; ते माझं दु:ख आहे. आम्ही म्हणे कडवट मराठे! कशाला शिवरायांचा अभिमान सांगता आणि जयंत्या अन् मयंत्या साजऱ्या करता? तुम्हाला अधिकार काय शिवरायांचं नाव घेण्याचा? अहो,

त्या ‘व्ही.टी.’ स्टेशनला छत्रपती शिवाजीमहाराजांचं नाव दिलं. त्याला तुम्ही अद्याप ‘सी.एस.टी.’ म्हणता? लोकमान्य टिळक पोलीस स्टेशन. पाटी काय लावली? तर ‘लो. टि. पोलीस स्टेशन’, तिकडे मी आंदोलन केलं व त्यांना सांगितलं ‘लो. टि.’ काढा. ‘लोकमान्य टिळक पोलीस स्टेशन’ हे नाव असलेली पाटी त्यांनी लावली. आम्हीही आंदोलनं केली आहेत ना. इंग्रजी नावाच्या पाट्यांवरती डांबर फासणं, हे शिवसेनेला पहिलं आंदोलन करायला लावलंय. मी स्वत: उतरलो होतो रस्त्यावर. काही ठिकाणी तर डांबर मी लावलंय.

**◗ ‘हिंदी’ भाषकांच्या प्रश्नांवर सर्व उत्तर भारतीय खासदार, तर ‘तमिळ’ प्रश्नांवर सगळे दक्षिणेचे खासदार एकत्र आले....**

होय. तुम्हीच बघा.

**◗ ‘मराठी’च्या प्रश्नावर आपले खासदार कधीच एकत्र येत नाहीत...**

होय. हेच तर दुर्दैव आहे महाराष्ट्राचं! सगळ्यांनीच मराठीचा अभिमान बाळगायचा. शिवाजीमहाराजांच्या जयंत्या आणि मयंत्या साजऱ्या करायच्या. बाजीप्रभू देशपांड्यांचे पवाडे गायचे. थोडी तरी लाज? थोडी तरी शरम? इतिहास घडला म्हणून तुम्हाला महत्त्व आहे– महाराष्ट्राचे मराठी म्हणून. जरा तपासा तो इतिहास.

**◗ शरद पवारांविषयी ‘आता’ आपलं काय मत आहे?**

आता? सध्या कशाला फाटाफुटी करताय? चाललंय ते ठीक चाललंय.

**◗ मध्यंतरी ते ‘मातोश्री’वर येऊन तुम्हाला भेटूनही गेले...**

होय. बरेच महिने झाले त्यांना. शरदबाबू माझ्या तब्येतीची विचारपूस करतो कधी कधी. जमेल तशी. फार काही रस गळतोय, अशातला काही प्रश्न नाहीय.

**◗ भविष्यातल्या महाराष्ट्राच्या, देशाच्या राजकारणात प्रेमाचा रस गळेल, असं वाटतंय काय?**

त्यांची पावलं काय पडताहेत, ते पाहावं लागेल. मीच काय फरफटत जाऊ शकत नाही.

**◗ आजही तुम्हाला शरद पवारांमध्ये देशाच्या पंतप्रधानांचे गुण दिसताहेत?**

देशाचे पंतप्रधानपद इतकं स्वस्त झालेलं आहे की, कोण त्याच्यावरती 'टपक... टपक' बसेल, ते सांगता येत नाही. म्हणून मी काही याच्यावरती भाकीत करीत नाही. विचारही करीत नाहीय. जो बसेल, तो बसेल.

**◗ देशाच्या राष्ट्रपतिपदी एक मराठी व्यक्ती आपण बसवलीत...**

होय, तो मराठीचा अभिमान जो आहे ना, तो मी बाळगलाय. बाकी कोणी नाही.

**◗ हाच मराठीचा अभिमान देशाच्या पंतप्रधानपदी मराठी नेता बसावा, म्हणून बाळगणार का?**

तो मराठी आहे यापेक्षा तो कोण आहे, यालाही महत्त्व आहे. तो कोण आहे, तेही पाहिलं पाहिजे.

**◗ आज महाराष्ट्रात कोण नेता आहे, जो त्या पदावर बसू शकेल?**

अहो, आता आबा पाटील मोकळे आहेत. त्यांना पंतप्रधानपदावर बसवायचे म्हटल्यावर कसे वाटेल? विनोद करू नका याच्यावरती आता. गंभीरपणाने बघा देशाच्या पंतप्रधानपदाकडे. तोलामोलाची पदं आहेत ही. तो अंदाज घ्या नं आधी. मग बाकीच्या गप्पा आहेतच.

**◗ शरद पवार होतील, असं वाटतं का?**

तूर्त यावर काहीही भाष्य करू इच्छित नाही.

**◗ उद्धव ठाकरे यांचं नेतृत्व दिवसेंदिवस सक्षम होतंय...**

बरं, मग?

**◗ शिवसेनेबरोबरच महाराष्ट्राचे नेतृत्व करण्याच्या दिशेने उद्धव ठाकरे यांची वाटचाल सुरू आहे...**

उद्धवची वाटचाल काही तरी व्हावं म्हणून नाही. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तो तीव्रतेने भाग घेतोय. शेतकऱ्यांसाठी कोण रडणार? कोण लढणार? हजारो शेतकरी फासावर लटकून, विष खाऊन मरताहेत. त्यांची जाण कुणाला नाही. पुन्हा ते भारनियमन. पोरं अंधारात अभ्यास करून कंदिलावर परीक्षा देत आहेत. आमचे मित्र एके काळचे सुशीलकुमार शिंदे हे ऊर्जामंत्री असताना तर त्यांनी सांगितलं होतं, सत्ता हाती येताच शेतकऱ्यांची वीजबिलं माफ! आणि सत्ता हाती आल्यानंतर घूमजाव! त्यांनी स्वत:हूनच जाहीर केलं की, निवडणुकीच्या तोंडावर असं बोलावं लागतं. हे सर्व त्यांनी

**१५वी आवृत्ती**


# चौघीजणी

**लुइसा मे अल्कॉट**

अनुवाद

**शान्ता ज. शेळके**

**किंमत : ४००/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**




मुग्ध शैशवातली कोवळी सुखदु:खे .....

लुइसा मे अलकॉट या ख्यातनाम अमेरिकन लेखिकेची

‘लिटल् वुइमेन’ ही कादंबरी अठराशे अडुसष्ट साली

प्रथम प्रकाशित झाली. प्रसिद्धीबरोबरच तिला अभूतपूर्व लोकप्रियता लाभली. अनेक भाषांमधून ती अनुवादित झाली आहे. हॉलिवुडने तिच्यावर दोन वेळा चित्रपटही काढले आहेत.

‘लिटल् वुइमेन’ ही अमेरिकेतल्या ‘मार्च’ कुटुंबाची –

विशेषत: त्यातल्या मेग, ज्यो, बेथ आणि ॲमी या चार बहिणींची – कहाणी आहे. या व्यक्तिरेखा लेखिकेने आपण व आपल्या बहिणी यांच्यावरूनच बहुतांशी रंगवल्या आहेत. शेजारचे वृद्ध लॉरेन्स आजोबा आणि त्यांचा देखणा प्रेमळ नातू लॉरी यांनी या कथेत आणखी अनोखे रंग भरले आहेत.

हे एक अतिशय हृद्य आणि विलोभनीय असे कुटुंबचित्र आहे.

एकमेकींपासून स्वभावाने अगदी वेगळ्या असलेल्या मार्च बहिणींचे परस्परांवरील उत्कट प्रेम, त्यांच्या आशा-आकांक्षा, कोवळी सुखदु:खे, भविष्याची स्वप्ने याचे हे कधी विनोदी,

तर कधी हृदयस्पर्शी असे चित्रण आपल्या साध्या सच्चेपणामुळे वाचकाला थेट अखेरपर्यंत गुंतवून ठेवते...

निर्लज्जपणानं सांगितलेलं आहे. हा छापील वर्तमानपत्रामध्ये आलेला मजकूर आहे.

**◗ भारतीय जनता पक्ष आपला अनेक वर्षांपासूनचा मित्र पक्ष आहे. तुमचं दोघांचं कसं चाललंय? नक्की नातं कसं आहे?**

चांगलंच चाललंय म्हणायचं. दादा असताना आम्ही दादरला मिरांड्याच्या चाळीत राहायचो. तिथे भंडाऱ्यांची संख्या मोठी होती. अत्यंत लढवय्या असा हा आमचा भंडारी समाज. हा दिलदार भंडारी माणूस आता कुठे दिसतो? आता तो भंडारी कुठे गायब झाला, त्याचा पत्ता नाही. त्यातलं एक जोडपं होतं. नवरा रोज सकाळी बायकोला मारहाण करायचा आणि संध्याकाळी तिला चौपाटीवरती फिरायला नेऊन भेळ खायला घालायचा, नारळपाणी पाजायचा. हे आमचं नातं असं असण्याची शक्यता आहे.

**◗ नातं तसं भक्कम आहे म्हटलं तर...**

हो. होय, आहे ना– आहेच मुळी. एकत्रच राहतो. पण कधी कधी असंही होतं नं. सकाळी मारहाण, संध्याकाळी एकत्र फिरायचं. तिला घेऊन भेळ खायला घालायची. नारळपाणी पिऊन घरी यायचं, तीच बायको घेऊन.

**◗ यालाच प्रेमाचा संसार म्हणतात...**

काही म्हणा. अरे संसार संसार..

**◗ कधी कधी संसारात 'वाढ' होते. नवे कुणी तरी प्रवेश करतात संसारामध्ये. तशी काही शक्यता वाटते काय?**

तसं काही आम्ही कुटुंबनियोजन केलेलं नाही त्याबाबतीत. येणारे कसे आहेत, कोण आहेत, काय म्हणून येताहेत; तपास करावा लागतो त्याचा. येताहेत, शपथपूर्वक येताहेत. योग्य वेळी कळेलच!

**◗ वर्ष मावळतंय. मागच्या वर्षात शिवसेनेच्या वाट्याला संघर्षच आला. संघर्षाचा काळ आता संपलाय काय?**

संघर्षाचा काळ कधी संपत नसतो. प्रसंगानुसार त्याकडे पाहावं लागतं. किती झालं तरी, दारूगोळाही उगीच फुकट कशाला घालवायचा याचाही विचार करावा लागतो. मी तर सतत संघर्षच केला. संघर्षातूनही आज दिसतेय ती शिवसेना उभी राहिली. संघर्षातूनच ती आणखी पुढे जाईल.

**◗ पुढच्या महिन्यात तुमचा वाढदिवस...**

होय, २३ जानेवारी हा माझा वाढदिवस आहे. त्या दिवशी मी कुणालाही भेटणार नाही. हे इतके लोक शहीद झाले माझ्या महाराष्ट्रात;

वाढदिवस कसले साजरे करू? मी कुणालाही भेटणार नाही; हारफुले स्वीकारणार नाही, असा मी ठाम निर्णय घेतलेला आहे. हेच कसं निस्तरायचं, ते पाहायचं. माझ्या तमाम शिवसैनिकांना आणि शिवसेनेच्या हितचिंतकांना माझी हीच एक नम्र प्रार्थना आहे.

**◗ नवीन वर्षासाठी तुमचा काय 'संकल्प' आहे?**

संकल्प वगैरे मी काही करीत नसतो. गरज काय आता त्या उद्‌भवणाऱ्या प्रसंगांची. माझा त्यामध्ये किती वाटा असू शकतो, त्यात मी किती भाग घेऊ शकतो; ते मी पाहतो. गरज नसेल तर कशाला मी उगीच लुडबूड करायची माळ्यावरच्या उंदरासारखी...?

**◗ येणारं वर्ष लोकसभा निवडणुकांचं आहे...**

होय.

**◗ देश घडवणारं वर्ष आहे...**

असेल.

**◗ तुमचा विचार काय आहे?**

पाहू. उद्या काय प्रसंग उद्‌भवताहेत, कसल्या युत्या व आघाड्या होताहेत, कोणाचे आत-बाहेर होतेय... मग आम्ही आमचा विचार करू. तोपर्यंत शांतता. आता विचार देण्यासारखं काही नाही.

**◗ म्हणजे सगळे पर्याय खुले आहेत?**

पर्याय मी म्हणणार नाही. पर्याय कसले?

**◗ शिवसैनिकांना काय संदेश द्याल? अन् महाराष्ट्रालाही...**

आपल्या शिवसेनेवर निष्ठा आहेत, जिद्द आहे; ती महाराष्ट्रात शिवसेनेची सत्ता आणण्यासाठी हिमतीने वापरा, कडवटपणाने वापरा. त्यात तुम्ही कुठेही कमी पडणार नाही, याची मला स्वत:ला खात्री आहे. महाराष्ट्रामध्ये शिवसेनेची सत्ता आणायची म्हणजे आणायचीच. त्या निष्ठेने आजपासूनच कामाला लागा, अशी मी आपणास नम्र विनंती करीत आहे.

जय हिंद! जय महाराष्ट्र! वंदे मातरम्!

(२४ डिसेंबर, २००८)

❖

**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**


## पुस्तक परिचय



# फिफ्टी शेड्स ऑफ ग्रे



ई.एल. जेम्स या पूर्वी टीव्हीवर अधिकारी होत्या. ज्या कथा वाचून वाचक आपल्या प्रेमात पडतील, अशा कथा आपण लिहाव्यात, असं स्वप्न त्यांनी अगदी लहानपणापासूनच पाहिलं होतं. पण कुटुंबावर आणि करिअरवर लक्ष केंद्रित केल्यामुळे या स्वप्नाला त्यांनी काही काळ स्थगित केलं होतं. शेवटी त्यांनी धीर गोळा केला आणि लेखणी उचलून त्यांची पहिली कादंबरी 'फिफ्टी शेड्स ऑफ ग्रे' कागदावर उतरवली. अल्पावधीतच ती प्रचंड लोकप्रिय ठरली. 'फिफ्टी शेड्स डार्कर' आणि 'फिफ्टी शेड्स फ्रीड' यांच्याही त्या लेखिका आहेत. त्या आपल्या कुटुंबासह लंडन येथे वास्तव्यास आहेत.




## ई. एल. जेम्स

अनुवाद
**शोभना शिकनीस**

*पदवीधर होऊ घातलेली ॲनास्टॅशिया स्टील ही तरुणी अत्यंत श्रीमंत, बुद्धिमान आणि देखण्या तरुण सीईओची–ख्रिश्चन ग्रेची–मुलाखत घ्यायला जाते आणि पाहता क्षणी त्याच्या प्रेमात पडते! पहिल्यांदाच तिला कोणत्यातरी पुरुषाबद्दल अशा 'हव्याहव्याशा' भावना वाटत असतात. ख्रिश्चनदेखील तिच्या विनोदबुद्धीवर, तिच्या व्यक्तिमत्त्वावर, विचारांवर भाळतो. दोघंही शारीरिक अन् मानसिकदृष्ट्या एकमेकांकडे आकर्षिले जातात, पण ग्रेच्या काही 'विचित्र' अटी असतात.*

*शारीरिक संबंध ठेवण्यासाठी ग्रे ॲनास्टॅशियाला एका करारावर सही करायला सांगतो. तिच्यावर ताबा मिळवून तिला वेदना देऊन सुख मिळवणं, हे त्याच्यासाठी गरजेचं असतं. ती गोंधळते. एकीकडे अटी-करार, त्याच्या इच्छा या गोष्टी चुकीच्या वाटत असतात, तर दुसरीकडे काहीही झालं तरी तिला हा अतिश्रीमंत तरुण हवा असतो... म्हणून ती करारावर सही करण्याआधी थोडा वेळ घेते, त्याच्यासोबत राहून त्याच्या इच्छा जाणून घेण्याचा, त्या अनुभवण्याचा प्रयत्न करते... पण...?*

('फिफ्टी शेड्स ऑफ ग्रे' पुस्तकातून...)

कधीकधी मी विचार करते की, माझ्यात तर काही कमी नाही ना? कदाचित मी माझ्या साहित्यातल्या रोमँटिक नायकांबरोबर दीर्घकाळ घालवला असेल आणि त्यामुळे माझे आदर्श आणि अपेक्षा खूपच उच्च असाव्यात. पण वास्तवात, कोणीही मला तसं वाटायला लावू शकला नव्हता.

*अगदी अलीकडे*, माझ्या अर्धसुप्त मनाचा नकोसा वाटणारा अजून बारीक आवाज कुजबुजला. *नाही!* मी त्वरित तो विचार हद्दपार केला. त्या यातनामय मुलाखतीनंतर, मी परत तिथे जाणार नाही. *तुम्ही समलिंगी आकर्षण असलेले आहात का, मि. ग्रे?*

त्या आठवणीने माझा चेहरा वाकडातिकडा झाला. त्यानंतरच्या कित्येक रात्री मी त्याची स्वप्नं पाहिली आहेत, हे मला माहीत आहे. पण तो वाईट अनुभव माझ्या डोक्यातून धुऊन काढण्यासाठी निश्चितच मी ती स्वप्नं पाहिली असावीत.

जोसला शँपेनची बाटली उघडताना मी न्याहाळलं. तो उंच होता आणि त्याने जीन्स, टी शर्ट घातला होता. त्याचे खांदे चांगले रुंद आहेत, स्नायू पिळदार आणि त्वचा रापलेली, गडद रंगाचे केस आणि तप्त काळे डोळे. होय, जोस चांगलाच 'हॉट' आहे, पण मला वाटतं त्याला शेवटी माझा संदेश पोचला असावा.

आम्ही फक्त मित्र आहोत. बुचाचा 'पॉप' असा मोठा आवाज आला, जोसने वर पाहिलं आणि तो हसला.

स्टोअरमध्ये 'शनिवार' म्हणजे एक दु:स्वप्न असतं. घर नव्याने नीटनेटकं करण्यासाठी 'स्वत:चं स्वत:च करा' मताच्या लोकांनी आम्हाला घेरून टाकलंय. श्रीयुत आणि श्रीमती क्लेटन, जॉन आणि पॅट्रिक – दुसरे दोन अंशकालीन कर्मचारी आणि मी – आम्हाला ग्राहक कोंडीत पकडतायत. पण जेवणाच्या सुटीच्या वेळेला थोडं शांत झालं. श्रीमती क्लेटन काउंटरच्या मागे बसून लक्षात येणार नाही अशा पद्धतीने मी बेगल खात असताना, मला काही मागण्या तपासायला सांगतात. मी कामात गढून जाते, कॅटलॉगमधले क्रमांक आणि आम्हाला लागणाऱ्या वस्तूंची आम्ही नोंदवलेली मागणी यांच्या नोंदी मी ताडून पाहते. माझे डोळे ऑर्डर बुक आणि कॉम्प्यूटरचा स्क्रीन आणि पुन्हा परत बुककडे, असे नोंदी ताडण्यासाठी वळत असतात. आणि मग, काही कारणाने,

मी वर बघते... आणि ख्रिश्चन ग्रेच्या धाडसी करड्या नजरेत मी गुंतून गेल्याचं माझ्या लक्षात येतं! तो माझ्याकडे टक लावून बघत काउंटरजवळ उभा होता.

*हृदयक्रिया बंद.*

''मिस स्टील! काय सुखद आश्चर्य!'' त्याची नजर – अविचल आणि उत्कट.

होली क्रॅप! देवा रे, तो इथे काय करतोय, त्याच्या विसकटलेल्या केसांमुळे आणि दुधाळ रंगाच्या गुठळ्यांनी विणलेल्या स्वेटरमध्ये, जीन्समध्ये आणि चालण्याच्या बुटात तो बाहेर भटकायला निघाल्यासारखा दिसतोय! माझं तोंड बहुतेक उघडं पडलं असावं आणि माझ्या मेंदूचा किंवा माझ्या आवाजाचा मला पत्ता लागत नव्हता.

''मि. ग्रे,'' मी कुजबुजले. कारण फक्त तेवढंच मला जमू शकलं. त्याच्या ओठांवर अस्पष्ट स्मित उमटलं आणि त्याच्या डोळ्यांत तो जणूकाही एखाद्या खासगी विनोदाचा आनंद लुटत असावा, तसा विनोदी भाव होता.

''मी या भागात आलो होतो,'' स्पष्टीकरण देण्यासाठी तो म्हणाला, ''मला काही वस्तूंचा साठा करायचाय. तुला पुन्हा भेटून आनंद झाला, मिस स्टील.'' त्याचा आवाज प्रेमळ आणि घोगरा होता. गडद वितळलेल्या चॉकलेट फज कॅरामलसारखा... किंवा तसाच काहीतरी.

माझं प्रसंगावधान गोळा करण्यासाठी मी माझं डोकं हलवलं. माझं हृदय अतिशय वेगात धडधडत होतं आणि कोणत्यातरी कारणाने मी सातत्याने केलेल्या त्याच्या निरीक्षणामुळे लाजून चूर झाले. माझ्यासमोर तो उभा राहिल्याने माझे हात-पायच गळाले. त्याच्याबद्दलच्या माझ्या आठवणींनी त्याला न्याय दिला नव्हता. तो फक्त नुसताच देखणा नव्हता, तर पुरुषी सौंदर्याचा मूर्तिमंत नमुना होता. श्वास रोखायला लावणारा... आणि तो इथे होता – इथे क्लेटन हार्डवेअर स्टोअरमध्ये. शेवटी माझी विचार करण्याची क्षमता पुन्हा कार्यान्वित झाली आणि माझ्या शरीराच्या इतर भागांशी त्याची सुसंगती जुळली.

''ॲना, माझं नाव ॲना आहे,'' मी पुटपुटले. ''मी तुमची काय मदत करू, मि. ग्रे?''

तो हसला आणि एखादं मोठं गुपित त्याच्याकडे असावं तसं ते वाटलं. ते इतकं शरमिंदं वाटायला लावणार आहे. एक दीर्घ श्वास घेऊन मी *दुकानात कित्येक वर्षं काम केलं आहे* असा व्यावसायिक आविर्भाव आणला. *मी ते करू*

*शकते.*

''मला काही गोष्टींची गरज आहे. सुरुवातच करायची तर, मला काही केबल टाइज लागतील,'' तो पुटपुटला. त्याचे भाव शांत आणि गमतीदार होते.

*केबल टाइज!*

''आमच्याकडे वेगवेगळ्या लांबीचे केबल टाइज आहेत. मी दाखवू का तुम्हाला?'' मी पुटपुटले. माझा आवाज हळुवार आणि थरथरता होता. *परिस्थितीवर काबू मिळव, स्टील.*

ग्रेच्या सुंदर भुवयांवर थोड्याशा आठ्यांमुळे बाधा आली. ''प्लीज, मिस स्टील,'' तो म्हणाला. मी माझ्यावर काहीच परिणाम झालेला नाही, असं दाखवण्याचा प्रयत्न केला आणि काउंटरच्या मागून बाहेर आले, पण खरं म्हणजे मी माझ्याच पायात पाय अडकून पडणार नाही, यावर लक्ष केंद्रित करण्याचा कसोशीने प्रयत्न करत होते. माझे पाय एकाएकी 'जेल-ओ'सारखे झाले. आज सकाळी मी माझी सर्वांत चांगली जीन्स घालायचा निर्णय घेतला याचा मला आनंद झाला.

''एल आठमध्ये त्या इलेक्ट्रिक वस्तूंच्या तिथे आहेत,'' माझा आवाज जरा अधिकच उत्तेजित होता. मी त्याच्याकडे बघितलं आणि त्याचक्षणी मला पश्चात्ताप झाला. डॅम! तो देखणा आहे.

''तुझ्यामागे,'' तो पुटपुटला. त्याच्या काळजी घेतलेल्या नखांच्या लांबसडक सुंदर बोटांनी खूण करत तो पुटपुटला, ''तुझ्यामागे.''

माझं हृदय जोराने धडधडत असल्याने माझा श्वास जलद झाला होता. इतका की, मला गुदमरल्यासारखं वाटत होतं. मी इलेक्ट्रिक विभागाच्या एका एलकडे मोर्चा वळवला. *तो पोर्टलँडमध्ये का आहे? तो इथे क्लेटन्समध्ये का आहे?* आणि माझ्या मेंदूच्या एका अगदी इवल्याशा, कमी वापरात असणाऱ्या भागातून – बहुतेक मेड्यूला ऑब्लाँगेटाच्या तळाशी जिथे माझं अर्धजागृत मन आहे – तिथे विचार आला : *तो इथे तुला भेटायला आलाय.* शक्य नाही! मी तो विचार ताबडतोब बाद केला. हा सुंदर, शहरी, शक्तिशाली माणूस मला का भेटू इच्छित असेल? ही कल्पनाच मूर्खपणाची आहे आणि मी ती माझ्या डोक्यातून काढून टाकली.

''मी डब्ल्यूएसच्या शेतीविषयक विभागाला भेट देत होतो. तो व्हँकुव्हरला आहे. पिकांचं साखळी पद्धतीने उत्पादन आणि मातीचं शास्त्र यांवरच्या

संशोधनासाठी मी सध्या त्यांना वित्तपुरवठा करतोय.'' त्याने सरळ सरळ सांगितलं. बघितलं? तुला इथे भेटण्यासाठी मुळीच नव्हे, माझ्या अर्धजागृत मनाने माझ्याकडे बघून मोठं, गर्विष्ठ आणि ओठांचा चंबू केलेलं हास्य केलं. माझ्या मूर्ख, भरकटलेल्या विचारांमुळे मी लाल झाले.

''तुमच्या 'जगाला खाऊ घाला' योजनेचा हा सगळा भाग?'' मी चिडवलं.

''तसंच काहीतरी,'' त्याने दखल घेतली आणि त्याच्या ओठांवर अर्धवट स्मित उमटलं.

क्लेटन्समध्ये असलेल्या निवडक केबल टाइजकडे तो निरखून बघत होता. त्यांचा तो काय उपयोग करणार आहे, कुणास ठाऊक? स्वत:ची कामं स्वत: करणाऱ्याच्या भूमिकेत मी त्याला अजिबात पाहू शकत नव्हते. मांडून ठेवलेल्या वेगवेगळ्या पॅकेजेसवरून त्याची बोटं फिरत होती आणि स्पष्टीकरण देता न येणाऱ्या काहीशा कारणामुळे मी दुसरीकडे बघत होते. तो वाकला आणि एका पाकिटाची त्याने निवड केली.

ओह्! त्याचं हे गुपित हास्य! त्या हास्यासह तो म्हणाला, ''हे चालेल.''

''आणखी काही हवंय?''

''मला मुखवटे लावायला लागणारी टेप पाहिजे.''

*मुखवट्यांची टेप?*

''तुम्ही घर नव्याने सजवताय का?'' शब्द थांबवण्याच्या आधीच ते बाहेर निसटले. नक्कीच त्याने घर सजवायला मदतीसाठी कामगार किंवा कर्मचारी पगारावर नेमले असतील?

''नाही, पुन्हा नव्याने सजावट नाही,'' तो पटकन उत्तरला. मग खोडसाळपणे हसला. मला थोडं विचित्र वाटलं की, तो मला हसतो आहे.

मी एवढी विनोदी आहे का? विनोदी दिसणारी?

''या दिशेने,'' मी शरमिंदी होऊन पुटपुटले, ''मुखवट्यांना लावायची टेप शोभेच्या वस्तूंच्या एलमध्ये आहे.''

''तू इथे बरेच दिवस काम केलंयस का?'' त्याचा आवाज खालच्या पट्टीत होता. तो माझ्याकडे एकाग्र चित्ताने, टक लावून बघत होता. मी उघडच लाजले. त्याचा परिणाम माझ्यावर का होतो? मी चौदा वर्षांची असल्यासारखं मला वाटत होतं – अवघडलेली आणि स्थलबाह्य. नजर पुढे, स्टील.

''चार वर्षं,'' आम्ही आमच्या इच्छित ठिकाणी पोचल्यावर मी पुटपुटले.

माझं लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठी, मी खाली वाकले आणि आम्ही साठा करून ठेवत असलेल्या मुखवट्यांना लावायच्या टेपमधून दोन वेटोळी निवडून काढली.

"मला ती हवीये," ग्रेने त्यातल्या रुंद टेपकडे निर्देश करून हलकेच सांगितलं. मी ती त्याच्याकडे दिली. आमच्या बोटांचा एकमेकांना अगदी निसटता स्पर्श झाला आणि तो विजेचा झटका पुन्हा एकदा बसला, एखाद्या विद्युत् तारेला जणूकाही मी स्पर्श केला आहे त्याप्रमाणे माझ्या शरीरातून लहर दौडत गेली. मी नकळत दीर्घ श्वास घेतला, कारण ती विद्युत्लहर मला माझ्या कुठल्यातरी अंधाऱ्या आणि शोधून न काढलेल्या, माझ्या ओटीपोटाच्या खोलवर खाली जाणवली. माझा समतोल राखण्यासाठी मी निकराची धडपड केली.

"आणखी काही?" माझा आवाज घोगरा झाला. माझा श्वासोच्छ्वास ऐकू येत होता. त्याचे डोळे थोडेसे मोठे झाले.

"थोडी अजून दोरी," त्याचा आवाजही माझ्यासारखाच घोगरा झाला होता.

"या दिशेने," माझं पुन्हा पुन्हा लाजणं लपवण्यासाठी मी माझं डोकं खाली झुकवलं आणि एलच्या दिशेने सरकले.

"तुम्हाला कोणत्या प्रकारची दोरी पाहिजे? आमच्याकडे कृत्रिम आणि नैसर्गिक तंतूंपासून बनवलेली दोरी आहे... ट्वाइन केबल कॉर्ड..." त्याच्या चेहऱ्यावरचे भाव बघून मी थांबले. त्याचे डोळे गढुळले. *होली काउ.*

"मी नैसर्गिक तंतूंपासून बनवलेली पाच यार्ड दोरी घेईन, प्लीज!"

पटकन, थरथरणाऱ्या बोटांनी, मी मोजमापाच्या पट्टीने पाच यार्ड दोरी मोजली. त्याची हॉट करडी नजर माझ्यावर रोखलेली आहे, याची जाणीव मला होत होती. मला त्याच्याकडे बघायचं धैर्य नव्हतं. देवा, यापेक्षा स्वत:बद्दलची जाणीव असणं शक्य आहे का? माझ्या जीन्सच्या मागच्या खिशातून माझा स्टॅन्ली चाकू बाहेर काढून मी दोरी कापली. मग त्याचं व्यवस्थित वेटोळं करून त्याला एक गाठ बांधली.

"तू एक गर्ल स्काउट होतीस का?" त्याने विचारलं. त्याचे रेखीव, मादक ओठ मजेशीर वळले. *त्याच्या तोंडाकडे बघू नकोस!*

"संघटित गटांचे कार्यक्रम हे खरं म्हणजे माझं क्षेत्र नव्हे, मि. ग्रे."

त्याने भुवई उंचवली.

३री आवृत्ती

# झोंबडं

**महादेव मोरे**

**किंमत : १९५/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**




''लोक घुपळ्याघुपळ्याने जमत होते... सभेत भाषण दिल्यागत तावातावाने बोलत होते...

तासाभरातच तेथे तीन-चार हजारांचा जमाव जमला! कुणी हाकारे-कुकारे न घालता एक प्रकारच्या चिडीने लोक जमले होते... जमत होते...

आणि मग हा मोर्चा निघाला...

'रास्ता रोको' हटाओ...

'निगवणी बचाओ!'

'आंदोलनाचा...'

'धिक्कार असो!'

वैतागलेले नागरिकही या मोर्चात अधेमधे रस्त्यात सामील होत होते व मोर्चाची लांबी आणखीन फुगीर करीत होते. हे मोर्चातील नागरिक व संग्रामनगरातील शेतकरी आमनेसामने आले तर कदाचित अनवस्था प्रसंग ओढवेलही! कारण दोन्हीकडील लोक चिडलेत, खवळलेत! काय होईल सांगता येत नाही!''

''तुझ्या आवडीनिवडी काय आहेत, ॲनास्टॅशिया?'' त्याने विचारलं. त्याचा आवाज मृदू होता आणि त्याचं हे रहस्यमय हसू परत आलं होतं. मी त्याच्याकडे टक लावून पाहिलं. स्वत:ला व्यक्त करायला मी असमर्थ होते. मी हलणाऱ्या पृथ्वीच्या पृष्ठभागावर असणाऱ्या हलणाऱ्या टेक्टॉनिक प्लेट्सवर होते. *शांत राहायचा प्रयत्न कर, ॲना,* माझ्या त्रासलेल्या अर्धजागृत मनाने गुडघे टेकून याचना केली.

''पुस्तकं,'' मी कुजबुजले, पण आतमध्ये, खोलवर माझं अर्धजागृत मन किंचाळत होतं – *तू! तू आहेस माझी आवड!* मी त्याला त्वरित थप्पड लगावली. मला खूप भीती वाटत होती की, माझ्या मनात मर्यादेबाहेरच्या कल्पना आहेत.

''कुठल्या प्रकारची पुस्तकं?'' त्याने त्याचं डोकं एका बाजूला झुकवलं. *त्याला एवढा का रस आहे?*

''ओह्, यू नो, नेहमीचंच. अभिजात. मुख्यत: ब्रिटिश साहित्य.''

त्याने त्याच्या लांबसडक तर्जनीने आणि अंगठ्याने त्याची हनुवटी चोळली. माझ्या उत्तरावर त्या वेळी तो विचार करत असेल किंवा मग कदाचित तो खूप वैतागला असेल आणि ते लपवण्याचा प्रयत्न करत असेल.

''तुम्हाला अजून काही हवं आहे काय?'' मला त्या विषयावरून पुढे जायचंय – त्याच्या चेहऱ्यावरची ती बोटं आकर्षक होती.

''मला माहीत नाही. तुम्ही आणखी काय सुचवाल?''

मी काय सुचवणार? तुम्ही काय करताय तेदेखील मला ठाऊक नाही.

''स्वत:चं काम स्वत:च करणाऱ्या व्यक्तीसाठी?''

त्याने मान हलवली. त्याचे डोळे खोडसाळ विनोदाने चमकून उठले होते. मी लाल झाले आणि माझी दृष्टी त्याच्या अंगालगत बसलेल्या जीन्सकडे वळली.

''कव्हर ऑल्स,'' मी उत्तर दिलं आणि माझ्या ध्यानात आलं की, माझ्या तोंडातून कोणते शब्द बाहेर पडत होते, याची छाननी करणं मी थांबवलं होतं.

गंमत वाटून पुन्हा एकदा त्याने भुवई उंचावली.

''तुम्हाला तुमचे कपडे खराब व्हावेत असं वाटत नसेल तर,'' मी अस्पष्टपणे त्याच्या जीन्सच्या दिशेने खूण केली.

''मी त्या केव्हाही काढून टाकू शकतो!'' तो शिष्टपणे हसला.

''अं...'' माझे गाल पुन्हा लाल होत आहेत असं मला जाणवलं.

माझा रंग *कम्युनिस्ट मॅनिफेस्टोसारखा* झाला असावा. *बोलायचं थांबव.*

*बोलायचं थांबव. आत्ता.*

''मी काही कव्हर ऑल्स घेईन. देव करो आणि माझे कोणतेही कपडे खराब न होवोत,'' तो शुष्कपणे म्हणाला.

त्याची जीन्सशिवायची प्रतिमा बाद करण्याचा मी प्रयत्न केला.

''तुम्हाला आणखी काही हवंय का?'' त्याच्या हातात निळे कव्हर ऑल्स देताना मी चिरकले.

त्याने माझ्या चौकशीकडे दुर्लक्ष केलं.

''लेख कसा काय होतोय?''

त्याने शेवटी मला एक सोपा प्रश्न विचारला, सगळ्यापासून आणि गोंधळात टाकणाऱ्या द्व्यर्थी बोलण्यापासून दूर... या प्रश्नाचं उत्तर मी देऊ शकले. तो एक जीव वाचवण्याचा तराफा असावा, तसं मी त्याला दोन्ही हातांनी घट्ट पकडलं आणि प्रामाणिकपणाचा मार्ग स्वीकारला.

''तो लेख मी नाही, कॅथरिन लिहितेय. मिस कवाना. माझी रूममेट. ती लेखिका आहे. ती त्या लेखावर खूश आहे. ती वृत्तपत्राची संपादिक आहे आणि व्यक्तिश: ती मुलाखत तिला घेता आली नाही, म्हणून ती फार खचून गेली होती.'' मोकळ्या हवेसाठी बाहेर आल्यासारखं मला वाटलं. संभाषणासाठी एक सर्वसाधारण विषय. ''तिला फक्त एकच काळजी आहे की, तुमची कोणतीही छायाचित्रं तिच्याकडे नाहीत.''

''कोणत्या प्रकारची छायाचित्रं तिला पाहिजेत?''

ओके. हा प्रतिसाद मी विचारात घेतला नव्हता. मी डोकं हलवलं, कारण मला ठाऊकच नव्हतं.

''वेल, मी जवळच आहे. कदाचित उद्या...''

''तुम्ही फोटो शूटसाठी तयार आहात?'' माझा आवाज पुन्हा चिरकला. मी हे जमवून आणलं, तर थेट सातव्या स्वर्गात पोचेन. *आणि तुलाही कदाचित त्याला उद्या भेटता येईल,* माझ्या मेंदूच्या तळाशी असलेली ती अंधारी जागा माझ्याकडे मादक आवाजात कुजबुजली. मी तो विचार झटकला – सगळ्या मूर्ख, हास्यास्पद...

''केटला आनंद होईल... आम्ही जर एखादा फोटोग्राफर शोधू शकलो तर, '' मला खूप आनंद झाला होता. मी त्याच्याकडे बघून एक रुंद हास्य केलं. त्याचे ओठ विलग झाले. जणूकाही तो एक खोलवर श्वास घेत होता आणि त्याने डोळे

मिचकावले. क्षणमात्र, तो हरवल्यासारखा वाटला आणि पृथ्वीचा तोल ढळल्यासारखा वाटला, हलणाऱ्या टेक्टॉनिक प्लेट्स पुन्हा एका नवीन स्थितीत घरंगळल्या.

ओ माय. ख्रिश्चन ग्रेची हरवलेली छबी!

''मला उद्याबद्दल कळवाल,'' त्याच्या मागच्या खिशातून त्यानं त्याचं वॉलेट बाहेर काढलं. ''हे माझं कार्ड. माझा सेल नंबर त्याच्यावर आहे. तुम्हाला सकाळी दहापूर्वी फोन करावा लागेल.''

''ओके,'' मी त्याच्याकडे बघून हसले. केटला खूप आनंद होईल.

''ॲना!''

एलच्या दुसऱ्या टोकाला पॉल उगवला. तो मि. क्लेटनचा सर्वांत धाकटा भाऊ आहे. तो प्रिन्स्टनहून घरी परत आला आहे असं मी ऐकलं होतं, पण आज त्याला भेटण्याची मी अपेक्षा केली नव्हती.

''अर्रर, एक मिनिट. एक्स्यूज मी मि. ग्रे.'' ग्रेने कपाळाला आठ्या घातल्या. मी त्याच्यापासून दूर गेले.

पॉल माझा एक मित्र होता. एका श्रीमंत, शक्तिशाली आणि अतिशय आकर्षक, इतरांवर नियंत्रण ठेवण्याचं वेड असलेल्या ग्रे बरोबर एका विचित्र क्षणी मी असताना एखाद्या सर्वसाधारण माणसाबरोबर बोलणं उत्तम होतं. पॉलने मला घट्ट आलिंगन दिलं. मला त्याचं आश्चर्य वाटलं.

''हाय ॲना. तुला बघून खूप आनंद झाला!'' त्याने भरभरून आनंद व्यक्त केला.

''हॅलो, पॉल! कसा आहेस? तू भावाच्या वाढदिवसासाठी घरी आलायस?''

''होय. तू छान दिसतेयस ॲना, खरंच छान.'' एका हाताच्या अंतरावरून माझं निरीक्षण करत तो हसला. मग त्याने मला मोकळं केलं, पण माझ्या खांद्यावर त्याचा स्वामित्व निर्देशक हात टाकून ठेवला. मी या पायावरून त्या पायावर शरमिंदी होऊन भार टाकत उभी होते. पॉलला भेटून आनंद झाला, पण तो नेहमीपेक्षा जरा जास्तच जवळीक दाखवत होता.

मी ग्रेकडे नजर टाकली. तो ससाण्यासारखा आमच्याकडे पाहतोय, त्याचे डोळे विचारमग्न आणि जडावलेले आहेत, त्याच्या तोंडाची एक कठोर, निर्विकार रेघ झाली आहे, हे मला जाणवलं. लक्षपूर्वक खरेदी करणाऱ्या

ग्राहकातून त्याचं रूपांतर एखाद्या थंड, दूरस्थ व्यक्तीत झाल्याचं मला वाटलं.

''पॉल, मी एका ग्राहकाबरोबर आहे. अशा एका ग्राहकाबरोबर ज्याला तू भेटावंस,'' ग्रेच्या आविर्भावात मला दिसणाऱ्या गोंधळाची हवा काढून टाकण्याचा प्रयत्न करण्यासाठी मी म्हणाले. मी पॉलला त्याला भेटण्यासाठी ओढून आणलं आणि त्यांनी एकमेकांचा अंदाज घेतला. वातावरण अगदी थंडगार झालं.

''अ... पॉल, हे ख्रिश्चन ग्रे. मि. ग्रे, हे पॉल क्लेटन. ही जागा यांच्या भावाच्या मालकीची आहे.'' आणि कोणत्यातरी अतार्किक कारणामुळे, मला वाटतं, मी जरा अधिकच स्पष्टीकरण दिलं.

''मी इथे काम करत असल्यापासून पॉलला ओळखते. तरीही आम्ही एकमेकांना तेवढे वरचेवर भेटत नाही. तो प्रिन्स्टनहून परत आला आहे. तिथे तो व्यवसाय व्यवस्थापनाचा अभ्यास करतोय,'' मी बडबड करत होते.

*थांब आता!*

''मि. क्लेटन,'' ग्रेने त्याचा हात पुढे केला. त्याच्या चेहऱ्यावरचे भाव वाचता येत नव्हते.

''मि. ग्रे.'' पॉलने त्याच्या हस्तांदोलनाला प्रतिसाद दिला.

''एक मिनिट... ते ख्रिश्चन ग्रे तर नव्हेत? ग्रे एंटरप्रायझेस होल्डिंगचे?'' पॉल एका छोट्या सेकंदात भारावला. ग्रेने एक सभ्य हास्य केलं जे त्याच्या डोळ्यांपर्यंत पोचलं नाही.

''वॉव – मी आपल्यासाठी काही आणू का?''

''ॲनास्टॅशियाने ते सगळं केलंय, मि. क्लेटन. तिचं बारीक लक्ष होतं.'' त्याचा आविर्भाव थंड होता. पण त्याचे शब्द... जणूकाही तो पूर्णपणे दुसरंच काहीतरी बोलतोय असे होते. ते गोंधळवून टाकणारं होतं.

''छान,'' पॉलने प्रतिसाद दिला. ''नंतर भेटू, ॲना.''

''नक्कीच, पॉल.'' त्याला स्टॉकरूमच्या दिशेने नाहीसा होताना मी बघितलं.

''आणखी काही, मि. ग्रे?''

''फक्त याच वस्तू.'' त्याचा आवाज तुटक आणि थंड होता. डॅम... मी त्याला दुखावलं तर नाही? एक खोल श्वास घेऊन मी वळले आणि रजिस्टरकडे गेले. *त्याची अडचण काय आहे?*

दोरी, कव्हर ऑल्स, मास्किंग टेप आणि केबल टाइजचा मी हिशेब केला.

''याचे त्रेचाळीस डॉलर्स द्या,'' मी ग्रेकडे वर पाहिलं आणि बघितलं नसतं तर बरं झालं असतं असं मला वाटलं. तो माझ्याकडे अगदी जवळून निरखून, आत्मीयतेने बघत होता. त्याने माझा धीर गळाला.

''तुम्हाला पिशवी देऊ काय?'' त्याचं क्रेडिट कार्ड घेताना मी विचारलं.

''प्लीज, ॲनास्टॅशिया,'' त्याच्या जिभेने माझ्या नावाला कुरवाळलं आणि माझं हृदय पुन्हा एकदा वेगाने धडधडलं. मला श्वास घ्यायलादेखील कष्ट होऊ लागले. घाईघाईत मी सगळ्या वस्तू एका प्लॅस्टिकच्या पिशवीत भरल्या.

''तुम्हाला जर फोटो शूट करायचं असेल तर तुम्ही मला फोन कराल?'' तो पुन्हा संपूर्ण व्यावसायिक झाला. मी मान हलवली. पुन्हा एकदा माझी वाचा बसली होती. त्याचं क्रेडिट कार्ड मी त्याला परत दिलं.

''गुड. कदाचित मग उद्या...'' तो जाण्यासाठी वळला. मग थबकला. ''ओह् – आणि ॲनास्टॉशिया, मिस कवाना मुलाखत घेऊ शकली नाही याचा मला आनंद आहे.'' तो हसला. आणि मग एका नवीनच उद्देशाने ढांगा टाकत स्टोअरच्या बाहेर पडला – ती प्लॅस्टिकची बॅग त्याच्या खांद्यावर लटकवून आणि उफाळणाऱ्या स्त्री-हार्मोन्सच्या थरथरणाऱ्या गोळ्यासारखं मला सोडून. पुन्हा भानावर येण्याआधी ज्या दरवाजातून तो नुकताच बाहेर गेला, त्या बंद दरवाजाकडे टक लावून बघण्यात मी कित्येक मिनिटं घालवली.

ओके – मला तो आवडला. मी ते स्वत:कडे कबूल केलं. माझ्या भावनांशी मी आता अधिक लपंडाव खेळू शकत नव्हते. मला पूर्वी असं कधीच वाटलं नव्हतं. मला तो आकर्षक वाटला, खूप आकर्षक. पण ते कारण आता बाद झालं. मला ठाऊक आहे आणि मी कडूगोड पश्चात्तापाने सुस्कारा टाकत होते. त्याचं इथं येणं हा एक निव्वळ योगायोग होता, पण मी निश्चितच दुरूनदेखील त्याची प्रशंसा करू शकेन. त्यामुळे काही बिघडणार नाही. आणि जर मला एक फोटोग्राफर मिळाला, तर उद्या मी गांभीर्याने काही प्रशंसा करू शकेन. अपेक्षेने मी माझा ओठ चावला. मी एखाद्या शाळकरी मुलीसारखी हसतेय असं माझ्या लक्षात आलं. केटला फोन करून तिला फोटो शूट ठरवायला सांगितलं पाहिजे.

❖

# फिफ्टी शेड्स डार्कर

**अनुवाद : डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके**





रोमँटिक, स्वच्छंदी आणि मनावर पगडा मिळविणारी ही कादंबरी तुम्हाला झपाटून टाकेल, अंकित करेल, मनात ठाण मांडून बसेल.

ख्रिश्चन ग्रे या उद्ध्वस्त तरुण आंत्रप्रेन्युअरच्या गूढगुपितांमुळे ॲना स्टील त्याच्या सोबतचं नातं तोडून टाकत नव्यानं जीवन सुरू करू पाहते – अमेरिकेतल्या एका प्रकाशन संस्थेमध्ये! परंतु ग्रेबद्दल तिच्या मनात असलेली तीव्र आस तशीच राहते. म्हणूनच ग्रे तिच्यासमोर नव्यानं प्रस्ताव मांडतो, तेव्हा ती त्याला नाकारू शकत नाही. तिथूनच सुरुवात होते जाणून घ्यायला... फिफ्टी शेड्सच्या छटांचा उगम का, कसा, कुठून, केव्हा झाला, हे सारं ॲनासाठी अतर्क्य असतं. अंतर्मनातील छुप्या सैतानांचा सामना करणं जसं ग्रेला भाग आहे, तसंच ॲनाला निर्णय घेणं भाग आहे. तिच्या आयुष्यातला सर्वांत महत्त्वाचा निर्णय... जो केवळ तीच घेऊ शकते.

# फिफ्टी शेड्स फ्रीड

**अनुवाद : डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके**

ॲना आणि ख्रिश्चन यांच्यातील भावनिक गोंधळ काही अंशी तरी दूर होतो आणि ते परस्परांना आहे तसं स्वीकारायचं ठरवतात. विवाहबद्ध होतात. त्यांच्या प्रणयाला उधाण येतं. एका बाजूला शृंगाराची उधळण आणि एका बाजूला अजूनही ख्रिश्चनची काही बाबतीतली अव्यक्तता ॲनाला प्रश्नांकित करतेय. अशातच एका स्त्रीने ख्रिश्चनला लिहिलेलं पत्र ॲनाच्या हातात पडतं आणि तिच्या पायाखालची जमीन सरकते. काय असतं त्या पत्रात? ते पत्र वाचून ॲना कोणता निर्णय घेते? त्या निर्णयाची अंमलबजावणी ती कशी करते? ॲना आणि ख्रिश्चनचं आयुष्य कोणत्या वळणावर पोचतं? ॲना आणि ख्रिश्चनच्या जीवनाची शृंगाराच्या वळणांनी सजलेली अनोखी प्रणयकथा.



## पुस्तक परिचय




# प्र ति रू प

'I am another You' या इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद



प्रिया कुमार, एक प्रेरणादायक व्यक्ती आणि लोकप्रिय लेखिका आहे. तिच्या स्वतःच्या प्रशिक्षण संस्थेची ती मुख्याधिकारी आहे. उद्योजक जगतातील नामांकित व्यक्तींबरोबर तिने काम केले आहे. तिची शिकवण्याची संभाषणात्मक शैली आणि काही वेळेस शिकवण्याचे अपारंपरिक मार्ग यामुळे अतिशय अपेक्षित दृश्य आणि चांगले यश प्राप्त झालेले दिसते. प्रिया निरनिराळ्या प्रख्यात वृत्तपत्रांतील या विषयावरील कार्यक्रमात भाग घेत असते. तिची इतर पुस्तके 'आय ॲम अनदर यू' आणि 'द परफेक्ट वर्ल्ड' प्रचंड खपत आहेत. गोष्टीरूपाने आपले म्हणणे मांडण्याची तिची पद्धत जगातील सर्व लोकांना आवडते.




## प्रिया कुमार

अनुवाद

**स्वाती काळे**

*'प्रतिरूप' हे पुस्तक म्हणजे प्रिया कुमार या लेखिकेने असंख्य अडचणींवर मात करीत मिळवलेल्या विजयाची कहाणी आहे. अनेक वर्षांपूर्वी तिला या जगापासून दूर जायचे होते. ती नेदरलँडला जाते. तेथील एका विशिष्ट जमातीने केलेल्या काही विधींमुळे तिला समजते की, चुकीची जागा सुयोग्य होऊ शकते ती फक्त स्वतःच्या अंतर्मनातच! जर आपले अंतर्मन 'योग्य' दिशेने नेले तर बाह्य जगात कोणतीच गोष्ट चुकीची नाही. या पुस्तकातील प्रत्येक पानावर लेखिकेचा प्रामाणिक झगडा आणि त्यावर तिने मिळवलेल्या विजयाचे वर्णन आहे. सत्य घटनेवर आधारित ही कहाणी व्यावसायिक किंवा वैयक्तिक आयुष्यात प्रत्येकाला सन्मार्गाकडे नेईल.*

*या पुस्तकात अंतर्मुख करायला लावणारे अनेक विचार आणि अनेक सत्यता आहेत. अंतर्मनाला जागृत करून समृद्ध करण्याची शक्ती आहे. हे पुस्तक वाचकाला मार्गदर्शन करेल. हसवेल. स्फूर्ती देईल आणि हृदयाला स्पर्श करेल. अतिशय महत्त्वाचे म्हणजे असंख्य अडचणींवर मात करायला शिकवेल. प्रिया कुमार ही सकारात्मक विचारांवर बोलणारी वक्ता तसेच आघाडीची लेखिका आहे. तिची लेखनशैली संवादात्मक व अतिशय परिणामकारक आहे.*

(‘प्रतिरूप’ पुस्तकातून...)

# आध्यात्मिक फेरफटका

घामाच्या घराच्या विधीपासून मार्टिन मला आवडू लागला होता. नजरेला नजर भिडताच कळले होते की, हाच तो. मार्टिन भेटेपर्यंत पहिल्या नजरेच्या प्रेमावर माझा विश्वास नव्हता. जेव्हा माझे मित्र-मैत्रिणी पहिल्या नजरेच्या प्रेमाबद्दल बोलायचे, तेव्हा मला कळायचे नाही की, ते प्रेमाबद्दल बोलताहेत की नजरेबद्दल. प्रेम म्हणजे नक्की काय असते? मला कधीच कळले नाही; पण आता वाटते, खरे प्रेम म्हणजे जेव्हा तुम्ही ती व्यक्ती जशी असेल तशी तिला स्वीकारून प्रेम करता, तुमच्या आदर्श प्रतिमेवर तुम्ही प्रेम करत नाही. आपण ढोबळमानाने प्रेम म्हणतो, ते म्हणजे फक्त सुंदरतेला दिलेली दाद असते; त्यामुळे पहिला भर ओसरल्यानंतर जेव्हा आपण त्याचे चारित्र्य प्रत्यक्षात जोखतो, तेव्हा प्रेम आपोआप लुप्त होते. माझ्या बाबतीत असेच झाले. प्रेम आपोआप ओसरले आणि सौंदर्याच्या कोणत्याही छटा प्रेमाला वाचवू शकल्या नाहीत.

मनुष्य सौंदर्याकडे आकर्षित होत असेलही; पण दिसण्याच्या पलीकडे काहीतरी हवे जे ते आकर्षण टिकवू शकते. नाहीतर तेच आकर्षण तिरस्कारात बदलते. जेव्हा तुम्ही पहिल्या आकर्षणाची पायरी चढता आणि दुसऱ्याचा स्वभाव जाणू लागता, तेव्हा तुमचे संबंध खऱ्या अर्थाने जुळू लागतात. मैत्रीचा पाया मजबूत होतो आणि हीच खरी वेळ असते, प्रेमाची ग्वाही देण्याची.

पण मार्टिनबद्दल माझ्या मनातल्या भावना शारीर आकर्षणापलीकडच्या होत्या. त्याच्या डोळ्यांत मला प्रामाणिकपणा आणि शहाणपणा दिसला. ‘हाच आहे तो’ माझ्या हृदयाने निर्वाळा दिला; पण माझ्या मनाला प्रेमाची कबुली देण्याआधी मी वाट पाहण्याचे ठरविले. जेव्हा प्रेमाने डोळे आंधळे होतात, तेव्हा सर्वच आलबेल असते. आपण जेव्हा सुंदर सूर्यास्त बघतो तेव्हा आपली डोकेदुखी लगेच नष्ट होते आणि सर्व जग सुंदर दिसू लागते. सौंदर्य तुमच्यावर केवढा परिणाम करू शकते! अशा सौंदर्यामुळे क्षणिक सुख नक्कीच मिळते; पण जर तुम्ही थोडी अधिक काळ वाट बघितली तर सूर्याची वेगवेगळी रूपे तुम्हाला बघायला मिळतील. निरागस सूर्योदयानंतर दुपारचा आग ओकणारा सूर्य, संध्याकाळी शांत, ध्यानस्थ बसलेला आणि

नंतर कुठे दडी मारून बसलेला सूर्य परत दुसऱ्या दिवशी, जसे काही घडलेच नाही अशा निरागस आविर्भावाने उगवणारा सूर्य. ही सूर्याची जणू चक्राकार साखळी आहे, एका प्रियकराची आणि प्रेममय जीवनाची कहाणी आहे.

मार्टिन वेगळा होता. माझे मन सांगत होते; पण मी माझ्या मनाला प्रेमाची कबुली देण्यापूर्वी ठरवले की, मार्टिनला थोडे जास्त अजमावावे. 'मी भुलले आहे त्याच्यावर!' स्वत:लाच मी समजावले.

सकाळच्या थंडीत कुडकुडत, पायजमा घालून मी खिडकीजवळ बसले होते. कसलीच घाई नव्हती कारण आज सुट्टी होती. या दिवशी तुम्हाला जे वाटते ते करायचे; मनाला येईल ते खायचे. 'हा तुझा दिवस आहे,' कहुनांनी सांगितले होते.

मला मार्टिनसोबत दिवस व्यतीत करायचा होता. तो बगिच्यात शेजाऱ्यांच्या कुत्र्यांशी खेळत होता. तो उंच, काटक आणि देखणा होता. तीन कुत्र्यांबरोबर तोही धूम पळत होता. मला हसू आवरेना! एका धिप्पाड कुत्र्याने त्याला जमिनीवर पाडले. त्या तीन कुत्र्यांच्या गदारोळात त्याची निळ्या रंगाची जीन्स तेवढी दिसत होती.

मी झटपट तयार होऊन मार्टिनने दुसरे काही ठरवायच्या आत त्याला विचारायचे ठरवले. पंधरा मिनिटांत छानसा स्कर्ट, ब्लाउज आणि त्यावर भलामोठा फरकोट घालून मी तयारसुद्धा झाले.

मी बगिच्यात धावत गेले. धावल्यामुळे मार्टिन लालबुंद दिसत होता आणि आता टेबलाजवळ बसून गरम कॉफी पीत होता.

''आज काय करायचे हे मी ठरवले आहे,'' वेळ न दवडता मी म्हटले.

''मला माहीत आहे आज काय करायचे,'' त्याच्याजवळ जात मी म्हणाले.

''ओह! खूपच छान! तू छान ड्रेस घातला आहेस.'' मार्टिन हसून म्हणाला.

मी सुंदर दिसते हे त्याने कबूल केले, असे मला तरी वाटले. या विचारानेच माझा आत्मा सुखावला. आपण लोकांच्या बोलण्याचा अन्वयार्थ आपल्या सोयीने लावतो. किती मजेदार! आपल्या अपेक्षेनुसार आपण आपले आयुष्य जगतो. आपण कधीच 'बिचारे' नसतो. लोकांच्या बोलण्याचे

आपल्या सोयीने विचित्र अर्थ लावून नंतर अपेक्षाभंग ओढवून घेतो. मी प्रेमात होते म्हणून मार्टिनने सांगितलेली प्रत्येक गोष्ट प्रेमातून आलेली आहे, असे मला वाटायचे. 'प्रेम मूर्ख असते' म्हणतात ना! खरी गोष्ट म्हणजे आपण आपल्या इच्छांचे जाळे इतरांच्या संवादात विणतो आणि नंतर मूर्खासारखे स्वत:ला आनंदी किंवा दु:खी करून घेतो. मार्टिनने म्हटले नव्हते की, मी सुंदर दिसते; पण मी मात्र त्याच्या शब्दांचा अन्वयार्थ असाच लावला कारण मी त्याच्या प्रेमात होते.

''मला आजचा दिवस तुझ्याबरोबर व्यतीत करायचा आहे,'' मी थोडी जास्तच आग्रहीपणे बोलले. जणू काही मी दोघांकरता आजच्या दिवसाची आखणी केली होती.

''खूपच छान! मग तुला काय करायला आवडेल?'' मार्टिनने आढेवेढे न घेता विचारले.

मला खूप आवडले त्याचे बोलणे. तो माझ्याबरोबर दिवस व्यतीत करायला तयार होता. हीच तर त्याच्या प्रेमाची खूण नव्हती ना? त्याच्या प्रेयसीचा त्याला कंटाळा आला असेल. तिने त्याला वाईट वागवले असेल. हीच एक संधी असेल माझ्यासाठी. त्या क्षणी मला जाणवलेही नाही की, मी माझ्या आधीच्या प्रियकरासारखी वागते आहे. प्रेमभंगाचे दु:ख ताजे असले तरी मार्टिनचे लग्न मोडून मी केवढे भयंकर कृत्य करणार होते, हे माझ्या लक्षात आले नाही. मी प्रेमात होते. माझा आधीचा प्रियकरही असाच प्रेमात पडला असेल आणि त्याला कळलेच नसेल की, त्याच्या प्रेमात पडण्यामुळे मला केवढे भयंकर दु:ख होईल. आयुष्य किती विचित्र आहे. आपल्याला आपल्या दु:खाची जाणीव होते; पण आपल्यामुळे दुसऱ्याच्या आयुष्याला केवढी इजा पोहोचते हे आपल्याला कळतच नाही.

''तू जे म्हणशील ते. मला ही जागा नवीन आहे. मला नाही माहीत काय करायचे ते.'' मी आनंदून म्हणाले. माझ्या डोक्यात नवनवीन योजना सुरू झाल्या.

''तू अतिविशेष व्यक्ती आहेस. हे तुला माहीत आहे?'' मार्टिनने विचारले.

त्याच्या बोलण्यातून प्रेम व्यक्त होत होते का? माहीत नाही आणि आता मला त्याच्याशी देणे-घेणे नव्हते.


# साऊथ बाय जावा हेड

**ॲलिस्टर मॅक्लीन**

अनुवाद

**अशोक पाध्ये**

**किंमत : २५०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**




दुसऱ्या महायुद्धात पृथ्वीवरील पूर्व गोलार्धात जपानने सागरावरती आपले वर्चस्व प्रस्थापित केले होते.

अशा वेळी एक तेलवाहू बोट धाडसाने प्रवास करीत होती. त्यावर निर्वासित व ब्रिटिश सैन्यातील माणसांनी आश्रय घेतला होता.

पुढच्या तीन महिन्यांच्या जपानच्या आक्रमणाची लष्करी गुपिते असलेली कागदपत्रे घेऊन एक हेर पळून जात होता. तर बहुमोल किंमतीचे हिरेही या धामधुमीत हलवले जात होते.

शेवटी यातून बॉम्बिंग, जाळपोळ निर्माण होत गेली. त्या थरारक पाठलागात एक दोन वर्षांचे अनाथ पोर सापडले. आठवडाभर पाण्यावरून हालअपेष्टा सहन करीत किनारा गाठला. पण विमाने, पाणबुडी, सैन्य हात धुऊन मागे लागले.

या लष्करी धामधुमीत एक मूक प्रेमकथा फुलत होती. मानवी शरीराची व मनाची कमाल क्षमता ताणली जात होती.

शेवटी काय झाले?

''मी तुला आज आध्यात्मिक फेरफटका मारायला घेऊन जाणार आहे. कधी जायचे हे ठरव आणि त्यावेळी मी तुला घ्यायला येईन,'' मार्टिन हसून म्हणाला.

''आध्यात्मिक फेरफटका?'' मी विचारले, ''म्हणजे काय?'' मी उल्हसित होते; पण थोडीशी गोंधळलेली होते.

''होय. आध्यात्मिक फेरफटका. एक प्रश्न मनात ठेवून आपण फिरणे चालू करू या आणि जेव्हा आपले फिरणे संपेल तेव्हा मनातील प्रश्नाचे उत्तरही मिळेल.  तू ठरव फिरायला कोठे आणि कधी जायचे ते. आपण जगात कोठेही फिरायला जाऊ शकतो,'' डोळे मिचकावत तो म्हणाला.

मला व्हेनिसला माझ्या जिवलगाबरोबर जायचे होते. व्हेनिस जर जवळ असेल तर!

''मला जंगलात, रात्री, गच्च ताऱ्यांच्या खाली फिरायला आवडेल,'' मी म्हणाले.

मार्टिनच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह उमटले.

''रात्री? तुला खात्री आहे?'' त्याने पुन्हा विचारले. त्याला वाटले की, त्याने चुकीचे ऐकले आहे.

''होय, मला गच्च ताऱ्यांच्या खाली, गर्द काळोखात आणि निबिड अरण्यात तुझ्याबरोबर फिरायला आवडेल.''

''प्रामाणिकपणे सांगायचे झाले तर मी रात्री कधीच कोणाला आध्यात्मिक फेरफटक्यासाठी घेऊन गेलो नाही. ही पहिलीच वेळ आहे; पण ही तुझी निवड आहे आणि तू चालणार आहेस. मी तुला रात्री आठ वाजता इथेच भेटेन. तू तयार राहा,'' कॉफीचा शेवटचा घोट घेत मार्टिन म्हणाला. नंतर तो उठला आणि धावणाऱ्या कुत्र्यांबरोबर आणखी जोरात धावू लागला.

''वा!'' माझा आत्मा खुशीने हसला. ''आध्यात्मिक फेरफटका मार्टिनबरोबर? खूपच छान!''

अख्खा दिवस मी लोळण्यात घालवला. कधी पलंगावर लोळायचे तर कधी बगिच्यात गवतावर लोळून ढगांचे बदलते आकार बघायचे. संध्याकाळ झाली तशी थंडी वाढली आणि ढग गडद काळे आणि पाण्याने जडसर झाले. आता वादळ तर सुटणार नाही ना? माझे मन खट्टू झाले.

''नाही ऽऽऽ!'' मी आकाशाकडे बघून माझ्या मुठी आवळल्या. ''आज

रात्री नाही! इतर वेळी कधीही; पण आज रात्री नाही!'' पण आकाशाने मला प्रत्युत्तर दिले होते. माझ्या चेहऱ्यावर पावसाचे पहिले थेंब पडले. मी भिजू लागले.

माझे डोके झाकून मी कॉटेजकडे पळाले. ती अख्खी संध्याकाळ मी खिडकीत बसून पाऊस बघण्यात आणि आठ वाजेपर्यंत ढग जाण्यासाठी प्रार्थना करण्यात घालवली. हाय रे देवा! विश्व माझ्या हुकमावर चालत नाही; पण जे करणे आवश्यक होते ते मी केले; पण नियमांमध्ये माझ्या चालण्याला आणि चांदण्या रात्रीला काय अर्थ?

रात्रीचे पावणेआठ वाजले होत; पण अजूनही ढग होते. माझे मन खट्टू झाले होते. डोळे अश्रूंनी डबडबले होते. मार्टिनबरोबर राहण्याची ही एकमेव संधी होती; पण त्या मूर्ख पावसाला काय माहीत? माझ्या आयुष्यात अडथळा आणून विश्व जणू सवंग मजा पाहत होते.

''माझ्याच बाबतीत नेहमी असे का होते?'' मी विचार केला, ''मी कमनशिबी आहे. भाग्यविधाता कधीच माझ्या बाजूने नसतो. प्रत्येक वेळी मला जे पाहिजे असते ते, थोडक्यात माझ्या हातातून निसटते.'' मला हुंदके अनावर झाले.

मला आठवले, शाळेत असताना एका प्रोजेक्टसाठी एवढी मेहनत घेतली होती; पण शाळेच्या प्रेसिडेंटच्या मुलीने पदक पटकावले होते. आयुष्य खडतर असते हे मला लहानपणीच कळले होते. कॉलेजमध्ये असताना मी खूप हुशार होते; पण कॉलेजची मुले बुद्दू मुलींच्याच मागे जायची. तेथे माझी हुशारी कामी नाही आली. जेव्हा माझ्या मनासारखे घडायचे नाही तेव्हा पुनश्च मनाला समजावून सांगायचे. आयुष्य खडतर आहे! कॉलेजचे फुलपाखरी दिवस माझ्या वाट्याला कधीच आले नाहीत. खूप कष्ट करावे लागले. माझे मित्र-मैत्रिणी पार्ट्यांमध्ये गुंग असताना मी माझ्या विद्यार्थ्यांना शिकवले. जेव्हा मला माझ्या स्वप्नातील राजकुमार भेटला आणि वाटले की, आता आयुष्यभर मी सुखात राहीन, तेव्हा माझ्याहून सरस मुलीने त्याचे लक्ष वेधले. आयुष्य खडतर आहे– माझी खात्री झाली. मला वाटू लागले की, मीच कमनशिबी आहे.

दारावर टकटक ऐकली आणि मी डोळे पुसले. दरवाजा न उघडता मेरी ओरडली,

‘‘मार्टिन तुला घ्यायला आला आहे.’’ आणि ती निघून गेली.

मार्टिन येथे आला ? पावसात आला? अरे, माझ्या देवा! मला काय करावे ते सुचेना! कोणता ड्रेस घालावा? माझे डोळे सुजलेले दिसताहेत! किती भयंकर दिसते मी!

दारावर पुन्हा टकटक झाली.

‘‘तू तयार आहेस का? मार्टिन विचारत होता.

‘‘हो,’’ मी ओरडले. ‘‘एका मिनिटात येते.’’

मी माझी जीन्स आणि पळण्याचे जोडे घातले. तोंडावर पाणी मारले, आरशात पाहून छानशी हसले, माझा कोट उचलला आणि बाहेर पळाले.

मार्टिन बाहेरच उभा होता. त्याने गुडघ्यापर्यंत बूट घातले होते. टोपीसह विंडचीटर घातले होते. पावसाने त्याचा चेहरा ओला झाला होता.

‘‘तू जोरदार वादळ निर्माण केलेस!’’ त्याने हसून माझ्याकडे पाहिले.

‘‘हे घे,’’ एक मोठे जॅकेट आणि गुडघ्यापर्यंतचे बूट मला देत तो म्हणाला. ‘‘तुला आध्यात्मिक फेरफटक्यामध्ये चांदण्या रात्री याची गरज भासेल.’’ आम्हाला दोघांनाही हसू आवरले नाही.

मी जॅकेट आणि बूट घातले. मार्टिनने माझा हात धरला आणि आम्ही बाहेर पडलो. बाहेर अंधार होता आणि पाऊस पडत होता. गवत दिसत नव्हते आणि माझ्या प्रत्येक पावलागणिक पाणी उडत होते. अगदी अंटार्क्टिकाएवढे थंड वाटते आहे. जोरदार वाऱ्यामुळे पावसाचे सपकारे जोरात लागत होते. गाडीच्या वायपरप्रमाणे तोंडावरून पाणी निपटण्याचा मी प्रयत्न करत होते.

‘‘आपण महामार्गापर्यंत चालत जाऊ आणि तेथून बस पकडू. जंगलापर्यंत पोहोचायला वीस मिनिटे लागतील.’’ मार्टिन त्याची चालण्याची गती वाढवत म्हणाला आणि त्याने मला अक्षरश: खेचत नेले. माझे हात गारठले होते आणि गरम जॅकेटमधूनही बोचरी गार हवा आत शिरत होती.

चिखलाने माखलेले केस, ओला चेहरा आणि ठिकठिकाणी खरचटलेल्या खुणा अशा अवस्थेत आम्ही महामार्गावर पोहोचलो. माझे दात वाजत होते. अचानक लांबवर दोन पिवळे दिवे अंधारात चमकताना मी पाहिले.

‘‘चला, आपण योग्य वेळी पोहोचलो.’’ तो हसला.

आम्हाला घेण्यासाठी बस थांबली. ती रिकामी होती. आम्ही दोघेही समोर जाऊन बसलो.

''तू हे सर्व कसे केलेस?'' मार्टिनने त्याचा चेहरा बाह्यांनी पुसत विचारले.

''मी काय केले?'' मी विचारले. मला कळेना की, तो कोणत्या संदर्भात बोलतोय.

''तू पावसाला कोसळायला कसे भाग पाडलेस? '' मार्टिनने निरागसपणे पण कुतूहलाने विचारले.

त्याच्या दृष्टीने वादळ आणि पाऊस हा अपघात नव्हता. त्याला माहीत होते की, हे मी केले आणि तो उत्सुक होता की, मी हे कसे केले आणि का?

''तुला असे म्हणायचे आहे की, मी त्या ढगांवर प्रभाव पाडला आणि त्यांना सूचना दिल्या की, आध्यात्मिक फेरफटक्यापूर्वी पाऊस पाडा?'' मला अचंबा वाटला; पण मार्टिनचे तेच मत होते.

''होय आणि मला जाणून घ्यायचे आहे हे तू का केलेस?'' तो म्हणाला.

''मला काहीच कल्पना नाही तू काय बोलतो आहेस, मार्टिन.'' मी प्रतिसाद दिला आणि नंतर उर्वरित प्रवासात आम्ही दोघेही शांत होतो.

मी वादळ निर्माण केले? माझ्या डोक्यात अनेकदा हा प्रश्न आला; पण त्याचे उत्तर मी शोधू शकले नाही.

बस थांबली. मार्टिनने माझा हात धरून मला उतरवले. आम्ही महामार्गावर आलो होतो. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना घनदाट जंगल होते. ढगांचा गडगडाट सुरू झाला आणि जोरात पाऊस पडू लागला. गमतीत म्हणायचे तर आध्यात्मिक फेरीची ती दिव्य नांदी होती.

''आता कोणत्या दिशेला जायचे?'' मार्टिनने विचारले.

''मला माहीत नाही. मी म्हणाले. मला अजिबात कल्पना नाही.''

''ही कल्पना तुझी आहे; त्यामुळे तू ठरव.''

''पण आपण हरवलो तर?'' मी विचारले. मला मनातून फार भीती वाटत होती. माझ्या पोटात गोळा आला होता. माझ्या कल्पनेपेक्षा जास्त रोमांचकारी हा प्रवास होता. मार्टिनबरोबर जंगलात हरवणे ही कल्पना किती गमतीशीर होती!

''कधीतरी रस्ता सापडेलच ना!'' मार्टिन हसत म्हणाला.

❖

# पुस्तक परिचय




## द डिफिकल्टी ऑफ बीइंग गुड



गुरुचरण दास हे ‘इंडिया अनबाउंड’ या जगभरात गाजलेल्या, प्रशंसिल्या गेलेल्या व अनेक भाषांत भाषांतर झालेल्या, बीबीसीने चित्रीकरण केलेल्या असाधारण पुस्तकाचे लेखक आहेत. ‘द टाइम्स ऑफ इंडिया’सारख्या सहा भारतीय वृत्तपत्रांत ते सातत्याने लेखमाला लिहितात; शिवाय अधूनमधून ‘न्यूजवीक’, ‘द न्यू यॉर्क टाइम्स’, ‘द वॉल स्ट्रीट जर्नल’ आणि ‘फॉरेन अफेअर्स’ यांसारख्या ख्यातनाम आंतरराष्ट्रीय नियतकालिकांतूनही ते लेखन करतात. त्यांची ‘ए फाइन फॅमिली’ नावाची कादंबरी, ‘द एलेफंट पॅरॅडाइम’ नावाचा निबंधसंग्रह, ‘लॅरिन्स साहिब’,

‘९ जाखू हिल’ आणि ‘मीरा’ या तीन इंग्लिश नाटकांचा संग्रह असे विविधरंगी साहित्य प्रसिद्ध झाले आहे.

गुरुचरण दास हार्वर्ड युनिव्हर्सिटीचे पदवीधर आहेत. ते जॉन रॉल्स यांच्याकडे संस्कृत शिकले आहेत आणि डॅनियल इन्गॉल्स यांच्या हाताखाली त्यांनी तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला आहे. लेखनाला पूर्ण वेळ देता यावा म्हणून निवृत्ती पत्करण्यापूर्वी ते ‘प्रॉक्टर अॅन्ड गॅम्बल’ या जगप्रसिद्ध कंपनीचे सीईओ होते. त्यांचे वास्तव्य सध्या दिल्ली येथे आहे.




**गुरुचरण दास**

अनुवाद

**सुदर्शन आठवले**

*'चांगले का वागायचे?' 'धर्म' म्हणजे नेमके काय? धर्माचे आचरण कसे करायचे? त्याचे परिणाम काय होतील?*

*बिकट पेचप्रसंग, क्लिष्ट प्रश्न हा महाभारताच्या कथेचा स्थायिभावच आहे. गुरुचरण दास यांनी त्यांचे सखोल परीक्षण, चोखंदळ विश्लेषण केले आहे. महाभारताच्या काळातल्या आणि आजच्या काळातल्या नीतिमानतेच्या परिमाणातील संदिग्धता, अनिश्चितता यांतील आश्चर्यकारक साम्य ते आपल्यासमोर ठेवतात आणि आजच्या जगातल्या अवघड, संघर्षमय, गुंतागुंतीच्या जीवनाचा सामना कसा करायचा हेही समजावून सांगतात.*

('द डिफिकल्टी ऑफ बीइंग गुड' पुस्तकातून...)

**जर लोभ, हाव ही भांडवलशाहीतील पापे असतील,**
**तर असूया, द्वेष हे समाजवादातील दुर्गुण आहेत.**

एकोणिसाव्या शतकातील आदर्शवादी जसे समाजाची सुरचना करण्याचा सर्वोत्तम मार्ग शोधण्याचा प्रयत्न करत होते तसेच महाभारतही करते. दुर्योधनाच्या असूयेचा वारू अनिर्बंधपणे दौडू लागतो तेव्हा त्याच्या टाचांखाली भरडल्या जाणाऱ्या समाजापुढे 'जगायचे कसे?' हा प्रश्न पडतो. युधिष्ठिर अज्ञातवासात असताना तो हानिकारक असूया, हिंसक द्वेष यांच्या अगदी विरुद्ध, अहिंसा, सुसंवाद, हितसंबंध यावर आधारित जीवन जगणाऱ्या समाजाची कल्पना मांडतो. काही उच्चपदस्थ अधिकाऱ्यांची दुर्योधनासारखी स्वार्थी, स्पर्धात्मक प्रवृत्तीच २००८ मध्ये जगाला आर्थिक मंदीने जखडून टाकायला जबाबदार होती असा काही लोकांचा दृढविश्वास आहे. पाश्चिमात्य राष्ट्रांत औद्योगिक क्रांतीच्या दरम्यान जे निष्ठुर अत्याचार झाले त्याविरुद्धच्या अत्यंत तीव्र प्रतिक्रियेतून समाजवाद्यांनी एका सुसंवादी, गुण्यागोविंदाने नांदणाऱ्या समाजाचे स्वप्न बघितले. त्यात वर उल्लेख केलेल्या प्रवृत्तीने गढूळलेल्या जीवनाला जराही स्थान नव्हते.

भांडवलशहांची पैशाची वखवख श्रीमंतीची उच्च सीमाच नष्ट करते आणि भांडवलशाही त्यांना तसे करण्याची मुभाही देते. समाजवाद सर्वांना समान पातळीवर ठेवण्याचा प्रयत्न करतो. साम्यवादींनाही समानताच हवी असते; पण ते ती श्रीमंतांना पिळून, त्यांचे शोषण करून आणतात. समाजातील खालचा आणि वरचा वर्ग यातील अंतरामुळे त्यांच्यात निरंतर संघर्ष चालू असतो. गर्भश्रीमंत, मालकवर्ग, पांढरपेशे यांना खाली खेचून ते अंतर कमी करायचे असे साम्यवादींचे धोरण असते. यात गरिबांना श्रीमंतांविषयी वाटणाऱ्या सर्वसाधारण असूयेचा समावेश असतोच, पण त्याखेरीजही त्यात काहीतरी असते. डाव्या विचारसरणीचे लोक आर्थिक उत्पन्नातील तफावत या प्रश्नाचा विचार बुद्धी, व्यवहार याऐवजी भावनेने करतात आणि त्यांची अशी समजूत आणि अपेक्षा असते की, तो प्रश्न शासनाने हस्तक्षेप करून सोडवण्याचा आहे. लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सचे संस्थापक आणि ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ लॉर्ड रिचर्ड लेयार्ड तर याहीपुढे जाऊन असे म्हणतात, 'जे लोक रात्रंदिवस काम करतात, प्रचंड कष्ट करतात ते स्वत:चे उत्पन्न वाढवतात, परंतु त्याचबरोबर त्यांच्या

संपन्नतेने ते इतरांचे असमाधानही वाढवतात. प्रगती, उन्नती, संपत्ती यांच्या संपादनासाठी चाललेल्या जीवघेण्या शर्यतीत पळता पळता कित्येक लोक त्यांच्या कुटुंबापासून दूर जातात, त्यांचे प्रेमबंध सैल होतात, कधीकधी तुटतातही. त्या लोकांमुळे सामाजिक बांधिलकी कमी होत जाते, कुटुंबात, समाजात मिसळायला त्यांना वेळच मिळत नाही. परिणामी, समाजातील सहभाग कमी होऊन असंतुष्टता वाढीला लागते.' यावर एक नामी उपायही ते सुचवायला कमी करत नाहीत. 'अति काम करणाऱ्यांवर जास्त कर बसवावा!' त्यांच्या मते त्यामुळे या शर्यतीचा वेग कमी होईल, ताण उणावेल, स्पर्धा आणि त्यामुळे मनात जागणारा द्वेष, असूया यांची तीव्रताही कमी होईल आणि एकंदरीतच मानवी जीवनातील सुखात वाढहोईल.[७२]

समाजात समता नांदली की विषमता दूर होईल आणि विषमता दूर झाली की लोकांच्या मनात असणारी असूयाही नष्ट होईल असे समाजवादाला अभिप्रेत असते; पण आश्चर्य म्हणजे, तसे घडत नाही, उलट असूया वाढते![७३] समान पातळीवरील लोकांना अगदी लहानसहान गोष्टींबद्दल द्वेष वाटू लागतो. समाजवादाच्या कट्टर पुरस्कर्त्या रशियातसुद्धा असूया अशा पातळीवर पोहोचलेली आढळते की, शेजाऱ्याच्या घरातील नवीन टेबलक्लॉथसुद्धा डोळ्यांवर येतो, नव्हे, डोळ्यांत खुपतो. लोभ, हाव ही जर भांडवलशाहीतील पापे असतील तर असूया, द्वेष हे समाजवादातील दुर्गुण आहेत. कार्ल मार्क्सचा साम्यवाद जेव्हा वर्गरहित, राजकीय, सामाजिक आणि आर्थिक समतेवर आधारित समाज निर्माण करण्याच्या ध्येयाने आगेकूच करत होता त्यावेळी त्याची घोषणा होती, 'प्रत्येकाकडून त्याच्या पात्रतेनुसार, क्षमतेनुसार घ्या आणि ते प्रत्येकाला त्याच्या आवश्यकतेनुसार, गरजेनुसार द्या.' जगाचा इतिहास असे सांगतो की, समाजवादाच्या तत्त्वांवर उभारलेल्या समाजात सर्वांत जास्त असूया दृष्टोत्पत्तीस येते. आपल्यापेक्षा जरा काही जास्त असणाऱ्या शेजाऱ्याला पाण्यात पाहण्याची प्रवृत्ती रशियन समाजात खोलवर मुरलेली दिसते. त्या रशियन समाजाच्या पार्श्वभूमीवर युरी ओलेशा या रशियन लेखकाने 'एन्व्ही' नावाची लघुकादंबरी लिहिली आहे. त्यातील एका पात्राच्या तोंडी असे वाक्य आहे, 'कुणाचेही काहीही चांगले झालेले पाहिले की, असूयेने माझी बुबुळे बाहेर येतात, हृदयाची आग आग होते, जीव गुदमरतो!'[७४] दोन अगदी टोकाच्या परिस्थितीतल्या व्यक्तींपेक्षा जवळजवळ समान पातळीचे

जीवनमान असणाऱ्यांमध्ये हेवेदावे, असूया जास्त प्रमाणात असते. इंग्लंडच्या राणीविषयी काही कोणी असूया बाळगत नाही!


मी उदारमतवादी आहे, स्वातंत्र्याचा पुरस्कर्ता आहे. कायदे, नियम करणे, नियंत्रणे लादणे यांसारख्या शासनाच्या उपायांनी समाजातील विषमता दूर होऊन समता प्रस्थापित होते याविषयी मला शंका आहे. व्यक्तीं-व्यक्तींतले भेद जेवढे कमी कमी होत जातात तसतशी असूया वाढते; कारण तुलनेसाठी फार मुद्दे उरत नाहीत आणि मग क्षुल्लक कारणे, जरासा फरकही असूया निर्माण व्हायला पुरेसा ठरतो. बहुविध क्षेत्रे आणि त्यातील प्रत्येकात कुशल लोकांची रेलचेल असा विषम समाज मला जास्त पसंत पडतो. इमॅन्युअल काण्ट या जर्मन तत्त्ववेत्त्याने कृत्रिम उपायांनी राखल्या जाणाऱ्या समतेबद्दल भीती व्यक्त केली आहे. मलाही तशीच भीती वाटते. काण्टने म्हटले आहे, 'विषमतेमुळे जसे बरेच वाईट घडते तसे तिच्यामुळे सर्व चांगलेही घडते!' समाजातील वर्गात विषमता असली की, आचारस्वातंत्र्याला चालना मिळते, कारण बरेच लोक असूयेपोटी स्वत:ची प्रगती करून, उन्नती साधून ती विषमता मिटवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करायला प्रवृत्त होतात, असे त्याचे मत आहे.

माझे समतावादी मित्र एक वेगळीच नैतिक कल्पना मांडतात जी मलाही मान्य आहे. ते म्हणतात, 'त्यातील बऱ्याच लोकांना उद्युक्त करणारी भावना ही हेवा, असूया ही नसून, जे पुढे जातात त्यांच्याबद्दलच्या संतापाची असते. सत्ता आणि संपत्ती यांच्या असमान वाटपाच्याच पायावर उभ्या राहणाऱ्या आपल्या समाज-व्यवस्थेबद्दलच समाजवाद्यांच्या मनात विलक्षण चीड असते. त्या मानाने त्यांच्या मनातील आपल्याहून चांगल्या परिस्थितीत जगणाऱ्यांबद्दलची वैयक्तिक असूया अगदीच नगण्य असते. त्यांचे भांडण व्यक्तींशी नसून विषम व्यवस्थेशी असते. अशा प्रकारचा राग ही तर्कनिष्ठ, व्यक्तिनिरपेक्ष नैतिक भावना असते आणि ती बऱ्याच वेळा अनेकांच्या मनात हे जग अधिक सुंदर, अधिक आनंददायी बनवण्यासाठी काहीतरी विशेष करण्याची चेतनाही जागवते.'

निरनिराळ्या प्रकारचे समाजवाद, सुखासमाधानात जीवन व्यतीत करत असलेल्यांना 'लोकांच्या मनात असूया निर्माण करायला तुम्हीच कारणीभूत आहात' अशी एक बोचरी, अपराधी जाणीव देत असतात.[७५] लोकांच्या दुर्दैवाची अनेक कारणे असतात - गरीब कुटुंबात जन्म, काही कौटुंबिक

**८वी आवृत्ती**

# एकच पेला शिवाम्बूचा




## डॉ. शशी पाटील (युरोपॅथिस्ट)

**किंमत : १८०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

निसर्गोपचारा संबंधीच्या अनेक प्रश्नांचा चिंतनशीलव मार्मिक विचार या नाट्य-ग्रंथात सहज, सोप्या भाषेत मांडण्यात आला आहे. ते केवळ व्याधिग्रस्तांनीच वाचावे असे नाही, तर मुमुक्षूंनीही वाचावे. प्रत्येक व्यक्तीचे व्यक्तित्व हे तिच्या स्वास्थ्यानुरूप घडत असते आणि शुद्ध निसर्गोपचार हेच शिकवितो. सर्व लोकांना सर्व काळात उपयोगी पडणारा आणि सर्वत्र लागू होणारा असा हा निसर्गोपचार आहे. डॉ. शशी पाटील हे युरोपॅथिस्ट आहेत. ते मूत्रमार्गाने केल्या जाणाऱ्या उपचारांची नाट्यस्वरूपात माहिती देतात. मूत्र हा शब्दही माणसाला किळसवाणा वाटतो; पण त्या मूत्राचे नैसर्गिक महत्त्व डॉक्टर पटवून देतात. एका सत्यकथेवर आधारित ही नाटिका आहे. निसर्गोपचार पद्धतीने एका रुग्णाच्या आयुष्यात घडलेले बदल या साहित्यकृतीतून समोर येतात. त्यांचा निसर्गोपचार माणसाला खऱ्या अर्थाने निसर्गाच्या नजीक नेतो.

प्रश्न, विसंवादी जोडीदार, आजार, अपघात इत्यादी इत्यादी. त्या सगळ्या कारणांचे निरसन समाजातील समानता करू शकते असा काहींचा विश्वास असतो.[७६] त्यांना शासन म्हणजे एक विमा कंपनी वाटते. तिने सुदैवी लोकांकडून वसुली करावी आणि दुर्दैवी लोकांना मदत करावी अशी त्यांची चुकीची अपेक्षा असते.

असूयेचा विषमतेशी अन्योन्य संबंध आहे यात मुळीच शंका नाही, त्याबद्दल दुमतही नाही. आजवर समाजाने वेगवेगळ्या मार्गांनी हा प्रश्न हाताळला आहे. आपण हे पाहिलेच आहे की, प्राचीन ग्रीक संस्कृतीत नीतिमत्तेशी जोडलेले भाग्य ही कल्पना मानणारे यशस्वी व्यक्तींना बहिष्कृत करत, चीनमधले सुदैवी स्वत:च स्वत:वर टीका करून, सतत स्वत:ची कामगिरी क्षुल्लक असल्याचा उल्लेख करत राहात किंवा यशाला पूर्ण अनुल्लेखाने मारून, लोकांच्या असूयेला वाव मिळणार नाही याची खबरदारी घेत. भारतीय आपल्या अंगी त्याग, निरपेक्षता हे गुण आणि या जन्मातील पाप-पुण्याचा हिशोब पुढील जन्मी केला जातो ही वृत्ती बाणवतात. आधुनिक लोकशाहीत डावी विचारसरणी 'लोकहितैषी, कल्याणकारी राज्य आणि त्यातून विषमतेत कपात' याची मागणी करते, आणि उजवी समानतेवषयी संशय व्यक्त करते, कारण तिच्या मते समानता आचारस्वातंत्र्याला आडकाठी आणते. काही असले तरी या दोन्ही विचारसरणींच्या पुरस्कर्त्यांचे एका बाबतीत मतैक्य व्हायला प्रत्यवाय नसावा की, समाजव्यवस्था न्यायाधिष्ठित असावी, तिने अटळ असणाऱ्या विषमतेचा स्वीकार करावा म्हणजे त्यातून असूयेचा अतिरेक टळेल.

**धर्म आपल्याला जास्त सहनशील बनवेल का?**

मी शिकागो युनिव्हर्सिटीत अभ्यास करत असताना मार्था नसबाउम या तत्त्वचिंतिकेने मला असूया या विषयावरील ग्रीक कवी पिंडार याची एक कविता वाचायला दिली होती. त्यात कवीने 'असत्य जगाला कशी कीड लावते'[७७] यासंबंधी लिहिले होते. त्यात पिंडारने मानवी जीवनाला द्राक्षाच्या नाजूक वेलीची उपमा दिलेली होती. तिला जशी सतत पोषणाची आणि रक्षणाची गरज असते तशीच ती तरुणांच्या गुणांना, उत्कृष्टतेला आवश्यक असते. नसबाउमचा प्रश्न असा होता की, 'माणसाची बुद्धी, तर्कशक्ती या गोष्टी नशिबाचा खेळ, जीवनातील चढ-उतार आणि मानवी असूया यांपासून त्याचा बचाव करायला समर्थ आहेत का?' प्राचीन ग्रीकांचे या

प्रश्नाचे उत्तर 'होय' असे होते.

हेच सूत्र वापरून मला असे बघायचे होते की, प्राचीन काळी ग्रीकांच्या मते मानवी बुद्धी जे काम करीत होती तेच काम महाभारतात धर्माने केले असेल का? धर्मादेशांच्या काटेकोर चौकटीत व्यतीत केलेले जीवन माणसाचे संकटांपासून, उदाहरणार्थ दुर्योधनाच्या असूयेपासून, रक्षण करू शकेल का? या प्रश्नांना युधिष्ठिराचे उत्तर 'करू शकेल' असे होते. त्याला तर ते संकट सतत पराजयाचे दान पडण्याने कोड्यात टाकणाऱ्या, बुद्धी बधिर करणाऱ्या द्यूताच्या कपटी खेळाच्या रूपात भेटले होते. त्या खेळाचे नियम फसवे होते, त्यात सर्वांत अननुभवी, सर्वांत अकुशल खेळाडूला त्याचे सर्वस्व, त्याला स्वत:लासुद्धा पणाला लावणे भाग पाडले होते आणि तो डाव हरणार याविषयी त्याची शंभर टक्के खात्री होती![७८] जे घडत होते त्याबद्दलची अनाकलनीयता जशी त्याच्या चेहऱ्यावर स्वच्छ वाचता येत होती तसाच हा प्रश्नही स्पष्टपणे उमटलेला दिसत होता की, ज्या वेळी त्याने सर्वश्रेष्ठ विजय संपादन केला होता, तो जगज्जेता, सार्वभौम सम्राट म्हणून अभिषिक्त झाला होता, नेमक्या त्याच वेळी ही भयानक घटना का घडावी? हे दुर्दैवाचे दशावतार त्याच्या वाट्याला का यावेत? त्या अवस्थेत दुर्योधनाच्या अधर्माचा सामना करायला, उलट्या पडणाऱ्या फाशांपासून त्याला वाचवायला; या आपत्तीतून त्याचा बचाव, त्याचे रक्षण करायला त्याला धर्माची आठवण होणे, धर्माचा आधार मिळावा असे प्रकर्षाने वाटणे जराही अयोग्य, अनुचित नव्हते.

धर्माचे अस्तित्व सर्वांत प्रकर्षाने जाणवते ते त्याच्या अनुपस्थितीत! महाभारतही धर्माचे शिक्षण याच नकारपद्धतीने, म्हणजे 'अधर्मा'द्वारे देते. दुर्योधनाची असूया हा मूर्तिमंत अधर्म होता. त्या भावनेत असाधारण असे काहीही नव्हते, ती सर्वच माणसांच्या मनात वास करतच असते. ती सर्वव्यापी आहे हे एका म्हणीमधून फार छान सांगितले आहे : 'असूया हा आजार असता तर सगळे जग आजारी पडले असते!' ती भीतिदायक आहे. जेव्हा एखाद्याला दुसऱ्याचे चांगले झालेले बघवत नाही, सहन होत नाही आणि जेव्हा त्याच्याशी बरोबरी करणे त्याला शक्य नाही हेही त्याला माहीत असते त्यावेळी तो 'मला नाही तर कुणालाच नाही' या प्रवृत्तीने ते नासवून टाकतो. सगळ्यांनाच त्रास होईल असे काहीतरी करण्याची असूयेची क्षमता लक्षात घेऊन राज्यकर्त्यांनीही तिच्याकडे एक 'मानसिक दौर्बल्य' म्हणून दुर्लक्ष न करता तिचा गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे. असूया आपले

वैयक्तिक आयुष्यही बिघडवते आणि सार्वजनिक आयुष्याचेही नुकसान करते, म्हणूनच प्रत्येकाने तिच्या या विनाशकारी ताकदीचे महत्त्व ओळखून असले पाहिजे. महाभारत म्हणते, 'असूया पाप नाही, ती 'मनाचा मळ' आहे.'[७९] त्यामुळेच असूयेने ग्रस्त दुर्योधन आजाराने त्रस्त वाटतो; असूया त्याच्या चेहऱ्यावरील तेज ओरबाडून घेते, त्याचे हृदय कोमेजून, कोळपून टाकते. त्याच्या प्रतिस्पर्ध्याला द्यूताच्या कपटखेळात गोवायची नामी योजना शकुनी जेव्हा सुचवतो; तेव्हा त्याच्या जिवात जीव येतो.

खरे तर दुर्योधन लबाडीचा खेळ खेळणारा खेळाडू नव्हे. तो योद्धा आहे. त्याची काही ठाम तत्त्वे आहेत. ती तत्त्वे आपल्याला पटणारी नसतील, त्याचा अहंकार बोचणारा असेल; पण त्याची त्याच्या तत्त्वांशी असलेली एकनिष्ठा, त्याचा त्या बाबतीतला प्रामाणिकपणा, सचोटी यामुळे तो अधर्मी असूनही आपल्या मनात भरतो. तो त्याच्या पित्यासारखा खोटा, दांभिक नाही. त्याच्या विचारांत, वागणुकीत खरेपणा आहे, सातत्य आहे. श्रीकृष्णाच्या देवत्वाचा कोणताही दबाव मनावर न पडू देता तो अतिशय बेदरकारपणे वेळोवेळी श्रीकृष्णासमोर उभा ठाकतो. ते पाहिले की, सत्ता आणि ज्ञान यांच्या प्राप्तीचा ध्यास घेतलेल्या, त्यासाठी स्वत:चा आत्मासुद्धा सैतानाकडे गहाण ठेवणाऱ्या फाउस्ट या जर्मन किमयागाराची आठवण होते. समरांगणावर मृत्युशय्येवर पडला असतानाही तो धाडसाने, स्पष्टवक्तेपणाने श्रीकृष्णाच्या कपटखेळांची यादीच त्याला वाचून दाखवतो. त्याच्या अधर्मी असूयेबद्दल आपल्या मनात नाखुशी असूनही काळ्या ढगाच्या लखलखत्या कडेसारख्या या त्याच्या गुणांमुळे आपल्या मनाविरुद्ध आपल्याला त्याच्याबद्दल आदर वाटू लागतो.

दुर्योधनाच्या व्यक्तिरेखेचे जे चित्रण महाभारतात केले गेले आहे त्यातून महाभारताच्या लेखनशैलीचे एक वैशिष्ट्य नजरेत भरते. त्यातील कोणत्याही व्यक्तिरेखेला एकाच साच्यात घालून दरवेळी एकाच पद्धतीने सादर केले गेलेले नाही. चांगला आणि वाईट अशा दोन ढोबळ उपाधी चिकटवून कुठल्याच व्यक्तिरेखेला दोन कप्प्यांत न टाकता, तिच्या स्वभावाचे कंगोरे घासून तिला चांगल्याची लक्ष्मणरेषा, वाईटाची सीमारेषा ओलांडायची मुभा दिलेली आहे; पात्रांना सैल सोडलेले आहे. नैतिकतेच्या बाबतीतही ते फार कर्मठ नाही. विषयसुख, इंद्रियभोग हे विषय वर्ज्य मानणाऱ्या, नीतिभ्रष्टता, देवाचा प्रकोप, पाप इत्यादी गोष्टींचे भांडवल करणाऱ्या ख्रिश्चन धर्मग्रंथांसारखे महाभारत अतिसोवळेही नाही.

❖

**११वी आवृत्ती**

# 'इट्स ऑलवेज पॉसिबल'


जगातील एका प्रचंड मोठ्या तुरुंगाचा कायापालट

**किरण बेदी**

अनुवाद

**लीना सोहोनी**

**किंमत : ३५०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**




किरण बेदी यांना न्यायनिष्ठ आणि सन्माननीय पोलीस अधिकारी म्हणून ओळखले जाते. त्यांना अनेक मानसन्मान व पुरस्कार यांनी सन्मानित करण्यात आले असून त्यात प्रशासकीय सेवेसाठी देण्यात आलेला 'रेमन मॅगसेसे' या महत्त्वाच्या पुरस्काराचा समावेश आहे.

या विस्तारित आवृत्तीमध्ये किरण बेदी यांच्या बालपणापासून ते आत्तापर्यंतच्या आयुष्यातल्या घडामोडी कथन करण्यात आल्या आहेत. यामध्ये त्यांनी निवृत्तीवयाच्या दोन वर्षे आधीच निवृत्त होण्याचा निर्णय का घेतला, सध्या त्या कोणते काम करत आहेत आदीची अद्ययावत माहिती देणारा विभाग समाविष्ट करण्यात आला आहे.

भारतीय पोलीस सेवेत १९७२मध्ये रुजू झालेल्या बेदी यांनी त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीत नवनव्या गोष्टी करण्याचे 'धाडस' केले. यामध्ये तुरुंगांचे योग्य व्यवस्थापन करणे, प्रशिक्षण देणे अशा गोष्टींचा समावेश होतो. या गोष्टी करणे हे एक आव्हानच होते. हा प्रवास सोपा नव्हता. यात अनेक अडथळे होते; आव्हाने होती. त्यांनी समर्थपणे या आव्हानांचा सामना केला व त्याला धैर्याने तोंड दिले. त्यांच्या गुन्हे रोखण्याच्या योजना आणि कार्यपद्धती प्रशासनातील उच्चपदस्थांना आणि सत्ताधाऱ्यांना पचनी पडणे कठीण होते. न्यायबुद्धीने, सहृदयतेने व सहानुभूतीने विचार करणाऱ्या आणि कार्यक्षेत्री प्रत्यक्ष काम करणाऱ्या त्या एक कार्यतत्पर अधिकारी होत्या.



# अंतरिक्षाच्या अंतरंगात




लीना दामले यांच्या माहेर, मानिनी, स्त्री, किर्लोस्कर व गृहशोभा या मासिकांमधून लघुकथा आणि लेखमाला प्रकाशित झाल्या आहेत.

'पुरुषस्य:चरित्रम' निवडक मराठी लघुकथासंग्रह, प्रपंच प्रकाशन (२००४) त्याशिवाय 'ताऱ्यांची जीवनकथा' मालिका, लोकसत्ता (२००५) आणि लहान मुलांसाठी खगोलशास्त्रावर आधारित मालिका, सकाळ (२००२) च्या सदरात प्रकाशित. 'कथारूपी खगोलशास्त्र' या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा 'राजा केळकर राज्य पुरस्कार २००६' (बालसाहित्य) मिळाला. 'विज्ञान मंथन' विज्ञान मालिका विपुलश्री मासिकातून (२००८) प्रसिद्ध.

जपान-टोकियोमध्ये झालेल्या 'स्टार्स ऑफ एशिया' प्रकल्पाद्वारा आशियाई देशांतील खगोलशास्त्राशी निगडित पौराणिक कथांचा संग्रह करण्यात आला, त्यात भारताचे प्रतिनिधित्व केले.

Michio Kaku यांच्या Physics of the Impossible या पुस्तकाचे भाषांतर 'अशक्य भौतिकी' हे पुस्तक मेहता प्रकाशनातर्फे, तसेच खगोलशास्त्रावर केलेल्या कविता, लेख व आनुषंगिक पुराणकथांचे 'वेध अंतराळाचा' हे पुस्तक प्रकाशनाच्या मार्गावर. ३० डिसेंबर २०१८ रोजी पार पडलेल्या गोमंतकीय महिला साहित्य संमेलनाचे उद्घाटन लेखिकेच्या हस्ते करण्यात आले. तसेच साहित्य संमेलनात खगोलशास्त्रावर एका तासाचे द्रुक्-श्राव्य माध्यमातून प्रस्तुतीकरणही त्यांनी केले.




**लीना दामले**

*खगोलशास्त्राचा अभ्यास करायचा झाल्यास किचकट गणित व भौतिकशास्त्र अशा गंभीर विषयांना तोंड द्यावे लागते.*

*मात्र खगोलशास्त्रातील गणित व भौतिकशास्त्र वगळून*

*जर त्यातील फक्त मनोरंजक माहिती मिळवायची इच्छा असेल,*

*तर त्याने प्रस्तुत पुस्तक जरूर वाचावे.*

*हलक्या फुलक्या भाषेत खगोलशास्त्राशी तोंडओळख करून देता देता लेखिका आपल्या सूर्यमालेतील सभासदांविषयी माहिती देते.*

*तसेच सूर्यमालेबाहेरील विविध परग्रह, ते शोधण्याच्या पद्धती,*

*तारे व ताऱ्यांचे रंग यासंबंधी माहिती देते. विविध प्रकारच्या दुर्बिणी,त्यातून होणारे ब्रह्मांडाचे दर्शन, गुरुत्वीय भिंगांसारखे चमत्कार, तर विश्वनिर्मितीसंबंधी अजूनही समाधानकारक विवेचन न मिळाल्याने शास्त्रज्ञांनी मांडलेले ‘बिग बँग’, ‘स्टेडी स्टेट युनिव्हर्स’ इ.*

*सिद्धान्त विविध लेखांद्वारे लेखिकेने मांडले आहेत.*

(‘अंतरिक्षाच्या अंतरंगात’ पुस्तकातून...)

# पृथ्वीचे कालचक्र

स्पीलबर्गचा ‘ज्युरॅसिक पार्क’ हा सिनेमा खूप गाजला होता. खरे वाटावेत असे डायनोसॉर्स उभे करून स्पीलबर्गने खरोखरीचा ज्युरॅसिक काळच आपल्यापुढे उभा केला. अगदी लहानांपासून ते वृद्धांपर्यंत सगळ्यांनीच या सिनेमाला पसंतीची पावती दिली. पण त्यातील ‘ज्युरॅसिक’ या शब्दाचा नेमका संदर्भ फारच थोड्यांना कळला होता, असावा. तर मंडळी, ज्या काळात पृथ्वीवर या महाकाय डायनोसॉर्सचं राज्य होतं तो काळ होता ‘ज्युरॅसिक काळ’. पृथ्वीचा जन्म झाल्यापासून ते आत्तापर्यंतचा आधुनिक काळ या भल्यामोठ्या कालखंडाचा तो एक भाग आहे. अभ्यासाच्या सोयीसाठी म्हणून शास्त्रज्ञांनीच या भल्या मोठ्या कालखंडाचे वेगवेगळे भाग पाडले आहेत.

पृथ्वीचा जन्म शास्त्रीय अंदाजानुसार साधारण ४.५४ महापद्म वर्षांपूर्वी झाला. जन्म झाला तेव्हा पृथ्वी म्हणजे एक तप्त गोल होता. तो हळूहळू थंड होत गेला. त्याचा पृष्ठभाग घनीभूत झाला आणि गाभा मात्र तप्त द्रवरूप राहिला. जसे तापवलेले दूध थंड झाले की वर घट्ट सायीचा थर येतो आणि खाली कोमट दूध राहते तसे काहीसे, हळूहळू घनीभूत अशा पृष्ठभागातून वायू बाहेर पडून पृथ्वीचे वातावरण तयार झाले. त्यानंतर महासागर निर्माण झाले. पहिले सजीव पाण्यातच जन्मले.

पृथ्वीच्या पाठीवर सजीव नेमके केव्हा निर्माण झाले याचा काळ सांगणं तसं कठीण आहे. पण ढोबळ मानाने साधारण ३.५ महापद्म वर्षांपूर्वी म्हणजे पृथ्वीच्या जन्मानंतर एक महापद्म वर्षानंतर सूक्ष्म जंतू (जीवाणू) अस्तित्वात आल्याचे पुरावे मिळतात.

ज्या कालखंडात सजीवांचे अस्तित्व जाणवायला लागले होते, त्या कालखंडाला फॅनेरोझोईक हे नाव देण्यात आले आहे. पृथ्वीच्या उत्पत्तीपासून आत्तापर्यंतच्या काळाच्या मानाने हा कालखंड तसा लहानच म्हणावा लागेल. लहान म्हणजे, आधुनिक काळापासून, म्हणजे आत्तापासून मागे ५४० दशलक्ष वर्षे इतकाच. पृथ्वीच्या उत्पत्तीचा काळ आधुनिक काळाच्या मागे ४.५४ महापद्म वर्षे इतका आहे. त्यामानाने हा काळ छोटाच म्हणायचा.

फॅनेरोझोईक हा कालखंड पॅलिओझोईक, मेसोझोईक व सेनोझोईक या

तीन कालखंडांचा मिळून बनला आहे. या कालखंडात अनेक पेशी, जिवाणूंचे अस्तित्व पृथ्वीवर होते, ते खडकांमधे जपल्या गेलेल्या जिवाष्मांमुळे सिद्ध होते. फॅनेरोझोईक काळाच्या आधी म्हणजे प्री-केंब्रियन या काळात सूक्ष्म जीव अस्तित्वात होते. पण त्यांचे जीवाष्म जपले गेले नाहीत.

या तीनही कालखंडाचे अजून उपविभाग पाडले आहेत.

**पॅलिओझोईक :** हा कालखंड साधारण ५४० दशलक्ष वर्षे ते २५० दशलक्ष वर्षे एवढा धरतात. या जवळजवळ २९० दशलक्ष वर्षांच्या कालखंडाचे ६ उपविभाग पाडले आहेत. त्यातील एकाचे अजून दोन म्हणजे उप-उपविभाग पाडले आहेत.

पॅलिओझोईक : (१) केंब्रियन, (२) ओर्डोव्हीशियन, (३) सिलूरियन, (४) डेव्होनियन, (५) कार्बोनिफेरस : अ. मिसिसिपियन, ब. पेनसिलव्हानियन, (६) पर्मिअन

पॅलिओझोईक हा या तीनही कालखंडातील सगळ्यात मोठा आणि वैविध्याने भरलेला असा कालखंड आहे. अगदी प्राचीन अशा अनेकपेशी जिवांपासून ते आधुनिक सरपटणारे प्राणी – टेट्रापॉड आणि रेप्टाइल्स – इथपर्यंतचे प्राणीजीवन यात सापडते. शिवाय भरपूर जंगलेही त्याकाळी अस्तित्वात होती. अगदी सुरुवातीचा पॅलिओझोईक काळ हा पाठीचा कणा नसलेल्या प्राण्यांचा (इन्व्हर्टिब्रेट्सचा) काळ म्हणता येईल. या काळात पृथ्वीवरील खंड एकमेकांपासून दूर गेले होते. पॅन्जिआच्या निर्मितीच्या आधी. (पॅन्जिआ हा सुपरकॉंटिनेंट फुटून परत सर्व खंड एकमेकांपासून दूर गेले. ही आजची स्थिती आहे.) ओर्डोव्हीशियन काळाच्या शेवटी झालेल्या खूप तीव्र पण कमी कालखंडाच्या हिमयुगाने, सुरुवातीच्या पॅलिओझोईक (Early paleozoic) कालखंडाचा अंत झाला.

मध्य पॅलिओझोईक म्हणजे साधारण सिलूरियन आणि डेव्होनियन हा कालखंड. या कालखंडात प्रायोगिक तत्वावर अस्तित्वात असलेलं प्राणीजीवन संपुष्टात आलं. कारण त्या हवामानात ते प्राणी टिकू शकले नाहीत. या काळात पाठीचा कणा नसणाऱ्या प्राण्यांमध्ये (अपृष्ठवंशीय) सुधारणा होत गेल्या आणि पाठीचा कणा असणाऱ्या प्राण्यांचा (व्हर्टिब्रेट्स – पृष्ठवंशीय) उदय होत गेला. पाण्यात मासे निर्माण होत होते. आत्तापर्यंत पाण्यातच अस्तित्वात असलेलं प्राणीजीवन जमिनीवर अवतरले होते.

लेट पॅलिओझोईक म्हणजे साधारण कार्बोनिफेरस आणि पर्मिअन काळ. सरपटणाऱ्या प्राण्यांनी पृथ्वीचा कब्जा घेतला तो हाच काळ. या काळात राक्षसी लायकोपॉड, फर्न, टेरिडोफाईट्स यांसारख्या वनस्पतींनी जंगलं व्यापली होती. सुरुवातीच्या पॅलिओझोईक काळात लांबवर विखुरलेले पृथ्वीवरील खंड जवळ जवळ येत पर्मिअन काळापर्यंत एकत्र येऊन पॅन्जिआची निर्मिती झाली होती. आणि दक्षिण गोंडवनालँड हिमनद्यांखाली झाकलं गेलं होतं.

एकंदर पॅलिओझोईक कालखंड बऱ्याच महत्त्वाच्या घटनांचा साक्षीदार आहे. या काळात अपृष्ठवंशीयांची घडण, जमिनीवर जीवनाची सुरुवात, समुद्रात माश्यांची उत्पत्ती, सुपर कॉंटिनेंट पॅन्जिआची निर्मिती इत्यादी अनेक महत्त्वाच्या घटना घडल्या. याच काळाने दोन हिमयुगं अनुभवली. पृथ्वीची गती त्या काळात आजच्यापेक्षा जास्त होती. त्यामुळे दिवस छोटे होते. चंद्रसुद्धा आजच्या पेक्षा पृथ्वीच्या जास्त जवळ होता. त्यामुळे समुद्राच्या भरतीचे प्रमाण जास्त होते. दिवसेंदिवस चंद्र आपल्यापासून लांब लांब जातोय. एक दिवस असा येईल जेव्हा चंद्र पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाच्या कक्षेच्या बाहेर जाईल आणि पृथ्वीला कायमचा राम राम ठोकेल.

हवामान :– सुरुवातीच्या पॅलिओझोईक काळातील ओर्डोव्हिशीयन काळ संपता संपता एक हिमयुग येऊन गेलं. याच हिमयुगाच्या काळात त्या काळात अस्तित्वात असलेले प्राणीजीवन मोठ्या प्रमाणात संपुष्टात आलं (Mass extinction).

पॅलिओझोईकचा मधला काळ सिलूरियन आणि डेव्होनियन तुलनेने जरा स्थिर असा काळ होता. हिमयुगामुळे खाली गेलेली समुद्राची पातळी या काळात हळू हळू भरून आली. पृथ्वीवरील खंडांच्या हालचालींमुळे नवीन भूखंड तयार होत होते. त्यात तुलनेने ऊबदार वातावरण होते. नवीन वनस्पतींनी जमिनीवर कब्जा केला होता. त्यामुळे ऑक्सिजन वायूचे प्रमाण वाढून कार्बन डाय ऑक्साईड वायूचे प्रमाण घटले होते. डेव्होनियन काळात मात्र वातावरणातील चढ-उतारांमुळे परत एकदा प्राणीजवनावर आघात होऊन सर्व पृष्ठवंशीय प्राणी संपुष्टात आले.

डेव्होनियनच्या पुढचा काळ कार्बोनिफेरस ज्याचे दोन उपविभाग म्हणजे मिसिसिपियन आणि पेनसिल्व्हानियन. यातील पहिला मिसिसिपियन काळ साधारण ३० ते ४० दशलक्ष वर्षांचा धरतात. या काळात पृष्ठवंशीय (व्हर्टिब्रेट) प्राणी आणि अपृष्ठवंशीय (इनव्हर्टिब्रेट) प्राणी यांनी पृथ्वीवर आपला जम बसवला होता. याच काळात वातावरणातील ऑक्सिजन मधे

# सर्चिंग फॉर डॅडी




**ख्रिस्तिन जोआना हार्ट**

अनुवाद

**डॉ. प्रमोद जोगळेकर**

**किंमत : २५०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**

ती चार वर्षांची असताना तिला मरून जावंसं वाटलं. आपल्यावर प्रेम करणारे आईवडील आपल्याला मिळतील अशी लहानग्या ख्रिस्तीनची अपेक्षा होती, पण आधी अनाथालयांमध्ये आणि नंतर बाहेरच्या जगात ठोकरा खाताना तिच्या वाट्याला काय आलं, तर फक्त अवहेलना, तिरस्कार, अपमान आणि विलक्षण एकाकीपणा.
एकाकी ख्रिस्तीननं इंग्लंडच्या इतिहासातील सर्वांत भयंकर खुन्याशी आपलं नातं आहे असं मानलं. त्या परिस्थितीपेक्षा आयुष्यात आणखी भीषण ते काय असणार असं तिला वाटलं खरं, पण सत्य काय ते तिला लवकरच कळणार होतं.

फार मोठ्या प्रमाणात वाढझाली. कार्बन डायऑक्साईड कधी नव्हे इतका कमी झाला. त्यामुळे पूर्ण कार्बोनिफेरस काळात एक सोडून दोन हिमयुगं अवतरली.

कार्बोनिफेरस काळानंतरचा पर्मिअन काळ हा पॅलिओझोईक काळानंतरचा पर्मिअन काळ हा पॅलिओझोईक कालखंडाचा शेवटचा भाग. या काळाच्या शेवटीही मोठ्या प्रमाणात प्राणीजीवन नष्ट झालं. ऑक्सिजन आणि कार्बन डायऑक्साईड या वायूंचे प्रमाण जरी सर्वसामान्य राहिलं तरी त्याच काळात घडत असलेल्या पॅन्जिआच्या निर्मितीच्या कारणाने जमीन ठिकठिकाणी रूक्ष, रखरखीत शुष्क अशी झाली होती. त्यामुळे तापमानात खूप चढउतार झाले. म्हणून प्राणीजीवन नष्ट झाले.

**मेसोझोईक काळ :** फॅनेरोझोईक काळाच्या तीन भागातील हा मधला काळ. त्याला सेकंडरी असंही म्हणतात. मेसोझोईकचा अर्थ 'मिडल ॲनिमल' असा काहीतरी होतो. अशा या काळात जगातील प्राणीजीवनात प्रचंड बदल झाला. मेसोझोईक कालखंडाचे तीन उपविभाग पाडले आहेत. ट्रायॅसिक, ज्युरॅसिक आणि क्रिटॅशिअस. ट्रायॅसिक काळातच बहुचर्चित असे डायनोसॉर्स निर्माण झाले. ज्युरॅसिक काळात डायनोसॉर्सच्या अनेक जाती निर्माण झाल्या. एकंदर मेसोझोईक काळाला 'एज ऑफ डायनोसॉर्स' म्हणजे डायनोसॉर्सचा काळ असेच म्हणतात.

मेसोझोईक काळात पृथ्वीवरील जीवसृष्टी फार वेगळी होती. मेसोझोईक काळाचा पहिला भाग ट्रायॅसिक काळ साधारण २५० ते २०३ दशलक्ष वर्षांपूर्वीचा आहे. या काळात छोटे छोटे सस्तन प्राणी आणि छोटे डायनोसॉर्स निर्माण झाले. या काळाची सुरुवात एका मोठ्या 'मास एक्स्टींक्शन'पासून म्हणजे प्राणी जीवन मोठ्या प्रमाणावर नष्ट होण्यापासून झाली. शेवटही एक छोट्या 'मास एक्स्टींक्शन'नेच झाला. त्यावेळचे हवामान उष्ण आणि कोरडे होते. वनस्पती जगतात फर्न, ग्लॉसॉप्टेरिस नावाची प्राचीन वनस्पती, कॉनिफर्स इत्यादीचे अस्तित्व होते. समुद्राच्या पाण्याची पातळी कमी असल्याने तापमानातही फार चढ-उतार होते.

मेसोझोईक काळाचा दुसरा भाग म्हणजे ज्युरॅसिक काळ. या काळात म्हणजे २०३ ते १३५ दशलक्ष वर्षांपूर्वी सुपरकॉंटिनेंट पॅन्जिआचे विभाजन व्हायला लागलं होतं. सुरुवातीला हवामान उष्ण व कोरडेच होते पण ते नंतर उबदार व दमट होत गेले. त्यावेळी ध्रुव प्रदेशात बर्फ नव्हताच. समुद्राच्या

पाण्याच्या पातळीत वाढहोत होती. त्यामुळे बरेच किनारपट्टीजवळील प्रदेश पाण्याखाली गेलेले होते. याच काळात सॉवरोपॉड्स नावाचे राक्षसी डायनोसॉर्स निर्माण झाले. पहिलेवहिले पक्षी आणि फुलं येणाऱ्या वनस्पती (ॲन्जिओस्पर्म्स) अस्तित्वात आले.

मेसोझोईकमधील तिसरा भाग म्हणजे क्रिटॅशियस काळ. साधारण १३५ -६५ दशलक्ष वर्षांपूर्वीचा आहे. सुरुवातीला या काळात डायनोसॉर्सच्या पृथ्वीवरील सत्तेचे उंच शिखर गाठले गेले होते. मात्र याच काळाच्या शेवटी भल्या मोठ्या उल्कापातामुळे अथवा अन्य कारणांनी सर्व डायनोसॉर्सचा अंत झाला.

क्रिटॅशियस काळातल्या हवामानाबद्दलची माहिती वादग्रस्त आहे. त्या काळात वातावरणात कार्बन डायऑक्साईड वायू प्रमाणाबाहेर वाढल्यामुळे सबंध पृथ्वीवर उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत सगळीकडे साधारण सारखेच तापमान होते. तेव्हाचे सरासरी तापमान आत्ताच्या सरासरी तापमानापेक्षा १०°C ने जास्त होते. समुद्राचे पाणीसुद्धा जास्त उबदार झाल्यामुळे समुद्री जीव तग धरू शकले नसतील.

क्रिटॅशियस काळाचा शेवट आणि टर्शरी (3rd – फॅनेरोझोईक काळाचा तिसरा भाग) ची सुरुवात, या सीमारेषेला K-T boundary असे म्हणतात. याच सीमारेषेवर सर्व महाकाय डायनोसॉर्सचा अंत झाला.

**KT boundary** : क्रिटॅशिअसचे स्पेलिंग C पासून सुरू होत असले (cretaceous) तरी जर्मन भाषेप्रमाणे तेथे K चा वापर होतो. त्यासाठी हे अक्षर घेण्यात आले आणि Tertiary म्हणजे तिसरा कालखंड (cenozoic मधे तिसरा व चौथा – quarternary असे दोन भाग आहेत) त्यातील टर्शरीचा T. हे दोन कालखंड एकमेकांना लागून आहेत. म्हणजे क्रिटॅशिअस आणि टर्शरी यांच्यामधे एक सीमारेषा आहे. त्याला KT boundary म्हणतात. या सीमारेषेच्या काळात म्हणजे ६५ दशलक्ष वर्षांपूर्वी सर्व डायनोसॉर्सचा पृथ्वीवरून नायनाट झाला.

त्या काळात अस्तित्वात असलेल्या व काळात नष्ट झालेल्या डायनोसॉर्सच्या ५०० जाती शास्त्रज्ञांना निश्चित माहिती आहेत. १८५० जातींच्या डायनोसॉर्सचे जीवाश्म जपले गेलेत. पण अवशेष जपले गेलेले नाहीत अशा डायनोसॉर्सच्या ३४०० जाती असाव्यात असे शास्त्रज्ञांना वाटते. १६० दशलक्ष वर्षे पृथ्वीच्या पाठीवर या महाकाय प्राण्यांनी राज्य केले. ६५ दशलक्ष वर्षांपूर्वी मात्र ते सर्व नष्ट झाले. आणि पृथ्वीच्या पाठीवर

एका नव्या पर्वाने जन्म घेतला.

यानंतरचा काळ म्हणजे फॅनेरोझोईक कालखंडाचा तिसरा म्हणजे टर्शरी भाग ज्याला सेनोझोईक असेही म्हणतात.

सेनोझोईक काळाचे असे ६ उप-उप विभाग पाडलेले आहेत. सगळ्यात शेवटचा होलोसीन म्हणजे आताचा चालू काळ. सेनोझोईक काळ हा ६५ दशलक्ष वर्षांचा काळ आहे. एक पूर्णपणे वेगळा सातवा उपविभाग जो शेवटचा ११००० वर्षांचा काळ आहे, म्हणजे आताच्या आधुनिक काळापासून मागे ११००० वर्षापर्यंतच्या काळाला होलोसीन (Holocene) म्हणतात.

या काळातच सस्तन प्राण्यांमधे सुधारणा व्हायला सुरुवात झाली आणि प्राणी जगतात त्यांचं वर्चस्व निर्माण झालं. छोट्या उंदरांपासून सुरुवात होऊन प्रचंड मोठे मोठे सस्तन प्राणी निर्माण झाले. जमिनीवर वावरणारे, पाण्यातील तसेच हवेत उडणारे असे सर्व तऱ्हेचे प्राणी-पक्षी निर्माण झाले. सेनोझोईकच्या सुरुवातीपासून पृथ्वीवर पहिल्यांदाच गवत हा वनस्पतीचा नवा प्रकार निर्माण झाला. त्यावरच अनेक मोठे शाकाहारी प्राणी जगू लागले आणि त्यांच्यावर मोठे मांसाहारी प्राणी वाढू लागले.

सेनोझोईक काळाच्या शेवटी प्लायोसीन काळात मानवाचे पहिले पूर्वज ऑस्ट्रॅलोपिथिकाईन पृथ्वीच्या पाठीवर जन्मले.

आधुनिक काळापासून म्हणजे आत्तापासून मागे, भूतकाळात ५४० दशलक्ष वर्षांपर्यंत या कालखंडात पृथ्वीवर प्राणी व वनस्पती जगात जसे बदल होत होते तसेच पृथ्वीच्या रचनेमधेही बदल होत होते. पृथ्वीच्या पाठीवरील खंडांची जागा सतत बदलत होती. अर्थात खंडांची हालचाल सूक्ष्म असते. लाखो वर्षांच्या काळाने काही थोडे बदल होतात. पण ५४० दशलक्ष वर्षांच्या कालावधीत मात्र पृथ्वीच्या पाठीवर भरपूर फेरफार झाले. त्या फेरफारांमुळे प्राणी व वनस्पती सृष्टीतही बदल घडले.

फॅनेरोझोईक कालखंडाचा शेवटचा म्हणजे प्लाएस्टोसीन काळ २ दशलक्ष वर्षांपूर्वी सुरू झाला. तो आत्ताही सुरू आहे. याच काळात मानवाचे पूर्वज व आधुनिक प्राणी निर्माण झाले. दगडाची हत्यारे बनवणाऱ्या मानवापासून ते आत्ताच्या अत्याधुनिक यंत्रसामुग्री वापरणाऱ्या मानवापर्यंतची प्रगती व्हायला दोन दशलक्ष वर्षे जावी लागली. मानवाने केलेली विज्ञान तंत्रज्ञानातील प्रगती हीच हा सर्व इतिहास समजून घेण्यास उपयोगी पडत आहे.

❖

**९वी आवृत्ती**

# आवरण

**डॉ. एस्. एल्. भैरप्पा**

अनुवाद

**उमा कुलकर्णी**

**किंमत : २८०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**




स्मरणाने सत्य झाकोळून टाकणाऱ्या
मायेला 'आवरण' म्हणतात...
मला कळायला लागल्यापासून
'सत्य-असत्याचा प्रश्न' हा छळणारा प्रश्न आहे...
हीच समस्या 'आवरण'मध्ये
समूह आणि संपूर्ण राष्ट्राच्या पातळीवर
उफाळून आली आहे......
...मागे कुणीतरी केलेल्या चुकांसाठी
आजचे जबाबदार नाहीत हे तर खरंच,
पण मागच्यांशी नातं जोडून
'आपण त्यांचेच वारसदार'
या भावनेत आपण अडकणार असू,
तर त्यांनी केलेल्या कर्माची
जबाबदारी स्वीकारावी लागेल.
इतिहासाकडून मिळवण्याइतकंच,
त्याच्याकडून सोडवून घेणं
हे परिपक्वतेचं द्योतक आहे.
प्रत्येक धर्म, जाती आणि व्यक्तीला
लागू पडणारी गोष्ट आहे ही...

**- डॉ. एस्. एल्. भैरप्पा**

# पुस्तक परिचय



## द फकीर




रुझबेह भरूचा हे अर्थशास्त्रात पदवी मिळवल्यानंतर त्यांनी स्वतंत्र लेखनास सुरुवात केली. ‘व्हेंचर’ या मासिकाचे संपादन आणि प्रकाशन त्यांनी केले. तसेच विविध नियतकालिकांमधूनही विपुल लेखन केले. ‘द लास्ट मॅरेथॉन’ हे त्यांचे पहिले पुस्तक सन २००० मध्ये तर ‘देवी नाईन्टीन्स एमराल्ड’ हे त्यांचे दुसरे पुस्तक २००२ मध्ये प्रकाशित झाले. ही दोन्ही पुस्तके वैश्विक आध्यात्मिक शक्तीविषयी आहेत. ‘शॅडोज इन केजेस’ हे त्यांचे तिसरे पुस्तकही गाजले.

भारतीय तुरुंगात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या महिला कैदी आणि त्यांची मुले यांचे प्रश्न त्यांनी ‘आय बिलिव्ह आय कॅन फ्लाय’ या त्यांच्या डॉक्युमेंटरीत मांडले. या डॉक्युमेंटरीची कथा आणि दिग्दर्शन श्री. भरूचा यांनी केले.

त्यांची पुस्तके आणि डॉक्युमेंटरीज आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध झाल्या आहेत.

याशिवाय ‘रेस्ट इन पीसेस’ हे पुस्तक आणि ‘यमुना जेंटली वीप्स’ ही त्यांची डॉक्युमेंटरी आंतरराष्ट्रीय स्तरावर वाखाणली गेली आहे.




## रुझबेह एन. भरूचा

अनुवाद

**सुनीति काणे**

*आत्महत्येकडे कल असलेला एक हिप्पी आणि अजब विनोदबुद्धी असलेला एक फकीर, असा प्रवास जो तुमचं आयुष्य कायमचं बदलू शकेल....*

*जिथं देव आणि गुरू वास करतात, त्या तुमच्या अंतर्मनाला अर्पण केलेला, 'फकीर' हा श्वास रोखायला लावणारा, आत्म्याच्या साहसी मुशाफिरीचं रेखाटन करणारा 'अक्षर' नजराणा आहे. जिवंत असण्याचा आनंद अनुभवा, सोपं पण आयुष्य बदलून टाकणारं, सर्वांबद्दल दयाभाव राखण्याचं तत्त्वज्ञान शिका आणि बदलाकडचं पहिलं पाऊल उचलून स्वत:ला बरं करा.*

*ही आहे एक चित्तवेधक कहाणी. कर्म, दैवी कृती, मृत्यूनंतरचं आयुष्य, आत्म्याचा आत्म्याशी संपर्क, प्रार्थनेतली शक्ती, श्रद्धा आणि क्षमा, ऊर्जा आणि बरं करणं, चांगुलपणात देवाचा शोध घेणं आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे सतत गुरूशी सुसंवाद साधून राहाणं, यासारखे गहन प्रश्न, ती सोप्या, समजेल, उमजेल अशा पद्धतीनं हाताळते.*

*'द फकीर' फक्त तुम्हाला कसं जगायचं एवढंच शिकवत नाही... पण मरण कसं स्वीकारायचं तेही शिकवतं.*

('द फकीर' पुस्तकातून...)

काही क्षण रुद्र, नुसताच त्या वृद्धाकडे डोळे विस्फारून बघत राहिला. अजूनही रक्तस्राव होतच होता. तरी तो वृद्ध वेदना, दु:ख किंवा गोंधळल्याचं कोणतंही चिन्ह दर्शवित नव्हता. त्यानं रुद्रकडे इतकी स्नेहमय नजर टाकली की अनेक वर्षांत प्रथमच त्याला आपली सारी दु:खं, अपमान, आरोप, यातना आणि अस्तित्वाची निष्फळता हे सारं नुसतं सुसह्यच वाटलं नाही तर त्यामागचा अर्थही उमगला! की असं का घडलं? अजूनही रुद्रला ते उमगत नव्हतं. एका गोष्टीबाबत त्याची खात्री होती प्रथमच त्याच्या आत्म्यानं, उमदेपणानं आणि पूर्ण लीनभावानं आपला भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळही स्वीकारला होता. ही भावना नुसती शांतवणारीच नव्हती तर अत्यंत आश्चर्यकारक होती.

अशी परिस्थिती होती की जर या वृद्धानं, रुद्रला स्वत:चं मनगट कापून घ्यायला सांगितलं असतं तर त्यानं फक्त एक प्रश्न विचारला असता. कोणत्या हाताचं मनगट? जर त्या वृद्धानं त्याला मरायला सांगितलं असतं तर रुद्रनं फक्त विचारलं असतं की कसं, केव्हा आणि कुठे? पण त्याला सर्वांत जास्त धक्का बसला तो या जाणिवेमुळे की त्या वृद्धानं त्याला उमदेपणानं जगण्याची आज्ञा केली तरी तो फक्त होकाराची मान डोलावून, त्याची तजवीज सुरू करेल! रुद्रची खात्री होती, अगदी स्वत:च्या अस्तित्वाबद्दल आणि आपल्या मुलांबद्दल वाटणाऱ्या प्रेमाबद्दल जेवढी खात्री होती तेवढीच खात्री होती की या वृद्ध

*''बाळा, देह, मन किंवा हृदयाला असणाऱ्या यातनांचा अर्थ असतो की तुमच्या आत्म्यावर देवानं पीक काढण्याजोगी ती भूमी सुपीक आहे. पण जर तुम्ही त्या वेदनांमुळे कडवट, नकारात्मक, क्षुद्र आणि सूडबुद्धीचे बनलात... तर बाळा, तुम्ही देवाच्या छायेत चालण्याची सर्वांत मोठी संधी गमावली आहे. पण बाळा, जर तुम्ही दु:खाचा उपयोग तुमच्यातील चांगुलपणाला साद घालण्यासाठी केलात तर स्वर्गाचं राज्य तुमचंच आहे. फक्त तुम्ही शेवटचा श्वास घेऊन तुमचा नश्वर देह सोडल्यावरच नव्हे, तर जिवंत असतानाही! जगताना प्रत्येक श्वासागणिक खांद्यावरलं ओझं तसंच असेल पण ते पेलणारे खांदे बळकट होतील. देहावर आसूड उठतील, पण देवाहातचं मलम त्याच्या वेदना तुमच्यापर्यंत पोहोचवणार नाहीत. बाळा, स्वर्गाचं राज्य अनेक आश्चर्यांनी भरलेलं आहे. सर्वांत महान आश्चर्य आहे,*

*वेदनांमधून देवाची अनुभूती घ्यायला शिकणं....''*

माणसाखातर तो जगतदेखील राहील. असं का? ते त्याला ठाऊक नव्हतं आणि त्याबद्दल त्याला फिकीर वाटत नव्हती.

मग काहीतरी अघटितच घडलं. त्या वृद्धानं आपला हात उंचावला आणि रुद्रचा चेहरा कुरवाळला. त्या वृद्धाच्या रक्ताळलेल्या तळव्यानं आपला उजवा गाल भिजलेला रुद्रला जाणवला. त्यानंतर जे घडलं त्यानं त्याला धक्काच बसला. तो रडू लागला. त्याच्या गालांवरून आसवं ओघळू लागली, त्याच्या चेहऱ्यावरच्या रक्तात मिसळली आणि त्याच्या गळ्यावरून खाली वाहू लागली. सुरुवातीला अश्रू हळूहळू ओघळत होते, पण काही क्षणांतच रुद्रनं आपलं मस्तक त्या वृद्धाच्या छातीवर टेकवलं आणि तो एखाद्या बालकासारखा हुंदके देऊन रडू लागला.

रुद्र रडत असताना सारा वेळ तो वृद्ध माणूस हळुवारपणे त्याची पाठ कुरवाळत होता. रुद्रला आपल्या पाठीच्या कण्यात एक वेगळीच चेतनेची भावना सरसरत वर-खाली होताना जाणवू लागली. त्याचा श्वासोच्छ्वास नियमित होऊ लागला. त्यानं हळूच आपलं डोकं वर उचललं आणि तो त्या वृद्धाच्या बाजूला गुडघे टेकून बसला. रुद्रची खात्री होती की जे काही घडत होतं ते सर्वस्वी सामान्य स्थितीच्या बाहेरचं होतं. काहीच नेहमीसारखं नव्हतं. तो वृद्धही सामान्य नव्हता. नाही! त्या वृद्धाबाबत काहीच सर्वसाधारणं नव्हतं. तो गंभीररीत्या जखमी झाला होता, तरीही हसऱ्या बुद्धाच्या एखाद्या कृश प्रतिमेप्रमाणे सतत स्मितवदनच होता. तो जखमी झाला होता, पण एकदाही वेदनेनं त्याचा चेहरा आक्रसला नाही किंवा यातनेनं तो कण्हला नाही. त्याचे ते डोळे! ते इतके शांत, दोषारोप न करणारे, करुणेनं ओतप्रोत भरलेले होते. आपण सहजपणे त्या डोळ्यांत नजर भिडवू बघत राहू शकत होतो, सुरक्षिततेची अनुभूती मिळवू शकत होतो आणि क्षमा मिळाल्याची भावना अनुभवत होतो. जणू काही ते डोळे सर्वांना आश्वस्त करत होते, सारे काही मंगल आहे आणि धर्मगुरू किंवा पवित्र ग्रंथांचे अर्थ सांगणारे लोक देवाबद्दल जी समजूत करून देतात, त्याहून तो कितीतरी अधिक दयाळू आणि क्षमाशील आहे.

ते डोळे जणू सांगत होते, प्रत्येक संताला भूतकाळ असतो आणि प्रत्येक पाप्याला भविष्यकाळ! ज्या देवानं 'ग्रँड कॅनियन', एव्हरेस्टसारखं

भव्य शिखर असलेला ‘हिमालय’ यासारखी आश्चर्ये बनवली, तोच देव वेळ काढून रोज नव्या रंगांनी सूर्योदय आणि सूर्यास्त रंगवत असतो. तोच रस्त्याच्या कडेला उगवलेल्या बेवारशी झाडांना रोज पहाटेच्या दवातून ओलावा पुरवतो. तोच देव आफ्रिकेतल्या उपेक्षित सुरवंटाचं, फुलपाखरू करतो. जेव्हा एखादं अर्भक रडतं तेव्हा त्याच्या आईला तोच देव त्या रडण्यामागचं कारण जाणवून देतो – आपलं चिमुकलं बोळकं उघडून बाळानं फोडलेला टाहो भुकेमुळे आहे, ओल्या लंगोटामुळे आहे, पोटातल्या दुखण्यामुळे आहे की झोपेमुळं आहे, कंटाळल्यामुळे आहे की त्याला फक्त एक प्रेमाची हळुवार मिठी हवी आहे!

मंगळावर वसंत फुलावा किंवा मानवजातीला अचानक साक्षात्कार व्हावा की शांतीनं जगून भुकेल्या, मरणासन्न,नागवलेल्या माणसांसोबत वाटून घेऊन, आपली मालमत्ता उपभोगण्यातच आपलं हित आहे. या गोष्टी जितक्या साध्या, नेहमी घडणाऱ्या वाटू शकतील, तेवढाच हा वृद्धही सर्वसाधारण होता.


‘‘बाळा, या फकिराला वाटतंय, तुझ्याजवळ फारसं आयुष्य शिल्लक नाही!’’

ते ऐकून, रुद्रला अनेक कारणांमुळे धक्का बसला होता. एकतर तो वृद्ध इंग्रजीत बोलला. तो मुसलमान फकिरासारखा दिसत होता, बहुतेक वेळा असे पुण्यात्मे स्थानिक भाषेतच बोलतात. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, त्या वृद्धानं वर्तवलेली भविष्यवाणी अगदी अचूक होती. रुद्रच्या, पृथ्वीतलावरील वास्तव्याचा फार थोडा काळ उरलेला होता. नशिबानं त्याला तो शांतपणे घालवता येणार होता. आणखी एक आश्चर्य म्हणजे हे सारं नुसतं, खुणेच्या भाषेत आणि ओठांच्या हालचालींवरून व्यक्त झालेलं नव्हतं, तर आश्चर्याची गोष्ट म्हणजे रुद्रला ते सारं समजलंही होतं. खुणेची भाषा आपल्याला समजावी आणि ओठांच्या हालचालींवरून अर्थ उमगावा याचा त्याला आता धक्काही बसला नाही. पण ज्या सहजतेने या साऱ्या अतर्क्य गोष्टींचा त्यानं स्वीकार केला होता, त्याचंच त्याला आश्चर्य वाटत होतं. ‘सर्वसाधारण परिस्थिती’ ही मनाचीच एक समजूत असते, त्याला घातलं गेलेलं एक वळण असतं. सर्वसाधारण काय आणि वेगळं काय हे कुणी ठरवायचं? हे उमगायच्या किंवा त्याबाबत फिकीर करायच्या पलीकडे रुद्र पोहोचला होता.

**७वी आवृत्ती**

# आलेख

## रणजित देसाई




**किंमत : १९५/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

'आलेख' हा रणजित देसाईंचा
ग्रामीण जीवनावर आधारित कथांचा संग्रह.
गाव वरवर जरी शांत वाटले तरी
अंतरंगात कितीतरी घडामोडी चाललेल्या असतात.
गावची चावडी, पार, हिरवेगार मळे,
चिरेबंदी वाडे, गरिबाची झोपडी, डोंगरमाथे, करवंदांच्या जाळ्या ही घटनांची केंद्रस्थळं.
गावातली तऱ्हेवाईक, इरसाल, बेरकी, गरिबीने गांजलेली, देवभोळी, अंधश्रद्धाळू माणसं!
निसर्ग आणि जनावरं यांच्याशिवाय
त्यांच्या जीवनाला पूर्णत्व येतच नाही.
ही माणसं त्यांच्या ईर्षा, त्यांचा बाणेदारपणा,
यातना, मुलांवरची माया, शहरवासीयांशी
त्यांचे येणारे संबंध, सर्व सच्चेपणाने जगतात, निभावतात.
निसर्ग आणि जनावरांशी एकरूप झालेली ही माणसं
त्यांच्या रंगरेषांसह देसाई यांनी आपल्या लेखणीतून तितक्याच सच्चेपणाने चितारलेली आहेत.

त्या वृद्धानं, आपल्या जखमांकडे लक्ष पुरवायची रुद्रला परवानगी दिली. त्याच्या टाळूला चांगलीच खोक पडली होती, पण सुदैवानं कोपरांवर थोडंसंच खरचटलं होतं. तो वृद्ध प्रथम पाठीवर पडला होता आणि मग त्याची कोपरं आणि टाळू यांना मार बसला होता, हे लक्षात येत होतं. एकही शब्द न बोलता रुद्रनं जंतुनाशकानं त्या जखमा स्वच्छ केल्या. नंतर त्यानं आश्चर्यकारक चतुराईनं आणि सफाईनं (!) त्यानं फकिराच्या डोकं आणि उजवं कोपर यांना पट्ट्या बांधल्या.

''माझं प्रथमोपचाराचं कौशल्य भयानक आहे हे मला माहीत आहे, पण मला इतकंच करणं शक्य आहे. आपण नंतर चांगल्या डॉक्टरकडून ते नीटपणे करून घेऊ,'' रुद्र अगदी सावकाश बोलत होता. त्या वृद्धाला ऐकू येतंय की, नाही याबद्दल त्याला खात्री वाटत नव्हती. नाहीतर तो रुद्रशी खुणांच्या भाषेत आणि मोठ्यांदा उच्चार न करता फक्त ओठांच्या हालचालीनं का बरं बोलला असता? त्या वृद्धानं स्मित केलं आणि रुद्रचा चेहरा कुरवाळला.

''काळजी करू नकोस. जे काही तू करतो आहेस, तो तुझा सर्वोत्कृष्ट प्रयत्न असला, तर लाज बाळगायचं काहीही कारण नाही, बाळा! मनुष्यजात फक्त परिणामांकडे बघते. निसर्ग फक्त तुमच्या इराद्यांकडे बघतो. कुत्रा त्याची शेपटी आनंदानं हलवितो. त्याची शेपूट डौलानं हलतेय की विचित्र दिसतेय याची त्याला फिकीर नसते. तो जीव ओतून ते करतो. त्याचं ते शेपूट हलवणं अजागळ दिसत असेल, पण तुम्हाला त्याचं काही वाटत नाही. का? कारण कुत्र्याच्या हृदयातलं प्रेम तुम्हाला जाणवतं. तो त्याच्यापरीनं तुमची उत्कृष्ट सेवा करत असतो. तद्वतच निसर्ग आणि ईश्वर तुमच्या सफाईदारपणाकडे किंवा परिणामांकडे पाहात नाही. त्याला फक्त जाणून घ्यायचं असतं की, तुमचा इरादा नेक आहे, तुमचं मन शुद्ध आहे आणि तुम्ही जे करताहात ते अगदी मनापासून करताहात. याखेरीज बाकी सारी निव्वळ आकडेमोड ठरते.''

त्यांच्या या संवादाचा रुद्रला, अजूनही प्रचंड विस्मय वाटत होतं. जरी त्या वृद्धानं एकही शब्द मोठ्यानं उच्चारला नव्हता, तरी रुद्रला त्याचं म्हणणं पूर्णपणे कळलं होतं.

रुद्रला आठवलं की, त्याची आजी नेहमी सांगत असे की, 'देवाच्या दरबारी, तुम्ही हे का केलंत – तुम्ही काय केलंत' हे 'तुम्ही केलेल्यातून

निष्पन्न काय झालं' याहून जास्त महत्त्वाचं असतं. ती म्हणत असे की, प्रार्थनेपेक्षा किंवा त्यातल्या सफाईदार शब्दांपेक्षा, देवदूत प्रार्थनेतील निर्मळ भावाकडे जास्त लक्ष देतात. हुशारीनं केलेलं काम, बिनडोकपणे केलेल्या प्रचंड कष्टांच्या कामापेक्षा उजवं असलं, तरीही ते काम करण्यामागचा हेतू हा हुशारी, प्रयत्न आणि परिणामांपेक्षा अनेक पटींनी महत्त्वाचा असतो.

'यश' हा मोठा गुंतागुंतीचा शब्द आहे. एकाला जे यश वाटेल ते दुसऱ्याला अपयश वाटू शकेल. या जगाकडेच पाहा. अनेकांना ते मोठं यशाचं गमक वाटत असतं, पण अनेकांना तो फसलेला डावही वाटत असतो.

*माणूस फक्त परिणामांकडे पाहातो. निसर्गाला फक्त तुमच्या हेतूंशी मतलब असतो.*

रुद्रनं, त्याची व्हॅन एका परोपकारी वडाच्या झाडाखाली उभी केली. ते झाड त्यांना छान सावली पुरवत होतं. झाडाचा सुगंध, झाडाच्या वेगवेगळ्या फांद्यांवर बसलेल्या  शेकडो पक्ष्यांचं मंजुळ संगीत यामुळे ती जागा होती, त्याहूनही अधिक रमणीय वाटत होती. खरंतर ते अगदी निर्मनुष्य जागी होते, आजूबाजूला ओसाड जमीन पसरलेली होती. केवळ नशिबानं एकमेकांशी टक्कर न घेता, आजूबाजूनं वाहनं धावत होती. भारतातील राष्ट्रीय महामार्गांवर प्रवास करणं, हे घाबरटांचं कामच नाही. प्रत्येक वाहन एकमेव हेतूनं धावत असतं – पदार्थविज्ञानशास्त्र, गती आणि गुरुत्वाकर्षणाचे सारे नियम मोडून मुक्कामाला पोहोचणं! वेगानं जाऊन मुक्काम गाठायच्या धडपडीत गती, वजन किंवा वैतागवाण्या लटपटी वापरल्या जातात. तुम्ही जर खरोखर अभागी असाल, तर यावरच्या साऱ्या क्लृप्त्या वापरणारं एखादं वाहन, तुम्हाकडे भीतिदायक वेगानं येऊ लागतं.

''ते आयुष्याचा प्रवासही अशाच पद्धतीनं करतात, खूपच घाईघाईत! तुम्ही त्यांना कारण विचारलंत, तर त्यांच्यापाशी उत्तर नसतं. कदाचित ते तास-दोन तास लवकर पोहोचत असतील, पण बरेचदा या वाचवलेल्या वेळेचा काऽही उपयोग नसतो. ते एवीतेवी मुक्कामाला पोहोचणारच असतात, मग त्यासाठी एवढी घाई कशाला? साऱ्या प्रवासभर ड्रायव्हर तणावग्रस्त असतो, धोका पत्करत असतो. येणाऱ्या वाहनांना टाळतो, तेही एक आश्चर्यच! इतर ड्रायव्हर्सना शिव्या घालत असतो आणि गाडीतल्या

सर्वांना काळजीत पाडतो. कुणालाच हा प्रवास सुखद वाटत नाही. शहाणे लोक झोप काढतात. सुज्ञ लोक देवावर भरवसा टाकून बसतात. काळजीखोर लोक इतरांना वैताग आणतात आणि ड्रायव्हर इतरांच्या पुढे जायला गाडी हाणत असतो. त्याला त्याचा बॉस, शेजारी किंवा पुढल्या ड्रायव्हरपेक्षा कमी वेळात मुक्कामाला पोहोचायची घाई असते. ते ही गोष्ट विसरतात की, आयुष्य ही शंभर मीटरची शर्यत नव्हे, तर एक लांबलचक पल्ल्याची मॅरेथॉन आहे. ''बरं मला भूक लागलीय. तुझ्या त्या काळ्या हॅवरसॅकमध्ये व्हिस्की आणि जिनखेरीज काही दुसरं आहे का?''

रुद्र, संकोचून हसला. ती हॅवरसॅक बंद होती, ती उघडल्याशिवायच त्या वृद्धाला त्यात काय आहे ते कळलं होतं. त्यानं डोक्याला ताण देऊन आठवायचा प्रयत्न केला. त्याच्याजवळ खाण्याजोगं काही होतं?

''हो!''

त्या वृद्धाचे डोळे चमकले आणि त्यानं रुद्र देत असलेली पुडी आनंदानं स्वीकारली. त्या वृद्धानं एक छोटी प्रार्थना केली आणि रुद्रला त्याच्याबरोबर खायचा आग्रह केला.

आणि मग हा ऋषी, जो रुद्रचं भविष्य जाणत होता, ज्याला बंद हॅवरसॅकमधल्या गोष्टी कळल्या होत्या... जो आयुष्याचं आणि स्वर्गाचं तत्त्वज्ञान सांगत होता, तो पुढली काही मिनिटं, एखाद्या लहानग्याप्रमाणे किटकॅट चॉकलेट-बार चवीनं, चाखत-माखत खात बसला. रुद्र, बघत राहिला.

सूर्य मावळायला लागला होता. पण या दोघांना पुढं जाण्याची काही घाई वाटत नव्हती. रुद्रनं, त्या वृद्धाला 'बाबा' म्हणून हाक मारायची असं ठरलं होतं.

'बाबा' या शब्दाचे अनेक अर्थ होतात. शब्दश: 'बाबा' म्हणजे 'पिता.' ह्या शब्दाचा अर्थ 'वृद्ध गृहस्थ' असाही होतो. पण तो आदरार्थी असतो. इंग्रजी भाषेत मात्र हे संबोधन निंदा किंवा अवमान वाटतो. भारतीय संस्कृतीमध्ये 'बाबा' म्हणजे, 'तुम्ही आयुष्यात घेतलेले अनुभव आणि तुमचं वय याबद्दल मला वाटणारा आदर होय.'

आश्चर्याची गोष्ट म्हणजे याच शब्दाचा वापर लहान मुलाला हाक

मारायलादेखील करतात. उदाहरणार्थ तुम्ही लहान मुलाला म्हणता, 'बाबा, हे औषध अगदी घाण चवीचं आहे हे मला माहीत आहे, पण ते पिऊन टाक रे!' किंवा तुम्ही हा शब्द अगदी वैफल्यानं पण उच्चारू शकता. उदाहरणार्थ, 'बरं बाबा, ज्याच्या जन्मत:च त्याच्या आईनं किंवा फॅमिली डॉक्टरनं गळा दाबून टाकायला हवा होता, अशा माणसाशी तुला लग्न करायचं तर कर, पण नंतर म्हणू नकोस की, मी ई-मेल पाठवून तुला सावध केलं नव्हंत!'

पण त्या शब्दाचा सर्वांत चांगला उपयोग होतो, जेव्हा तो आध्यात्मिक गोष्टींसाठी वापरला जातो तेव्हा! बाबाचा अर्थ होतो 'दैवत', 'गुरू', 'आपल्या भवितव्याचा सूत्रधार'. म्हणून भारतात 'गुरूंना' या शब्दानं संबोधतात. त्याचा अर्थ होतो पिता, गुरू म्हणजे सर्व काही. म्हणून शिर्डीचे साईबाबा, मेहेरबाबा, बाबा नानक, कामू बाबा, मखदुम बाबा, बाबा नित्यानंद, बाबा मुक्तानंद आणि अनेक अतुलनीय गुरूंच्या नावांना 'बाबा' ही उपाधी जोडली जाते. ओठांवर 'बाबा' शब्द असताना, तुम्ही मरण पावलात तर तुम्ही मोठे भाग्यवान ठरता.

म्हणून 'बाबा' नाव ठरलं.

❖

**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**





**एक अनादि अनंत प्रेमकहाणी**

**ऑड्रे निफनेजर**

अनुवाद

**रेश्मा स. कुलकर्णी**

किंमत ४९०/-रु. पोस्टेज ५०/-रु.

काळाशी सामना करणारा हेन्री आणि त्याच्याशी जुळवून घेणारी क्लेअर यांची ही अपारंपरिक प्रेमकथा. नियतीशी टक्कर देताना प्रेमच त्यांना कसं तारून नेतं, त्याची ही विलोभनीय, मनाचा ठाव घेणारी कादंबरी.

## पुस्तक परिचय



# इंदिरा

इंदिरा नेहरू-गांधी यांचे जीवनचरित्र



कॅथरीन फ्रँक यांचा जन्म आणि शिक्षण युनायटेड स्टेट्समध्ये झालं.

त्यांनी आत्तापर्यंत तीन बहुचर्चित आत्मचरित्रांचे लेखन केले आहे.


ही चरित्रे ल्यूसी ऊर्फ गॉर्डन, एमिली ब्रॉन्टे आणि मेरी किंग्स्ले यांची आहेत. पश्चिम आफ्रिका, मध्यपूर्व आणि ब्रिटनमधील विद्यापीठांमध्ये त्यांनी अध्यापनाचे काम केले आहे.

'इंदिरा' या चरित्रग्रंथाचे सहा वर्षे सतत लेखन तसेच त्यासंबंधी संशोधन करत असताना त्यांनी बराच काळ भारतात व्यतीत केला. सध्या त्यांचे वास्तव्य इंग्लंड येथे आहे.

## कॅथरीन फ्रँक

अनुवाद

**लीना सोहोनी**




*३१ ऑक्टोबर, १९८४....सकाळची वेळ.*

*त्या आपल्या बगिच्यातून चालत निघाल्या होत्या. चेहऱ्यावर स्मितहास्य.*

*दोन्ही हात जोडून नमस्कार करत.*

*इंदिरा नेहरू गांधी यांची त्यांच्याच अंगरक्षकांनी हत्या केली. त्यांनी आपलं जीवन जसं व्यतीत केलं, अगदी तसाच मृत्यू त्यांना प्राप्त झाला. माणसांच्या गर्दीत असूनही शेवटी एकाकीच!*

*एका महानाट्याचा, एका आयुष्याचा हा असा महाभयंकर शेवट झाला. ज्या युगात भारतीय राष्ट्रवादाने जन्म घेतला त्याच युगात इंदिराजींचा जन्म झाला. त्यांचे पिता जवाहरलाल नेहरू यांनी त्यांना 'क्रांतीचे अपत्य' म्हणून संबोधले. -शरीर मनाने कणखर अशा इंदिराजींनी स्वातंत्र्योत्तर भारतातील राजकारणात अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावायची आहे, हे मुळी विधिलिखितच होतं. ही भूमिका अंगिकारताना सुरुवातीला त्या काहीशा कचरल्याही होत्या. एकेकाळी शरीरप्रकृतीने नाजूक व स्वभावाने लाजाळू व अंतर्मुख असलेल्या इंदिराजींनी एकदा राजकारणातील ही आपल्यावर पडलेली जबाबदारी स्वीकारली व त्यानंतर मात्र त्यांनी मागे वळून पाहिलं नाही. जगातील सर्वात सामर्थ्यशाली व महत्त्वपूर्ण नेत्यांमध्ये त्यांची गणना होऊ लागली. जगातील सर्वात मोठ्या लोकशाही राष्ट्राच्या त्या पंतप्रधान बनल्या, परंतु येथील समाजात धर्माधर्मांमध्ये दुफळी माजलेली होती. या अवाढव्य देशातील समाजाची मानसिकता समजण्यास अत्यंत क्लिष्ट होती. येथे पुरुषांचे वर्चस्व होते.जगातील सर्वात मोठ्या लोकशाही राष्ट्राचे नेतृत्व ज्या स्त्रीने समर्थपणे सांभाळले, विसाव्या शतकाच्या इतिहासात ज्या स्त्रीने आपली नाममुद्रा उमटवली व ज्या स्त्रीला 'वूमन ऑफ द मिलेनियम' म्हणून गौरवण्यात आले अशा एका स्त्रीच्या जीवनाचा मागोवा कॅथरीन फ्रँक यांनी येथे घेतला आहे.*

('इंदिरा' पुस्तकातून...)

## फॉल्ट लाईन्स

१९८० सालानंतर भारताची परिस्थिती बिकट झाली होती. विनाशाच्या दिशेने वाटचाल सुरू होती. आसाममध्ये, पंजाब आणि काश्मीरमध्ये राजकीय अस्वस्थता होती. संपूर्ण देशात जातीय तणाव निर्माण झाले होते : सवर्ण विरुद्ध हरिजन, हिंदू विरुद्ध मुस्लीम, शीख विरुद्ध हिंदू, हिंदू व मुस्लीम विरुद्ध ख्रिश्चन्स आणि आदिवासींविरुद्ध तर सर्वच. ज्या एकसंध, अखंड राष्ट्राचा इंदिराजींचे वडील पंडित नेहरू यांनी तुरुंगात लिहिलेल्या आपल्या 'द डिस्कव्हरी ऑफ इंडिया' या ग्रंथात जयजयकार केला, त्या भारत देशाची एकसंधता भंग पावण्याच्या मार्गावर होती. अर्थात नेहरूंच्या स्वप्नातील हा अखंड भारत ही काही अंशी जरा अवास्तव अशीच कल्पना होती, ही गोष्ट भारत-पाकिस्तान फाळणीच्या वेळी सिद्ध झाली. पण ही कल्पना तीस वर्षे तरी तशीच चालली होती. १९७९ साली मात्र जनता सरकार कोसळले व इंदिराजींनी राजकारणात पुनरागमन करण्यासाठी पाऊल उचलले, त्या वेळेपर्यंत ही कल्पनाही भंग पावत चालली होती.

भारताच्या अखंडत्वाला ज्या भेगा पडत चालल्या होत्या, त्यांची सुरुवात इंदिराजींनी १९६६ ते १९७७ या काळात पंतप्रधानपद सांभाळले तेव्हा झाली. इंदिरा गांधींनी सत्तेचे जे केंद्रीकरण केले होती. त्यामुळे राज्यसरकारे दुर्बल झाली होती. स्थानिक सत्ता दुर्बल झाली. परिणामी प्रांतीय, जातीय ताणतणाव वाढीस लागले. दिल्लीहून सर्वत्र नियंत्रण ठेवण्याचा इंदिराजी जेवढा प्रयत्न करत होत्या, तेवढी फूट वाढत होती. १९८० सालाच्या सुमारास तर देशातील सर्वत्र संतप्त झालेल्या प्रांतीय आणि धार्मिक अल्पसंख्यांक गटांमध्ये सत्तेसाठी व स्वत:चे वर्चस्व स्थापन करण्यासाठी झगडे चालू होते. भारतात ही अशा तऱ्हेची परिस्थिती निर्माण होण्यास इंदिराजीच कारणीभूत झाल्या होत्या, असे असूनसुद्धा, त्या देशाच्या रक्षणकर्त्या आहेत अशीच लोकांची समजूत झाली होती. १९७९ साली इंदिराजींनी जेव्हा देशाचा झंजावाती दौरा केला, तेव्हा इंदिराजींची स्वत:ची आणि त्याचबरोबर जनतेची सुद्धा अशीच समजूत झाली होती की, भारताचे अखंडत्व कायम ठेवण्याचे काम केवळ इंदिराजीच करू शकतील.

१९८० सालच्या जानेवारी महिन्यात झालेल्या सार्वत्रिक

निवडणुकांसाठी इंदिराजींनी देशाचा झंजावाती दौरा केला. एकंदर ६२ दिवसांत त्यांनी ४०,००० मैल प्रवास केला. रोजी दोन प्रचार सभांमध्ये त्या भाषण करत. भारतातील एकूण ९० दशलक्ष लोकांनी इंदिराजींना पाहिलं, त्यांचं भाषण ऐकलं. इंदिराजींचा हा सर्वांत कष्टप्रद, सर्वांत मोठा आणि अखेरचा प्रचारदौरा होता.

या वेळी उत्तर प्रदेशातील आपल्या जुन्या रायबरेली मतदारसंघाबरोबरच आंध्र प्रदेशातील मेढक येथूनही इंदिराजींनी उमेदवारीचा अर्ज भरला. दोन्ही मतदारसंघांमधून त्या प्रचंड बहुमताने निवडून आल्या. संपूर्ण देशातून काँग्रेसला प्रचंड मतांनी विजय प्राप्त झाला. लोकसभेच्या ५४८ जागांपैकी ३५१ जागा काँग्रेसने जिंकल्या. 'टाइम्स ऑफ इंडिया' ने ठळक मथळ्यात बातमी छापली. ''इंदिरा सर्वत्र विजयी'' आता इंदिराजींनी जराशा नाराजीनेच रायबरेली मतदारसंघातून राजीनामा द्यायचे ठरवले. संजयलाही विजय प्राप्त झाला होता. तो अमेठी मतदारसंघातून लोकसभेचा खासदार झाला होता. उत्तरप्रदेशवर लक्ष ठेवण्याचं काम इंदिराजींनी त्याच्यावर सोपवलं. इंदिराजींनी आपल्या परिवारातील अरुण नेहरू नामक एका यशस्वी उद्योजकाकडे रायबरेलीची जागा सोपवली. पुढे कालांतराने अरुण नेहरू राजीव गांधीचा उजवा हात व मुख्य सल्लागार बनला.

१४ जानेवारी १९८० रोजी इंदिराजींनी परत एकदा चौथ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली व त्यानंतर लगेच १ सफदरजंग रोडवरील आपल्या जुन्या घरी त्या राहायला गेल्या. त्यांनी तत्पूर्वी डझनभर हिंदू पुरोहितांना बोलावून आपले घर शुद्ध करून घेतले, देसाईंनी बांधून घेतलेले परंपरागत भारतीय पद्धतीचे न्हाणीघर पाडून तेथे पूर्वीसारखे पाश्चात्त्य धर्तीचे टॉयलेट बसवून घेतले. इंदिराजी व त्यांचे कुटुंबीय राहायला आले तेव्हा सर्व काही अगदी पूर्वीसारखेच होते.

निवडणुकीच्या निकालानंतर एका स्कॅंडिनेव्हियन पत्रकाराने इंदिराजींना विचारले : ''परत एकदा भारताचं नेतृत्व हाती आल्यावर आता कसं वाटतंय?'' त्यावर इंदिराजी रागाने म्हणाल्या : ''भारताचे नेतृत्व मी नेहमीच करत आले आहे.'' जणू काही भूतकाळातील काही घटनांचा संपूर्ण देशाला सुद्धा विसर पडला होता. आणीबाणीच्या काळात घडलेल्या घटना आणि १९७७ नंतर इंदिराजींना पराभव पत्करावा लागल्यानंतरचा कालखंड जणू काही भारताच्या इतिहासातून पुसला गेला होता. इंदिराजी व संजय यांच्या

हातून आणीबाणीच्या काळात घडलेल्या गुन्ह्यांचा न्यायनिवाडा करण्यासाठी मोरारजीभाई देसाई यांनी ज्या खास न्यायालयांची नियुक्ती केली होती, ती आता घटनाबाह्य म्हणून विसर्जित करण्यात आली. संजयविरुद्ध जे काही खटले चालू होते ते सर्व काढून घेण्यात आले. आणीबाणीवर भाष्य करणाऱ्या 'किस्सा कुर्सीका' या फिल्मची रिळे नष्ट केल्याबद्दल संजय व व्ही.सी. शुक्ला यांच्यावर जो खटला भरण्यात आला होता तो सुद्धा काढून टाकण्यात आला. इंदिराजींना राज्याराज्यांमधील आपली प्रतिमा उज्ज्वल करायची होती. त्यामुळे त्यांनी एकंदर नऊ राज्यांमधील जनता सरकारे विसर्जित केली व तेथे राष्ट्रपती राजवट लागू केली व त्या राज्यांमध्ये विधानसभेच्या निवडणुका जाहीर केल्या. त्यांतील केवळ एक राज्य वगळता सर्वत्र काँग्रेसला विजय प्राप्त झाला.

एकदा लोकसभेत खासदार म्हणून निवडून आल्यानंतर संजयला राजकारणात राजरोसपणे मान्यता मिळाली. त्याला आता स्वतंत्र अस्तित्व व अधिकार प्राप्त झाले त्याच्याबरोबर १९८० साली पहिल्यांदाच निवडून आलेले त्याचे अनेक साथीदार होतेच. एकंदर ३५१ निर्वाचित काँग्रेस सदस्यांपैकी २३४ प्रथमच निवडून आलेले असून त्यांच्यातील किमान १५० संजयचे निस्सीम अनुयायी होते. इंदर मल्होत्रा या पत्रकाराने त्यांचे वर्णन करताना म्हटले होते, ''पूर्णपणे नव्याच प्रकारचे काँग्रेसजन, तरुण ... संसदीय कामकाजाची काहीही जाण नसलेले ... आदर्शवादामुळे जराही भारून न जाणारे ... ज्यांना डोके कमी आणि शारीरिक बळच जास्त असे ... संसदेचे सदस्यत्व प्राप्त झाल्यामुळे ही मंडळी संजयच्या आणि केंद्रातील सत्तेच्या जवळ जाऊन पोचली होती. त्या संधीचा उपयोग त्यांनी अल्पावधीतच जास्तीत जास्त धनसंपत्ती गोळा करण्यासाठी करून घेतला.''

प्रत्येकाला वाटले, आता इंदिराजी संजयला आपल्या कॅबिनेट मंत्रिमंडळातील मंत्री बनवतील. पण त्यांनी अत्यंत धोरणीपणा दाखवून तसे करणे टाळले. संजयला अशा प्रकारे आपण जर मंत्री बनवले, तर त्याची पात्रता नसताना त्याला आपण हे पद दिले असे सर्वजण म्हणतील. त्याला उत्तर प्रदेशचा मुख्यमंत्री करण्याच्या दृष्टीनेही प्रयत्न चालू होते. पण संजयला मात्र दिल्लीतच राहायचे होते, कारण खरी कृती तर तिथेच घडत होती. अखेर त्याची ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचा जनरल सेक्रेटरी म्हणून नेमणूक करण्यास इंदिराजींनी सहमती दिली.

१६ फेब्रुवारीचा दिवस. भारतात गेल्या चौऱ्याऐंशी वर्षांत पहिल्यांदाच सूर्यग्रहण दिसणार होते. इंदिराजींना सत्तेवर येऊन साधारण एक महिना झाला होता. इंदिराजींनी आपली मैत्रीण पुपुल जयकर हिला आपल्यासमवेत हे ग्रहण पाहण्यासाठी १ सफदरजंग रोड या आपल्या निवासस्थानी बोलावले. राजीव व त्यांची मुले दुपारभर दुर्बीण वगैरे सुसज्ज करून बाहेरील बगीच्यात मुक्काम ठोकून होती. प्रत्येकाने काळे चष्मे चढवले होते. संजयला मात्र ग्रहण वगैरे गोष्टींची चिंता करायला फुरसत नव्हती. संजयची पत्नी मेनका ८ महिन्यांची गर्भवती होती. तिने ग्रहण पाहू नये, कारण तिच्या बाळाला धोका पोचेल म्हणून इंदिराजींनी तिला खोलीतच थांबण्याची सूचना दिली. ते पाहून पुपुल जयकर यांना जरा आश्चर्यच वाटले.

ग्रहणाला कधी सुरुवात होते याची वाट पाहत असताना इंदिराजी आणि पुपुल जयकर यांनी 'फार फ्रॉम द मॅडिंग क्राऊड' या थॉमस हार्डीच्या कादंबरीवर आधारित व्हीडिओ फिल्म पाहण्यास सुरुवात केली. आभाळ झाकोळले, हवा थंड झाली. पक्षी शांत झाले. निळा प्रकाश आकाशात उमटला व सर्व सावल्या पुसून गेल्या. अचानक जयकर यांना एकटं सोडून इंदिराजी आपल्या खोलीत निघून गेल्या त्या ग्रहण संपेपर्यंत तिथेच थांबल्या, एकट्याच. सूर्याला ग्रहण लागलेले पाहून त्या फारच अस्वस्थ झाल्या होत्या. पण त्यांना आपली भीती प्रकट होऊ द्यायची नव्हती. आपली मैत्रीण इतकी अंध:श्रद्ध कशी झाली, परंपरावादी कशी झाली, असे जयकर यांना वाटले. पूर्वीची ती खंबीर, कणखर इंदिरा कुठे गेली? असे त्यांच्या मनात आले.

धीरेंद्र ब्रह्मचारी यांचा सर्वत्र संचार असे. त्या गोष्टीमुळे जयकर अस्वस्थ होत असत. इंदिराजींच्या घरी गेली वीस वर्षे या स्वामींचं येणं-जाणं होतं. त्यांचे योगशिक्षक म्हणून या देखण्या, प्रभावी व्यक्तिमत्त्वाच्या स्वामींना इंदिराजींच्या आयुष्यात फार मोठं स्थान होतं. आणीबाणीच्या काळात इंदिराजींना इतरांविषयी वाटणारी भीती आणि अविश्वास जसा वाढीस लागला तसं या स्वामीजींचं प्रस्थ जास्तच वाढून बसलं. इंदिराजींना व संजयला अपाय करू इच्छिणाऱ्या त्यांच्या हितशत्रूंच्या कथा स्वामीजी इंदिराजींना रोज सांगून त्यांच्या भीतीत अधिकच भर टाकत. इंदिराजींशी स्वामीजींचं वागणं दुटप्पी होतं. एकीकडे ते ह्या आपल्या कटकारस्थानांच्या गोष्टी सांगून घाबरवून सोडत... (यात तुमच्यावर कोणीतरी करणी केली आहे... वगैरे अतिमानवी

गोष्टींचाही समावेश असे!) त्यानंतर त्या गोष्टीवर उतारा म्हणून दुसऱ्या तसल्याच काहीतरी मंत्रतंत्रादी गोष्टी करण्यास इंदिराजींना राजी करत. ज्या लोकांनी इंदिराजींवर करणी केली आहे त्या लोकांपासून व त्यांच्या त्या दुष्ट शक्तींपासून इंदिराजींना वाचवण्याचा हा नुसता बहाणा असे.

स्वामीजींच्या या मंत्रतंत्रांच्या सामर्थ्यावर तर इंदिराजींचा विश्वास होताच, पण त्या राजकीय बाबतीत सुद्धा त्यांचा सल्ला विचारत. मग स्वामीजींनी जो सल्ला दिला असेल तो देण्यामागे त्यांचा स्वत:चा स्वार्थ सुद्धा असू शकेल, हे त्या वेळी त्या लक्षात घेत नसत. शाह आयोगाने केलेल्या तपासात त्यांनी या धीरेंद्र ब्रह्मचारींविषयी सुद्धा बरीच माहिती गोळा केली होती. स्वार्थ साधण्यासाठी, स्वामीजींनी इंदिरा व संजय यांना काय काय सल्ले दिले होते, त्याविषयीचे सत्यही या चौकशीत समोर आले. ब्रह्मचारी यांनी दिल्ली येथे एक योगकेंद्र सुरू केले होते. त्याचे नाव 'विश्वायतन योग आश्रम.' जेव्हा नेहरू पंतप्रधान होते तेव्हा सरकारी पाठिंब्याने हे केंद्र सुरू करण्यात आले होते. इंदिराजींचे सल्लागार म्हणून जोपर्यंत पी. एन. हक्सर आणि इतर 'काश्मिरी माफिया' काम बघत होते, तोपर्यंत ब्रह्मचारींचा इंदिराजींवर म्हणावा तेवढा प्रभाव नव्हता. परंतु आता मात्र संजय जसा एकीकडे बलाढ्य होत चालला होता तसतसा स्वामीजींचा प्रभावही वाढत चालला होता. १९७३ साली ब्रह्मचारींनी अपर्णा ॲग्रो प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीची स्थापना केली. विमानांच्या खरेदी-विक्रीसाठी. विमानांचा हा छंद संजयप्रमाणेच स्वामी धीरेंद्र ब्रह्मचारी यांनाही होता. स्वामीजींच्या या कंपनीच्या डायरेक्टर बोर्डावर संजय होता. त्याच वर्षी स्वामींनी काश्मीरमधील मनतलाई येथे आणखी एका योग केंद्राची स्थापना केली. त्याचे नाव अपर्णा आश्रम.

१९७६ साली– आणीबाणीतील परिस्थिती कळसास पोचलेली असताना ब्रह्मचारींनी एम् - ५ चार सीटर विमानाची देणगी मिळवण्यासाठी सरकारची परवानगी मागितली. हे विमान त्यांना युनायटेड स्टेट्समधील मॉले एअरक्राफ्ट कंपनीने देणगी म्हणून दिले. ब्रह्मचारींनी यासाठी सरकारकडे जो अर्ज केला होता, त्यात आपल्याला हे विमान शेतात औषधांची फवारणी करण्यासाठी हवे असल्याचा दावा केला होता. परंतु हे विमान त्या कामासाठी वापरण्यास अयोग्य आहे असे लक्षात आल्यावर त्यांनी आपल्या अर्जात फेरबदल केला व त्यात असे म्हटले : 'ते अपर्णा आश्रमाचे कामकाज चालवण्यासाठी उपयुक्त होईल.' या विमानाला कस्टम ड्यूटीतून सूट देण्यात

१२वी आवृत्ती


# थैलीभर गोष्टी

## सुधा मूर्ती

अनुवाद

**लीना सोहोनी**

**किंमत : १७०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**




राजे राजवाडे, महाराण्या, राजपुत्र, राजकन्या, कंजूष माणसं, जवळ फुटकी कवडीही नसलेली दरिद्री माणसं, शहाणी माणसं, विद्वान माणसं, चतुर माणसं, मूर्ख आणि अडाणी माणसं, चमत्कारिक स्त्रिया व पुरुष, चित्रविचित्र घटना या सुरस कथांमधून जिवंत होऊन आपल्या भेटीला येतात.

एका कथेतील बुद्धिमान राजकन्येला आपल्यापेक्षा हुशार पती हवा असतो, म्हणून ती सर्व विवाहोत्सुक तरुणांना प्रत्येकी नऊ प्रश्न विचारण्याची संधी देते, पण अखेर तिलाही निरुत्तर करणारा कोणीतरी भेटतोच... एक अनाथ मुलगा आपल्या दुष्ट काकांना चांगली अद्दल घडवतो... आणि संकटात सापडलेल्या एका वृद्ध जोडप्याला उपयोगी पडतो तो एक ढोल!

यातील काही कथा लेखिका सुधा मूर्ती यांनी आपल्या बालपणी आजी-आजोबांकडून ऐकल्या... तर काही कथा देशोदेशी केलेल्या भ्रमंतीच्या दरम्यान त्यांना ऐकायला मिळाल्या... काही कथा त्यांच्या स्वत:च्या कल्पनाशक्तीतून कागदावर उतरल्या...

या सर्वच्या सर्व सुरस, कालातीत अशा लोककथा गेली कित्येक वर्षं लेखिकेच्या मनात घर करून राहिलेल्या आहेत. वेळोवेळी आपल्या सहवासात आलेल्या लहान मुलामुलींना, आपल्या विद्यार्थ्यांना त्यांनी त्या सांगितल्या आहेत.

आज या कथासंग्रहाच्या रूपाने या सर्व कथा लहान मुलांपासून मोठ्या माणसांपर्यंत सर्वच वाचकांना वाचनासाठी उपलब्ध होत आहेत.

आली तसेच इंपोर्टच्या परमिटकरता त्याची किंमत बरीच जास्त दाखवण्यात आली. त्याची किंमत वाढवून ६७, ३५६ डॉलर्स एवढी दाखवण्यात आली.. धीरेंद्र ब्रह्मचारी जरी हे विमान आपल्याला देणगी म्हणून मिळाल्याचा दावा करत असले तरी प्रत्यक्षात १९७६ साली ते जेव्हा अमेरिकेला गेले होते तेव्हा त्यांनी ४०,५८५ डॉलर्स रोख भरून ते खरेदी केले होते. ते भारतात परतल्यानंतर ताबडतोब त्यांना काश्मीरमधील मनतलाई येथे स्वत:ची खाजगी धावपट्टी बनवण्याची परवानगी मिळाली. वास्तविक या धावपट्टीची जागा पाकिस्तानच्या सरहद्दीपासून इतकी जवळ होती की ह्या धावपट्टीला परवानगी देताना संरक्षणविषयक कायदेकानू धाब्यावर बसवण्यात आले होते.

शाह आयोगाची सुनावणी चालू असताना ही गोष्ट उजेडात आली. धीरेंद्र ब्रह्मचारी यांच्या काश्मीर येथील धर्मादाय आश्रमाचे खरे स्वरूपही त्याच वेळी उघडकीला आले. १९७७ साली इंदिराजींचा पराभव झाल्यानंतर कर तपासनिसांनी या आश्रमाला भेट दिली व त्यांना काही गोष्टी आढळून आल्या. या अपर्णा आश्रमाची इमारत प्रासादतुल्य होती.... अप्रतिम सुंदर होती. ...उत्तम संगमरवराच्या फरशांनी सुभोभित केलेली होती. न्हाणीघरांमध्ये चकाकणाऱ्या, रंगीबेरंगी झगमगत्या टाईल्स बसवल्या होत्या, चार न्हाणीघरांत बाथटब्ज होते... एकंदर दहा टेलिफोन्स होते, एक वॉशिंग मशीन, एक कुकिंग रेंज, व्हीडिओ कॅमेरा, कॅसेट्स, टेपरेकॉर्डर, टेलेस्कोप, इलेक्ट्रिक केट्ल, हेअर ड्रायर आणि व्हायब्रेटर अशा विविध अत्याधुनिक गोष्टींची तेथे लयलूट होती. थोडक्यात काय.... उंची, आधुनिक राहणीमानास आवश्यक त्या सर्व सुखसोयी तेथे होत्या. योगशिक्षण देण्यासाठी या सर्व विलासाची नक्की काय आवश्यकता होती ही गोष्ट खरोखर समजण्याच्या पलीकडची आहे. करवसुली अधिकाऱ्यांनी जेव्हा या अपर्णा आश्रमाचे हिशेब तपासले तेव्हा त्यांना या ठिकाणी कधीही योगवर्ग चालू असल्याचे किंवा कोणी योगसाधना करत असल्याचे आढळले नाही. खरं तर हा आश्रम धनिक लोकांना ऐषारामात सुटी घालवता यावी म्हणून सुसज्ज करण्यात आला होता, हे उघडच होते.

शाह आयोगाने ज्या काही गोष्टी उघडकीस आणल्या त्यानंतर खरं तर स्वामीजींचा कारभार संपुष्टात यायला हवा होता. पण १९८० साली इंदिराजी व संजय परत सत्तेवर आले व त्याचबरोबर हे 'फ्लाईंग स्वामी' सुद्धा परतले. विमान प्रकरणापासून त्यांना हे नाव पडले होते. स्वामी आता पंतप्रधानांच्या

रोजच्या आयुष्यातील एक अविभाज्य घटक बनले होते. दिवसाच्या कोणत्याही प्रहरी त्यांना पंतप्रधानांच्या घरी ये-जा करण्यास मुभा होती. ह्यांचे स्थान गांधी परिवारातील सदस्याप्रमाणेच होते. फक्त त्यांना विशेष शिष्टाचार नव्हते व ते खूप खादाड होते. स्वामीजी इंदिराजींच्या समवेत इतका वेळ असत व त्यांना इंदिराजींची कधीही गाठ घेण्याची मुभा होती त्यामुळे त्यांचे व इंदिराजींचे काही प्रकरण असल्याच्याही अफवा होत्या. स्वामींच्या वयाची साठी उलटून गेली असली तरी त्यांचे व्यक्तिमत्त्व अजूनही देखणे आणि आकर्षक होते. काळेभोर केस, दाढी, सहा फूट उंची, सडपातळ बांधा असलेले स्वामीजी पांढरी शुभ्र मलमलची वस्त्रे परिधान करत. परंतु १९८० मध्ये तर ब्रह्मचारी यांना इंदिराजींच्या आयुष्यात इतकं मोठं स्थान होतं, त्यांचा इंदिराजींवर इतका जबरदस्त प्रभाव होता, त्यांच्या कारवाया इतक्या धोकेबाजपणे आणि कावेबाजपणे चालत की, ते इंदिराजींचे प्रियकर असणे असंभव वाटते.

१३ मार्च रोजी, म्हणजे सूर्यग्रहणानंतर महिन्याभरातच मेनका गांधी हिने एका मुलाला जन्म दिला. आपल्या आजोबांच्या नावावरून त्याचे नाव फिरोजवरुण असे ठेवण्यात आले. त्या बाळाचे संगोपन करण्याची जबाबदारी बऱ्याच अंशी सोनियावर येऊन पडली. इंदिराजींना आपल्या ह्या नातवाचा फार लळा होता. त्या अनेकदा त्याला स्वत:जवळ झोपवत.

२३ जून १९८० रोजी, बाळ केवळ तीन महिन्यांचा असताना, संजयने आपले नवे 'पिट्स एस-टू ए' हे टू सीटर विमान घेऊन सकाळी लवकर दिल्ली शहरावरून फेरफटका मारायचे ठरवले.

पिट्स हे विमान संजयचं सर्वांत नवं खेळणं होतं. ब्रह्मचारींच्या मध्यस्थीने हे अमेरिकेतून विकत आणलं होतं. संजय सकाळी लवकर १ सफदरजंग रोडवरून निघाला व जवळच्या दिल्ली फ्लाईंग क्लबमध्ये गेला. क्लबमधे त्याने आपल्याला विमान शिकवणारा आपला मित्र व क्लबमधील इन्स्ट्रक्टर कॅप्टन सुभाष सक्सेना यालाही आपल्या बरोबर बोलावले. आपल्याबरोबर विमानात बसून त्याने यावे व विमान चालवताना काही कसरतीचे प्रयोग करावेत असे संजयचे म्हणणे होते. सुरुवातीला सक्सेना तयार नव्हता, कारण 'पिट्स-एस्.टू-ए' हे विमान चालवण्याच्या बाबतीत संजय अजून नवखा आहे हे त्याला माहीत होतं. पण संजयने बरेचदा त्याचे मन वळवल्यावर तो या गोष्टीला राजी झाला. थोड्याच वेळात संजय व सक्सेनाने हवेत उड्डाण केले व ते दिल्ली शहरावरून विहार करू लागले. त्यानंतर जी घटना घडली ती प्रत्यक्ष

डोळ्यांनी पाहणाऱ्या व्यक्तींनी असे सांगितले की, संजयने बहुदा हवेत कोलांटी मारण्याच्या दृष्टीने एक मोठा सूर मारला. परंतु त्याचा ताबा सुटला. विमान नाक खाली करून जमिनीवर कोसळले व त्या धक्क्याने संजय व सक्सेना जागच्या जागी ठार झाले.

सकाळी सव्वाआठच्या सुमाराला उत्तर प्रदेशचे नवे मुख्यमंत्री व्ही. पी. सिंग हे इंदिराजींच्या ऑफिसात १ अकबर रोड येथे त्यांना भेटण्यासाठी आले, तेव्हा दिल्लीत उष्मा जाणवू लागला होता. आठ वाजून वीस मिनिटांनी व्ही. पी. सिंग स्वागतकक्षात बसलेले असतानाच आर. के. धवन तेथे आले आणि घाईघाईने इंदिराजींच्या ऑफिसात शिरले. ''एक भयानक घटना घडली आहे'' असे आर. के. धवन यांच्या तोंडचे शब्द व्ही. पी. सिंग यांनी ऐकले. इंदिराजी आणि धवन हे अक्षरश: पळतच ऑफिसच्या बाहेर पडून मुख्य प्रवेशद्वारापाशी थांबलेल्या अँबेसेडर गाडीत बसले. सिंग हेही त्यांच्यापाठोपाठ स्वत:च्या गाडीतून निघाले. दोनच मिनिटांत गाड्या घटनास्थळी पोचल्या. एव्हाना तेथे पोलिसांची वर्दळ सुरू होती.

त्या ठिकाणी फायर ब्रिगेड, आर्मी आणि ॲम्ब्युलन्स होती. वैद्यकीय पथकाने संजयचे शरीर बाहेर काढून आर्मीच्या ट्रकमध्ये ठेवले होते. व्ही. पी. सिंग यांच्या डोळ्यादेखत इंदिराजी ट्रकमध्ये चढल्या. लाल ब्लँकेटमध्ये संजयचा मृतदेह झाकलेला होता. त्यांनी आपल्या हाताने त्याच्या चेहऱ्यावरील आच्छादन दूर केले. त्यांना चक्कर आली... पण ती क्षणभरच... त्यांनी लगेच स्वत:ला सावरले व कठडा घट्ट पकडला. त्यांनी परत एकदा संजयकडे पाहिले व स्वत:च्या हाताच्या तळव्यांनी स्वत:चा चेहरा झाकून घेतला. त्यानंतर बऱ्याच वेळाने त्या ट्रकबाहेर पडल्या. त्यांच्याभोवती आर्मीचे लोक होते.

संजय आणि सक्सेना यांचे निधन झाले आहे, ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी सत्य होती. परंतु तरीही त्यांचे मृतदेह राम मनोहर लोहिया हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. तेथे सर्जन कामाला लागले व जवळजवळ तीन तासांच्या प्रयत्नांनंतर त्यांनी संजयचा मृतदेह ठीकठाक केला. त्याच वेळी मेनका हॉस्पिटलमध्ये आली. ती दु:खाने अक्षरश: बेभान झाली होती. इंदिराजींनी तिला सावरले. 'संजयला ॲक्सिडेंट झाला आहे' व 'डॉक्टर्स प्रयत्न करत आहेत' असे सांगितले. सर्जन लोकांचे काम संपल्यावर इंदिराजी ऑपरेशन थिएटरमध्ये गेल्या. त्यांनी बाकी सर्वांना बाहेर जाण्यास सांगितले. बऱ्याच

वेळाने त्या जेव्हा बाहेर आल्या तेव्हा त्यांचा चेहरा विवर्ण होता, परंतु त्यांनी स्वत:वर संपूर्णपणे नियंत्रण मिळवले होते.

संजयचा मृतदेह १ सफदरजंग येथे नेऊन बर्फाच्या लादीवर ठेवण्यात आला. जवळजवळ दिवसभर लोक इंदिराजींच्या समाचाराला येत होते. परंतु त्यातूनही त्या काही वेळ बाहेर गेल्या. त्यांनी परत एकदा अपघातस्थळी जाण्याचा आग्रह धरला. नंतर यासंदर्भात अशी अफवा पसरली की संजयच्या किल्ल्या आणि त्याचे घड्याळ या दोन गोष्टी त्या तेथून परत घेऊन आल्या. लोकांच्या म्हणण्याप्रमाणे त्या किल्ल्यांपैकी एक किल्ली त्याच्या सेफ डिपॉझिट बॉक्सची नाहीतर सेफची होती व त्यात संजयने आपली संपत्ती दडवलेली होती. अशीही वदंता होती की, संजयच्या मनगटी घड्याळाच्या पाठीमागच्या बाजूस त्याच्या स्विस बँकेतील गुप्त खात्याचा नंबर कोरलेला होता.

इंदिराजींनी संजयच्या मृत्युस्थळाला भेट दिली हे जरी खरे असले तरी संजयचे गुन्हे शाबित करणारा पुरावा हस्तगत करण्यासाठी तेथे जाण्याइतक्या काही त्या भावनाशून्य नव्हत्या. त्या २३ जून रोजी केवळ एकदाच नव्हे, तर दोनदा त्या स्थळी गेल्या. अपघाताचे ते दृश्य परत एकदा डोळ्यात साठवण्यासाठी तसेच दुर्घटनाग्रस्त विमानाची नीट पाहणी करण्यासाठी. मानवाच्या अंत:करणात अनादि अनंत काळापासून ही भावना वास करत आली आहे. ज्यांच्यावर अशा प्रकारे अचानक, भयानक स्वरूपाचा आघात होऊन, दु:ख वाट्याला येते, त्यांच्या मनात ही शोध घेण्याची भावना जागृत होते. ज्या स्थळी आपला पुत्र अखेरीस जिवंत असताना गेला होता, त्या स्थळी त्या त्याला परत एकदा शोधण्यासाठी गेल्या होत्या. त्याच्या वस्तू शोधण्यासाठी नव्हे. त्या भयानक अपघाताचे दृश्य डोळ्यात साठवल्यानंतर आपल्या जीवनात किती भयानक प्रकार घडला आहे, या विदारक वास्तवाची जाणीव इंदिराजींना झाली.

ज्या दिवशी संजय गेला त्या दिवशी राजीव, सोनिया आणि मुले इटलीला होती. ते सर्वजण सुट्टी घालवण्यासाठी तेथे गेलेले होते. संजयच्या मृत्यूची बातमी कळताच सर्वजण तात्काळ भारतात परतले. २४ जून रोजी संजयवर अंत्यसंस्कार करण्यात आले. आपले वडील आणि पती यांच्याप्रमाणेच आपल्या मुलाच्या अंतिम संस्कारांचे नियोजन इंदिराजींनी स्वत:

अत्यंत शिस्तीने केले. राजीवचा या गोष्टीला विरोध असूनही सरकारी इतमामाने व सरकारी खर्चाने अत्यंत मोठ्या प्रमाणात हे अंत्यसंस्कार पार पडले. दिल्लीच्या रस्त्यावरून उघड्या ट्रकमधून संजयची अंत्ययात्रा निघाली. महात्मा गांधी, फिरोज गांधी आणि नेहरू यांच्या अंत्ययात्रासुद्धा अशाच पद्धतीने निघाल्या होत्या. संजयच्या मृतदेहाच्या एका बाजूला इंदिराजी बसल्या होत्या तर दुसऱ्या बाजूला मेनका. वरून सूर्य तळपत होता. इंदिराजींच्या डोळ्यावर काळा चष्मा होता, रडून सुजलेले डोळे झाकण्यासाठी!

संजयचा मृतदेह हॉस्पिटलमध्ये शिवून ठीकठाक करण्यात आला होता. ट्रकमध्ये त्याला फुलांनी आच्छादण्यात आले होते. फक्त चेहरा तेवढा दिसत होता. परंतु त्याचा चेहरासुद्धा या अपघातात पूर्णपणे निकामी झाला होता. एक डोळा व चेहऱ्याची एक बाजू व नाक पूर्णपणे खराब झाले होते. त्याच्या चेहऱ्याकडे बघवत नव्हते, इतका तो भयानक झाला होता. सर्जनने आपले सर्व कौशल्य पणाला लावून सुद्धा ते त्या मृतदेहाची, त्या चेहऱ्याची भयानकता कमी करू शकले नव्हते.

यमुना नदीच्या तीरी, शांतीवनात, नेहरूंच्या समाधीच्या जवळच संजयच्या मृतदेहावर अग्निसंस्कार करण्यात आले. सर्व सोपस्कारांवर धीरेंद्र ब्रह्मचारी यांनी जातीने देखरेख केली. इंदिराजी आणि मेनका अग्निकुंडासमोर जमिनीवर बसून होत्या. त्यांच्यामागे परिवाराचे सदस्य, आप्तेष्ट, मित्र, हितचिंतक, राजकीय नेते आणि हजारो शोकाकुल माणसांचा समुदाय जमला होता. भारतीय परंपरेनुसार अंतिम संस्कारांमध्ये खरं तर स्त्रिया भाग घेत नाहीत, पण तरीही राजीवने चंदनाच्या चितेला अग्नी देण्यापूर्वी इंदिराजींनी संजयला ज्या राष्ट्रध्वजात गुंडाळले होते, तो ध्वज काढला. तळपत्या उन्हात राजीवने चितेभोवती प्रदक्षिणा घातल्या व धीरेंद्र ब्रह्मचारी आणि इतर पुरोहितांच्या उपस्थितीत मंत्रघोषात हे अंत्यसंस्कार पार पडले.

संजयच्या मृत्यूची बातमी कळताच तातडीने सर्व देशभर शोकसभा भरवण्यात आल्या, मैदाने, बगीचे या ठिकाणी संजयचे पुतळे उभारण्यात आले. संजयच्या नावाने बगीच्यांमध्ये, रस्त्यांवर बसण्यासाठी बाक बांधण्यात आले. मृत्यूनंतर संजयला हौतात्म्य प्राप्त झाले. त्याच्या अंगी सर्व प्रकारचे गुण चिकटवण्यात आले. संपूर्ण राष्ट्र शोकमग्न झाले. हायड्रोइलेक्ट्रिक स्टेशन्स, ट्रेन आणि बसची टर्मिनल्स, ब्रिजेस, धरणे, रस्ते, शाळा, हॉस्पिटल्स या

सर्वांना संजयचे नाव देण्यात आले. संजयची पत्नी मेनका हिने प्राण्यांची देखभाल करण्यासाठी संजयच्या नावे अनेक संस्था स्थापन केल्या.

संजयवर अंतिम संस्कार झाल्याच्या दुसऱ्याच दिवशी बी. के. नेहरू यांनी आणीबाणीत संजयने जमा केलेल्या संपत्तीविषयी राजीवकडे विचारणा केली. ही संपत्ती नक्की किती आहे, कुठे ठेवली आहे इत्यादी. त्यावर राजीवने त्यांना सांगितले : दिल्लीच्या सेंट्रल काँग्रेस ऑफिसात फक्त वीस लाख रुपये सापडले. परंतु मृत्युसमयी संजयकडे करोडो रुपयांची बेहिशेबी संपत्ती असल्याचे राजीवने बी. के. नेहरू यांना विश्वासात घेऊन सांगितले. संजयच्या मृत्यूनंतर ही संपत्ती अदृश्य झाली नाही. ज्या लोकांना संजयने या संपत्तीची देखभाल करण्याची कामगिरी सोपवली होती, ते सर्वच्या सर्व श्रीमंत झाले. त्यांतील काही भारतात होते, तर काही परदेशात– लंडनमध्ये.

संजयच्या अपघाती मृत्यूनंतर धीरेंद्र ब्रह्मचारी यांचासुद्धा पुष्कळ उत्कर्ष झाला. कारण संजय व धीरेंद्र ब्रह्मचारी यांचे आर्थिक हितसंबंध परस्परांमध्ये गुंतलेले होते. संजयच्या मृत्यूनंतर स्वामींची स्थिती फारच बळकट झाली– त्यांचे शस्त्रास्त्रांचे व्यवहार सुरू झाले. त्यांना स्वत:चा टेलिव्हिजन शो करण्याची संधी मिळाली. जो जास्त पैसे देईल त्याला ते मुक्त हस्ताने लायसेन्स व परमिट्स देऊ लागले. आता तर त्यांचा इंदिराजींवरील प्रभाव अधिकच वाढला. संजयच्या मृत्यूच्या काही दिवस आधी स्वामीजींनी इंदिराजींना सांगितले होते : काही दुष्ट प्रवृत्तीचे लोक जारण-मारणादी तंत्रांचा वापर करत आहेत. ते तुमच्या कुटुंबांच्या वाईटावर टपले आहेत. हा धोका टाळण्यासाठी इंदिराजींनी काही विशिष्ट धार्मिक स्थळे व मंदिरे यांच्या भेटीसाठी जावे असेही स्वामींनी सुचवले होते. काही धार्मिक कृत्ये करण्यासही सांगितले होते. इंदिराजींना ते सर्वच्या सर्व करणे जमले नव्हते. म्हणजेच संजयचे विमान कोसळले तेव्हा सर्वच्या सर्व दुष्ट प्रवृत्तींना शांत केले गेले नव्हते. संजयचा मृत्यू खरं तर टाळता आला असता असे इंदिराजींनी पुप्पुल जयकर यांना सांगितले. हा सगळा स्वत:चाच दोष आहे, असे त्यांना सारखे वाटत होते. त्यांना वाटणारे भय आणि त्यांच्या मनातील अपराधी भावना यांना खतपाणी घालण्याचे काम धीरेंद्र ब्रह्मचारी यांनी चालू ठेवलेच होते.

इंदिराजी स्वत:ला धर्मनिरपेक्ष म्हणवून घेत. आपण फारशा आध्यात्मिक प्रवृत्तीच्या नसल्याचा दावाही त्या करीत. पण प्रत्यक्षात मात्र त्यांचा या सर्व गोष्टींवर खूप विश्वास होता– आपली आजी स्वरूपरानी व आई कमला नेहरू

यांच्याकडून इंदिराजींना हा वारसा मिळाला होता. उदाहरणार्थ, तीन मूर्ती भवनमध्ये राहायला येण्यापूर्वी शुभ दिवस आणि शुभ मुहूर्त पाहिला पाहिजे असा आग्रह धरून इंदिराजींनी नेहरूंनासुद्धा तसे करण्यास भाग पाडले होते व त्यामुळे ते रागावले होते. अनेक वर्षं इंदिराजी कोणताही दागिना घालत नसत. त्या फक्त आपल्या आईच्या आध्यात्मिक गुरू आनंदमयी यांनी दिलेली रुद्राक्षाची माळ घालत. ही माळ शुभशकून म्हणून त्या घालत.

१९८० साली, संजयचा असा अपघाती मृत्यू झाला आणि इंदिराजींचं संपूर्ण जग उद्‌ध्वस्त झालं. त्यामुळे त्या ब्रह्मचारींच्या सांगण्यावरून 'मोठ्या शक्ती'कडे आश्रयासाठी वळल्या. त्यांचं हे वागणं जगावेगळं नव्हतं. भारतातील तसेच भारताबाहेरील अनेक व्यक्ती, मग त्या राजकारणी असोत नाहीतर बुद्धिमंत व विद्वान असोत, मोठमोठ्या गुरूंवर श्रद्धा ठेवत. जसे रिचर्ड निक्सन यांचे श्रद्धास्थान बिली ग्रॅहम हे होते. ते रोज सकाळी निक्सन यांच्याबरोबर प्रार्थना करून त्यांच्यासमवेत नाश्ता घेत असत. भारतात मात्र राजकारणी नेते मंडळी त्यांच्या गुरूंवर मार्गदर्शनासाठी अवलंबून असली, तरीही त्याची शक्यतो वाच्यता केली जात नाही. या गोष्टी शक्यतो लपवल्या जातात. ही मंडळी सांत्वनासाठी, मार्गदर्शनासाठी किंवा आपल्या भविष्यात काय दडलंय हे जाणून घेण्यासाठी गुरूंकडे वळतात. इंदिराजींच्या आयुष्यात आपल्या पतीच्या मृत्यूनंतर संजयच्या मृत्यूच्या रूपाने दु:खाचा प्रचंड पहाड कोसळला होता. व त्यामुळे त्यानंतरच्या काळात त्या धीरेंद्र ब्रह्मचारींकडे वळल्या.

फिरोज किंवा नेहरू यांच्या मृत्यूनंतर सावरण्यासाठी इंदिराजींना काही महिन्यांचा अवधी लागला होता. परंतु संजयच्या मृत्यूनंतर अगदी लगेच त्या सावरल्या. आर. के. धवन यांच्या म्हणण्याप्रमाणे एका सुद्धा फायलीवर कारवाई होण्यात दिरंगाई झाली नाही. परंतु याचा अर्थ इंदिराजींच्या मनाचा जो समतोल ढळला होता त्यावर त्यांनी काबू मिळवला असेल असे मात्र म्हणता येणार नाही. सोनिया गांधी यांनी काही वर्षांनंतर याविषयी बोलताना म्हटले होते : ''इंदिराजी वरकरणी कितीही धीरगंभीर वाटल्या तरी त्या मनातून पुरत्या खचून, मोडून गेल्या होत्या.''

२७ जून रोजी, संजयच्या त्या भयानक अपघाती मृत्यूनंतर केवळ चार दिवसांनी, इकडे राजीव, सोनिया व मेनका यांनी अलाहाबाद संगमावर संजयचे रक्षाविसर्जन केले व दिल्लीमध्ये इंदिराजी आपल्या ऑफिसात येऊन

कामावर रुजू झाल्या. २८ जून रोजी फ्रँकेल नामक एका अमेरिकन प्रोफेसरांची इंदिराजींबरोबर मीटिंग ठरलेली होती. प्रोफेसर फ्रँकेल ह्या एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिकाच्या नवीन आवृत्तीसाठी इंदिराजींवर एक चरित्रात्मक निबंध लिहीत होत्या. ही मीटिंग काही तातडीने घेतलीच पाहिजे, असे नव्हते. त्यामुळे संजयच्या मृत्यूनंतर इंदिराजी ही मीटिंग तात्पुरती रद्द करतील असेच या फ्रँकेल बाईंना वाटले होते. पण तसे घडले नाही. इंदिराजींची व फ्रँकेल बाईंची यापूर्वी अनेकदा गाठ झालेलीच होती. पण आज १ अकबर रोडवरील ऑफिसात फ्रँकेल बाईंनी पाऊल टाकले तेव्हा इंदिराजींचा चेहरा भावनाविरहित दिसत होता. त्या अबोलपणे बसून होत्या. परंतु त्यांनी फ्रँकेल बाईंना पूर्ण सहकार्य केले. इंदिराजींच्या आवाजातील भावनाविरहित थंडपणा, त्यांच्या उजव्या डोळ्याची मधूनच होणारी फडफड आणि एकंदरीतच अशा शोकाकुल मानसिक अवस्थेत त्यांनी इंटरव्ह्यू देण्याची तयारी दाखवण्यामधील विसंगती या सर्वच गोष्टींमुळे फ्रँकेल बाई फार हादरून गेल्या. इंदिराजींवर दु:खाचा प्रचंड आघात आला आहे व त्या थकून गेल्या आहेत हे तर स्पष्ट दिसतच होतं. परंतु तरीही इंटरव्ह्यू संपेपर्यंत त्या अत्यंत शांत व धीरगंभीरपणे बसून होत्या. अखेर फ्रँकेल बाईंनी विचारले : ''अशी एक कोणतीतरी गोष्ट सांगा, ज्यावरून लोकांना तुमचे स्मरण व्हावे!'' इंदिराजींनी फ्रँकेल बाईंकडे क्षणभर एकटक पाहिले व नंतर कटूपणे म्हणाल्या : ''माझी आठवण लोकांना कशावरूनही होऊ नये.''

त्यांनी दिलेलं हे उत्तर म्हणजे एकप्रकारे भविष्यकाळात काय घडणार याचं भाकितच होतं. कारण इतिहास कोणत्याही एका विशिष्ट गोष्टींवरून इंदिराजींचं स्मरण करणारच नव्हता- एक सुसंगत धोरण, आदर्शवाद, योजना किंवा ध्येये या कशासाठीच नाही. १९६० आणि १९७० सालच्या सुमारास इंदिराजींवर डाव्या विचारसरणीचा प्रभाव होता. परंतु भारतीय राजकारणात संजयचा उदय झाल्यावर इंदिराजींचा सर्व आदर्शवाद लोप पावला. संजयच्या मृत्यूनंतर इंदिराजींचे आयुष्य पार उलथून गेले. त्या दु:खाच्या आघाताने खचून तर गेल्याच, पण त्यांनी आपला सगळा आत्मविश्वासही गमावला. आपल्या राजकीय आयुष्याच्या सुरुवातीपासूनच त्यांचं वागणं म्हणजे कोणत्यातरी गोष्टीवरील प्रतिक्रिया अशा स्वरूपाचं होतं. त्यांना जी परिस्थिती ओढवली असेल त्या परिस्थितीनुरूप वागण्याची जणू सवयच जडून गेली होती. परंतु संजयच्या निधनानंतर त्यांचं वागणं अधिकच निराशावादी झालं. नंतरच्या

काही महिन्यांमध्ये आणि वर्षांमध्ये तर विविध जाती-जमातीच्या, धर्माच्या, प्रादेशिक आणि राजकीय गटांना परस्परांविरुद्ध जाण्यास प्रोत्साहन देऊन कोणत्यातरी मार्गाने आपले स्वत:चे स्थान अबाधित ठेवण्याचा इंदिराजींचा प्रयत्न असे.

संजयच्या मृत्यूनंतर एक गोष्ट मात्र चांगली घडली. इंदिराजींपासून दुरावलेले त्यांचे जुने मित्र आणि आप्तेष्ट, हितचिंतक त्यांच्या सांत्वनासाठी धावून आले. इंदिराजी दु:खाने इतक्या खचून गेल्या होत्या की त्यांनाही त्या सर्व लोकांशी परत संबंध प्रस्थापित करण्याची गरज भासली. कित्येक दिवस १ सफदरजंग रोडवरील इंदिराजींचे निवासस्थान त्यांच्या जुन्या मैत्रिणींनी भरलेले असे. आता दु:खात सहभागी होण्यासाठी त्या सर्वजणी इंदिराजींच्या घरीच येऊन राहिल्या होत्या : फोरी नेहरू, पुपुल जयकर, शांता गांधी, सुभद्र जोशी. याशिवाय आयुष्यभर ज्या आत्याशी इंदिराजींचं विशेष सख्य नव्हतं व १९७७ च्या निवडणुकीत ज्यांनी इंदिराजींविरुद्ध प्रचार केला त्या विजयालक्ष्मी पंडितसुद्धा इंदिराजींच्या या संकटात डेहराडूनहून धावून आल्या. तीस वर्षांपूर्वी नॅन पंडित यांच्या पतीचा जेव्हा तुरुंगात मृत्यू झाला होता तेव्हा फिरोज व इंदिराजींनीच त्यांना सावरले होते. नंतरच्या काळात दोघींचे बिनसले असले तरी आता या दु:खाच्या क्षणी ते सर्व इतिहासजमा झाले.


डोरोथी नॉर्मन हिने सुद्धा अबोला सोडला. संजयच्या मृत्यूची बातमी कळताच तिने तातडीने इंदिराजींना पत्र लिहिले व चार वर्षांचा दुरावा संपला. आणीबाणीच्या नंतरच्या बिकट कालखंडात स्वराज पॉल यांनी इंदिराजींना आधार दिला होता. आता संजयच्या निधनाची बातमी समजताच ते लंडनहून ताबडतोब निघून आले. परंतु हे सर्व जरी असलं तरीसुद्धा, समाजात संजयच्या मृत्यूचा शोक जाहीर व्यक्त करण्यात आला होता, तरीसुद्धा, दिल्लीमध्ये काहीसं विचित्र वातावरण पसरलं होतं. हे इतकं भयानक घडलं होतं की, एकीकडे लोक दु:खाने रडत होते, पण दुसरीकडे सर्वांना हायसं झालं होतं. सर्व देशात हीच भावना होती. लोकांच्या मनात १९८० साली उमटलेल्या या भावनांना अनेक वर्षांनंतर बी. के. नेहरू यांनी शब्दरूप दिले : ''संजयचे निधन प्रलयकारी तर म्हणताच येणार नाही, पण भारताच्या दृष्टीने जे घडलं ते भल्याचंच होतं.''

❖

४थी आवृत्ती

# यशोदा

**डॉ. छाया महाजन**





**किंमत : १४०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

एका क्षणात बाईसानं त्याला कवेत घेतलं. त्यांच्या कुशीत राधो शिरला, आणि बाईसांचं मन मायेच्या पहिल्या आवेगानं भरून गेलं. त्या स्पर्शासरशी कितीतरी वास त्यांच्या मनात जागे झाले होते. ते कोसळणं किंवा आधार देणं याच्यापलीकडे त्यांच्या अनाथपणाच्या साधर्म्यानं त्यांच्या व्यथित आयुष्याचा वास... अंधाऱ्या माजघरातल्या पेटीतल्या कपड्यांचा वास... कोवळ्या जिवाची कातडी कधीही न भोगलेल्या बाईसांनी माजघरातून मन ओढून काढलं. सवयीनं आणि निष्पाप नवजात बालकाकडे कुतूहलानं पाहावं, तसं त्या राधोकडे पाहू लागल्या....

# अभिप्राय






## पॉलिटिक्स ऑफ द
# वूम्ब

**पिंकी विराणी**
अनुवाद
**रेश्मा कुलकर्णी-पाठारे**

पृष्ठसंख्या : ३५२
किंमत : रु. ३९५/-

## अंगावर काटा आणणारा गर्भाशयाचा 'बाजार'

विज्ञान-तंत्रज्ञान ही खरं तर आधुनिक युगाला मिळालेली सर्वोच्च देणगी. त्याच्या बळावर माणसाचं जीवन सुखी, सुलभ झालं; पण त्याचाच वापर करून जेव्हा माणूस माणसाच्याच जीवनाशी खेळायला लागतो आणि केवळ पैशांसाठी नफ्याचा किळसवाणा बाजार मांडतो तेव्हा मात्र काय करावे हे समजत नाही. मारियो पुझोनं लिहिलेल्या 'गॉडफादर' या कादंबरीत म्हटलं आहे, 'नथिंग इज पर्सनल, इट्स जस्ट बिझनेस'.. बाप रे! खरंच असं आहे का सगळं?...

संपूर्ण जगभरात सध्या मोठ्या संख्येने उभी राहिलेली फर्टिलिटी क्लिनिक्स व त्याद्वारे स्त्रियांना कृत्रिमरीत्या केली जाणारी गर्भधारणा,

त्यासाठी जोडप्यांकडून होत असलेली पैशांची बेसुमार लूट आणि या साऱ्यांतून गर्भाशयातीलबीजरोपण आणि कृत्रिम गर्भधारणेसाठी उभी राहिलेली एक प्रचंड अशी बाजारपेठ, या साऱ्यावर झगझगीत प्रकाश टाकण्याचे काम 'पॉलिटिक्स ऑफ द वूम्ब' हे बहुचर्चित पुस्तक करते.

पिंकी विराणी यांनी या पुस्तकाचे लेखन केले आहे. रेश्मा कुलकर्णी-पाठारे यांनी त्याचा अनुवाद केला आहे. हा विषय तसा मांडायला अवघड आहे. त्यातीलअनेक संकल्पना आणि व्याख्या या मूलत: इंग्रजीत आहेत, त्यातून वैज्ञानिक संकल्पना असल्याने त्या समजून घ्यायलाही जड आहेत; मात्र अनुवादिकेने मात्र हे शिवधनुष्य लीलया पेलले असल्याचे जाणवते. स्वत: स्त्री असल्याने त्या भूमिकेत शिरून विषयाची मांडणी केलेली असल्याने त्याला हळव्या संवेदनशीलतेची सुरेख किनार लाभली आहे. त्यामुळे ते केवळ एक रुक्ष भाषांतर न उरता तो एक सहजसुरेख संवाद झाला आहे. या संपूर्ण लेखनाचा अनुवाद करताना त्यामध्ये लालित्यही खुबीने जपले असल्याचे दिसून येते आहे.

स्त्रीचा देह म्हणजे जणू नाना प्रयोग करून पाहण्याची प्रयोगशाळा असल्यासारखे तिच्या शरीराचे खेळ चालवले आहेत. त्याहून गंभीर म्हणजे तिच्या शरीरातीलएका भागाचं नफ्याच्या दृष्टिकोनातून विश्लेषण सुरू आहे. जर नैसर्गिकरीत्या गर्भधारणा होत नसेलतर त्यासाठी विज्ञान-तंत्रज्ञान मदतीला आलं तर त्यात चूक काय, अशा भूमिकेतून याची सुरुवात झाली. सामाजिक बांधिलकीचं आणि मदतीचा हात देण्याचं आवरण घेऊन झालेली ही सुरुवात लवकरच एक मोठ्ठा बाजार जगभरात मांडणार आहे, याची कल्पना कुणालाच नव्हती; पण तो सध्या भारतासह जगभरातीलअनेक देशांत बिनबोभाट सुरू झालेला आहे व त्यावर नेमकेपणाने प्रकाश टाकण्याचे काम या पुस्तकाने अतिशय अभ्यासपूर्ण रीतीने केलेले आहे. या संबंधातीलजागतिक अहवाल, तज्ज्ञ डॉक्टरांची मते, संबंधित व्यवसायातीललोकांच्या या विषयीच्या भूमिका, स्त्रियांचे मानसशास्त्र, तिच्यावर येत असणारा सामाजिक दबाव, सांस्कृतिक बंधने, रीतीपरंपरांमध्ये अडकलेली मानसिकता अशा साऱ्या बाबींचा ऊहापोह अतिशय साकल्याने आणि अभ्यासू पद्धतीने या पुस्तकात केलेला आहे.

लेखिकेने यात मांडणी केली आहे त्यानुसार, केवळ भारतातच नव्हे तर

संपूर्ण जगात धर्म आणि विज्ञान यांची बेमालूम सांगड घालून कृत्रिम गर्भधारणेचा अर्थात आयव्हीएफचा वापर सर्रास चालू आहे. त्यासाठी जगभरात फर्टिलिटी क्लिनिक्स उभी राहिलेली आहेत. दुसऱ्याचे दुःख आम्ही जाणतो, असे बुरखे पांघरून तेथीलडॉक्टर्स एक स्वप्न स्त्री-पुरुषांना दाखवतात आणि बाजारात ओढतात; मात्र आयव्हीएफमुळे स्त्रीच्या शरीरावर होऊ शकणाऱ्या दुष्परिणामांविषयी कुणीच अवाक्षर बोलत नाही. त्यावर या पुस्तकाने नेमकेपणाने प्रकाश टाकलेला आहे.

यातून समोर येणारी माहिती खरोखर धक्कादायक आहे. या धंद्यात वारेमाप पैसा असल्याने आता त्यात दलालघुसले आहेत. स्वतःची बिझनेस कार्ड छापून केवळ ई-मेलच्या माध्यमातून जगभरात लागेलतिथल्या गिऱ्हाईकाला ‘लागेलते’ पुरवले जाते. अपत्यप्राप्तीची आस लावून स्त्री-पुरुषांच्या भावनांचा खेळ आणि बाजार मांडतात. अफगाणिस्तान, पाकिस्तान, बांग्लादेश, श्रीलंका, अमेरिका व पाश्चात्त्य देशांमध्ये हे सारे जाळे विखुरलेले आहे व दिवसागणिक वाढत आहे. धंदेवाईक सरोगसीवर आळा घालण्यासाठी काही देश सरसावले आहेत हे खरे; पण त्याला अटकाव करण्याचा प्रयत्न अद्याप म्हणावा तसा यशस्वी झालेला नाही.

या पुस्तकामध्ये म्हणूनच या सर्व बाबींचा एका व्यापक पातळीवर अभ्यास केलेला आढळून येतो. विविध देशांमध्ये या विषयावर केलेल्या विविध अभ्यासांचे दाखले या पुस्तकात दिलेले आहेत. कृत्रिम गर्भधारणेतील धोके, त्याचे मानसिक-शारीरिक परिणाम या साऱ्यांविषयी अवगत करण्याचे काम हे पुस्तक निश्चितपणे करते. चीन सरकारने जेव्हा एकाऐवजी दोन मुलं जन्माला घालायची परवानगी दिली, त्यानंतर तर या बाजाराला कसा ऊत आला यावरही हे पुस्तक प्रकाश टाकते. यातून प्रजनन गुन्हेगारीचे एक नवे रॅकेट कसे तयार होत आहे, हे देखील जळजळीत वास्तव आपल्या समोर येते.

भारतातील भीषण स्थितीवरही हे पुस्तक नेमकेपणाने बोट ठेवते. भारतात जिथे अगोदर आरोग्य प्रश्नांविषयी अनास्था आहे, तिथे या विषयावर कितपत भरवसा ठेवून चालेल? भारतामध्ये अशी आयव्हीएफ क्लिनिक्स उभारली गेली आहेत हे वास्तव आहे; परंतु त्यावर अंकुश ठेवण्यासाठी अजूनही कुठलीही नियमन संस्था नाही. मग एखादे विशिष्ट

क्लिनिक अथवा अमुक एक डॉक्टर चांगले आहेत, हे आपण कसं ठरवू शकतो? त्यातून समजा एखाद्या प्रकरणी फसवणूक झाली तरी अशा वेळी धाव कुठे आणि कुणाच्या विरोधात घेणार, हे सारे महत्त्वाचे मुद्दे व त्यांचा नेमकेपणाने व विस्ताराने केलेला ऊहापोह या पुस्तकात दिसून येतो.

पिंकी विराणी या मूलत: पत्रकार आहेत. हा त्यांचा स्वानुभव नाही, हे प्रांजळपणे त्यांनी मान्य केले असले तरीही या विषयाचा वैज्ञानिक, सामाजिक, सांस्कृतिक, मानसिक अशा सर्व बाजूंनी त्यांनी बारकाईने अभ्यास केला आहे. त्याचबरोबर विविध अहवालतपासून, अनेकांशी संवाद साधून मांडणी केलेली असल्याने ती अभ्यासपूर्ण व वास्तव परिस्थितीचे नेमकेपणाने दर्शन घडवणारी झालेली आहे. एका नव्या धोक्यापासून सावध करणारे आणि स्त्रीच्या मन:स्थितीला व तिच्या जगण्याचा हक्काला अधिक गौरवणारे असे हे पुस्तक प्रत्येकाने आवर्जून वाचावे असेच झालेले आहे.

**- पराग पोतदार**


BOOK CLUB

या क्लबचे सभासद व्हा. आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके निम्म्या किमतीत मिळवा!

# टी बुक क्लब

**या योजनेतील सहाही पुस्तके घेणे आवश्यक!**

चालू बुक क्लबचे सभासदत्व ₹ ५० भरून घेता येते. या क्लबअंतर्गत दरवर्षी गाजलेल्या सहा इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद प्रकाशित केले जातात. सभासदांना ही पुस्तके निम्म्या किमतीत मिळतात. पुस्तके प्रकाशित होताच आपणांस त्यासंबंधीची माहिती कळवली जाते.

**ही सर्व सहाही पुस्तके घेणे आपल्यावर बंधनकारक राहील.**

या सहा पुस्तकांपुरती ही सभासद फी मर्यादित राहील. या क्लबच्या सभासदांना आमच्या प्रकाशनाची इतर पुस्तके सवलतीत मिळतील.

**टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!**

₹१०० भरून उपलब्ध असलेली कोणतीही आठ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किमतीत मिळवा.

पोस्टेज खर्च अतिरिक्त

# अभिप्राय



## ‘मातृत्वा’च्या राजकारणाचा सखोल वेध...

जगाची लोकसंख्या आज सातशे दहा (७१०) कोटी आहे व भारतासारख्या खंडप्राय देशात आज १३० कोटी लोक राहतायेत. २०५०मध्ये जगाची लोकसंख्या दहा अब्जांहून अधिक आणि भारताची लोकसंख्या दीड अब्जाहून अधिक होईल. एकीकडे हे वास्तव आहे, तर दुसरीकडे प्रजननाच्या तंत्रशास्त्रात होत असलेली प्रगती. या अनुषंगाने जागतिक स्तरावरील प्रजनन तंत्रशास्त्रातील विदारक सत्यावर परखड भाष्य करणारे ‘पॉलिटिक्स ऑफ द वूम्ब’ हे कदाचित पहिलेच पुस्तक असावे. या पुस्तकाच्या लेखिका पिंकी विराणी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठातून पत्रकारितेचा पदव्युत्तर अभ्यासक्रम पुरा करून गेली अनेक वर्षे वृत्तपत्रांतून लिहीत आहेत. प्रस्तुत पुस्तकाचा मराठी अनुवाद केला आहे तो रेश्मा कुलकर्णी-पाठारे यांनी. पुस्तकात एकूण बारा प्रकरणे आहेत. पुस्तकाच्या शीर्षकाप्रमाणेच या प्रकरणांच्या शीर्षकांचाही अनुवाद न करता ती मूळ भाषेतच ठेवली आहेत. उदा. ‘व्हजायना व्हर्सेस वूम्ब’, ‘अनप्रेग्नन्ट’, ‘बाय, बाय बेबी’, ‘वी बिट प्रेग्नन्ट,’ ‘एग्स्प्लॉयटेशन’, ‘सिन ऑफ अवर फादर्स’, ‘प्रेग्नन्ट’, ‘मिल्क ऑफ ह्यूमन काइंडनेस’, ‘इन कोल्ड डोमेन’, ‘हॅच, मॅच, डिस्पॅच.’

प्रस्तुत पुस्तक समजून घेण्यासाठी एक महत्त्वाचे विधान लक्षात ठेवायला हवे, ते आहे, ‘आपण अशा एका समाजाचे भाग आहोत, ज्याचा तंत्रज्ञान हा एक अविभाज्य भाग आहे; पण तरीही हे तंत्रज्ञान कशाशी खातात, हेसुद्धा बहुतांश लोकांना ठाऊक नाही.’

विज्ञानाने स्त्रीला संततिनियमनाची विविध साधने देऊन मातृत्वाबद्दल स्वातंत्र्य दिले; परंतु आता त्याच विज्ञानामुळे तिच्या पायात ‘इन-विट्रो फर्टिलायझेशन’ अर्थात आयव्हीएफच्या बेड्या झपाट्याने टाकल्या जात आहेत.

अनादि काळापासून ‘स्त्री’च्या डोक्यावर समाजाने आणि संस्कृतीने एक बाब लादण्याचा प्रयत्न केला आहे, ती म्हणजे - स्त्री कितीही कर्तृत्ववान असली तरी तिच्या स्त्रीत्वाचा खरा सन्मान आणि जीवनाचे खरे सार्थक तेव्हाच होणार जेव्हा ती

एखादे तरी मूल जन्माला घालेल आणि आताही, जेमतेम वयाची अठरा वर्षे पूर्ण केलेल्या मुलीसुद्धा आयव्हीएफसाठी आपली बीजे देऊन मृत्युमुखी पडत आहेत.

'अनप्रेग्नन्ट' या शीर्षकाच्या प्रकरणात वंध्यत्वाविषयी विस्ताराने माहिती, तपशील देऊन विवेचन केले आहे. आयव्हीएफद्वारा जन्मलेल्या मुलांमध्ये 'ऑटिझम' अणि 'मंदबुद्धीपणा' यांचे प्रमाण अधिक असते. एका संशोधनाद्वारे असे दिसून आले आहे, की १९८२ ते २००७ या २५ वर्षांत जन्मलेल्या अडीच दशलक्ष मुलांपैकी ३०,९५९ मुले आयव्हीएफद्वारा जन्मली होती. ३१ डिसेंबर २००९ पर्यंत या सर्व मुलांची सतत पाहणी करण्यात आली. त्या निरीक्षणातून असा निष्कर्ष निघाला, की आयव्हीएफद्वारा जन्मलेल्या मुलांपैकी १०३ मुलांना 'ऑटिझम' होता, तर १८० मुले मंदबुद्धी होती वा त्यांना बौद्धिक विकलांगता होती. आयव्हीएफद्वारे जन्मलेल्या मुलांमधील कर्करोगाचे प्रमाण यासंबंधीही बरेच संशोधन झाले आहे. अशा मुलांना बालपणात कर्करोग होण्याची ३३ टक्के अधिक शक्यता असते. 'ल्युकेमिया' होण्याची ६५ टक्के अधिक शक्यता असते, तर मेंदू आणि मध्यवर्ती मज्जासंस्थेचा कर्करोग होण्याची २८ टक्के अधिक शक्यता असते.

वंध्यत्वावर मात करण्यासाठी स्त्रीने केलेल्या औषधाचे सेवन आणि तिच्या मुलांमधील कर्करोगाचे प्रमाण या संशोधनाचे निष्कर्ष २०१३च्या ऑक्टोबरमध्ये कोपनहेगन येथील 'डॅनिश कॅन्सर सोसायटी रिसर्च सेंटर'च्या डॉ. मारी हारग्रीव्ह यांनी जाहीर केले होते. वर दिलेली आकडेवारी त्याच संशोधनाच्या निष्कर्षांचा एक भाग होती. वंध्यत्वाच्या उपचारपद्धती, प्रजनन सहाय्यप्रक्रिया आणि जनुकांच्या कार्यपद्धतीमुळे हे होऊ शकते. त्यासंबंधी डॉ. हारग्रीव्ह म्हणतात, 'सदर प्रक्रियेमुळे ज्या उपप्रक्रिया असतात आणि ज्या काही विशिष्ट परिस्थिती निर्माण होतात, त्यामुळे हे बदल घडून येतात. उदा. कृत्रिम संप्रेरके वापरणे, शुक्राणू तयार करणे, फलित अंडी थिजवणे. तसेच फलित अंडी कोणत्या वातावरणात वाढवली जात आहेत. रोपणप्रक्रिया किती कालांतराने केली जात आहे, यावरही हे अवलंबून आहे.'

'फर्टिलिटी ॲण्ड स्टरिलिटी' या नियतकालिकाने १९९० ते २०१० या काळात अमेरिका, ब्रिटन, डेन्मार्क आदी १२ विकसित देशांतील २५ अभ्यास प्रकल्पांचा आढावा घेतला होता. या अभ्यास प्रकल्पांमध्ये ज्या मुलांची पाहणी केली गेली होती, त्यापैकी बहुतेकांचा जन्म आयव्हीएफद्वारा झाला होता. तर उर्वरित मुलांचा जन्म 'आयसीएमआय' (इन्ट्रासायटोप्लाज्मिक स्पर्म इंजेक्शन)

किंवा 'आययूआय' (इन्ट्रॉटेरिन इन्सेमिनेशन) या तंत्रांनी झाला होता. या अभ्यास प्रकल्पांबद्दलही पुस्तकात वाचायला मिळते.

जागतिक आरोग्य संघटनेच्या व्याख्येनुसार 'आरोग्य' म्हणजे केवळ शारीरिक स्वास्थ्य नसून त्यामध्ये मानसिक स्वास्थ्याचाही समावेश आहे. भारतात मानसिक विकार, अस्वास्थ्य यांना फारसे महत्त्व दिले जात नाही. उलट आपल्या कुटुंबात कुणाला मानसिक आजार असल्यास त्याबद्दल कधीच उघडपणे कबुली दिली जात नाही. जेव्हा एखाद्या व्यक्तीमधील दोष ठळकपणे दिसून येतात तेव्हा त्याला वेडा, मेन्टल अशा सर्वसामान्य पद्धतीने संबोधले जाते; परंतु 'स्किझोफ्रेनिया'सारखा जटिल मानसिक विकार इतक्या सहज पद्धतीने संबोधला गेल्यास त्यावर योग्य ते उपचार केले जाऊ शकत नाहीत. भारतात बऱ्याचदा स्किझोफ्रेनिया असलेल्या मुलाचे वा मुलीचे लग्न लावून दिले जाते. अशी दुभंगलेले व्यक्तिमत्त्व असलेली मुले वा मुली आपले आयुष्य आनंदाने, सुखाने घालवू शकत नाहीत.

या पुस्तकात स्किझोफ्रेनियाशी निगडित काही अभ्यासांबद्दल वाचायला मिळते. उदा. न्यू यॉर्क येथील मानसोपचारतज्ज्ञ आणि पर्यावरणशास्त्राच्या प्राध्यापिका डॉ. डोलेरेस यांनी केलेला अभ्यास. त्यांच्या संशोधनात हे सिद्ध झाले, की स्किझोफ्रेनिया झालेल्या २५ टक्के अपत्यांमध्ये हा आजार होण्याचे प्रमुख कारण त्यांच्या जन्मावेळी असणारे त्याच्या पित्याचे प्रौढवय हे होते. इतरही अनेक संशोधनांनुसार, स्किझोफ्रेनिया असलेल्या मुलांपैकी ५०-६२ टक्के मुलांच्या पालकांमध्ये स्किझोफ्रेनिया आणि निगडित व्याधी दिसून आल्या; परंतु ज्या पालकांना स्किझोफ्रेनिया नाही, त्यांच्या मुलांमध्येही स्किझोफ्रेनिया होण्याचे प्रमाण अधिक आहे. २०१२मध्ये तर एका संशोधनात हे सिद्धच झाले आहे, की केवळ भारतातच नव्हे तर कुठल्याही देशातील प्रौढवयाच्या पुरुषाचे शुक्राणू अपत्याला धोका पोहचवू शकतात, तसेच आईचे प्रौढवयसुद्धा अपत्यासाठी हानिकारक ठरू शकते.

मातृत्व संकल्पना आणि तिच्याशी निगडित सर्व अंगांचा वेध घेणाऱ्या या पुस्तकात जगभर चाललेल्या प्रजनन तंत्रशास्त्रातील संशोधनाबद्दल विस्ताराने लिहिले आहे. स्त्रीरोगतज्ज्ञ, प्रसूतिशास्त्रतज्ज्ञ व जनुकशास्त्रातील संशोधक - अभ्यासकांनी हे पुस्तक अवश्य वाचावे.

**– ग. शं. आपटे**

(लोकसत्ता - २७-१-२०१९)

२७वी आवृत्ती

# राधेय

**रणजित देसाई**





**किंमत : २३०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

''मी योद्धा आहे.
जखमांची क्षिती बाळगून
भागायचं नाही.
जन्माबरोबरच सुरू झालेलं
हे युद्ध
अखेरच्या क्षणापर्यंत मला
चालवलं पाहिजे.
त्यातच माझ्या जीवनाचं
यश सामावलं आहे.''

२१वी आवृत्ती

# पावनखिंड

## रणजित देसाई





**किंमत : १५०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

हेलकावे घेणाऱ्या पालखीचा गोंडा धरून राजे पालखीत बसले होते.
पालखीवर झाकलेल्या अलवानामुळे राजांना काही दिसत नव्हतं.
फक्त बाजींचा आवाज कानावर येत होता, "चला" चला!
कुठं जायचं? एका माणसाच्या जिवासाठी धावायचं कुठवर?
बाजी! कशासाठी हे कष्ट घेता? कोणाच्या स्वार्थापायी?
आणि तेही एका माणसाच्या जिवापायी?
कोणाच्या सत्तेनं आम्ही या माणसांना गुंतवलं? कोणत्या अधिकारानं?
जीवनात अखेरचं मोल असतं ते स्वत:च्या जीवाचं!
मग त्या जीवाच्या कवड्या यांनी आम्ही मांडलेल्या पटावर का उधळाव्यात?
कसल्या आणि कुणाच्या भरवशावर?
बाजी, फुलाजी तुम्ही स्वामीकार्यासाठी का ह्या अवघड वाटचालीत सामील झालात? कोणत्या त्यागापायी? हे व्हावं ही तो श्रींची इच्छा आहे असं आम्ही म्हणालो. पण हा महाचंडिकेचा होम धडाडत असता त्याचं पौरोहित्य आमच्या हाती
का सुपुर्द केलंत? यातून खरं काही साधणार आहे का?
या पालखीचा वीट येतो! नशिबानं या संकटातून पार पडलोच तर...
बाजी, पालखीचा मान तुम्हाला देऊ!
त्यावेळी तुम्हाला कळेल ही पालखी केवढं सुख देते ते!


## आवर्जून वाचावे












सांगलीच्या ॲड. जे. पी. पाटील फाउंडेशनतर्फे हेल्पर्स ऑफ हॅन्डिकॅप्ड संस्थेच्या संचालिका नसीमा हुरजूक यांना नुकताच समाजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. नसीमा हुरजूक यांना पुरस्कार प्रदान करताना सिक्कीमचे माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील. पंचवीस हजार रुपये आणि मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या प्रसंगी फाउंडेशनचे अध्यक्ष संजय पाटील, सांगली अर्बन बँकेचे अध्यक्ष गणेश गाडगीळ, जीवनविद्या मिशनचे अध्यक्ष डॉ. दिलीप पटवर्धन, मराठा समाजाचे अध्यक्ष ॲड. उत्तमराव निकम उपस्थित होते.

**Postal Reg. No. PCW/086/2018 – 2020**
**RNI. No. MAHMAR/2000/02739**
**No. SDO/Pune City/SR/3/2018 - Date : 1/01/2018**
Posting at Marketyard, PSO, Pune 411037.
Publication Date : 09/02/2019 Posting Date : 11/02/2019

## आवर्जून वाचावे



















**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,